

दिवाळी विशेषांक
२०१५

# नवा वास्तुविचार


**संपादक**

डॉ. विलास पवार





**प्रकाशन : ओम पब्लिकेशन**

**ओम पब्लिकेशनने हा दिवाळी अंक प्रकाशक डॉ. विलास पवार यांनी, एम. ३, पॅराडाईज टॉवर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे . संपर्क - २५३६ ४१४१. येथे छापून तेथेच प्रसिद्ध केला. अंकात छापलेल्या मताशी संपादक संपूर्ण सहमत असतीलच असे नाही.**

Email :- info@ompublication.com
Website : www.ompublication.com

# अनुक्रमाणिका

**कथा**

१. धनधन हो जसोदामाई - सीमा जोशी . . . . . ५
२. अमंगळ मंगळ - गजानन म्हात्रे . . . . . १९
३. परमेश्वर - गजानन म्हात्रे . . . . . ३५
४. तेल गेले व तूप गेले - मनोहर तळेकर . . . . . ४९
५. दिवट्याने लावले दिवे - प्रदीप बंगले . . . . . ५७

**लेख**

१. वास्तुकलेचा इतिहास - ओमनी फीचर्स . . . . . ६३
२. वास्तु शास्त्रानुसार भूमिची निवड - जयश्री पंडीत . . . . . ७७
३. मानवी संस्कृतिचा अलंकार घर - चारूलता कुलकर्णी . . . . . ८३
४. घर कविंच्या नजरेतून - दिलीप सरवटे . . . . . ८७
५. आमचे कोकणातले बैठे घर - सुरेश देहेरकर . . . . . ८९
६. दिमाखदर पडदे - किर्ती वैती . . . . . ९१
७. वास्तु टिप्स - अश्विनी चव्हाण . . . . . ९५
८. घराची शोभा वाढविणारे फर्निचर ठेवा निटनिटके - राजेश पाटील . . . . . १११
९. शेजाऱ्यांशी ठेवा मैत्रिचे संबंध - विद्या राणे सराफ . . . . . ११२

**काव्यसृष्टी** . . . . . **११३**

**पाककृती** . . . . . **११९**

# संपादकीय

## वास्तु सुखासाठी सुखाचा सहवास हवा !

'असावा सुंदरसा बंगला', एक बंगला बने न्यारा अशी शेकडो गाणी मराठी, हिंदी आणि अन्य भाषांत आजपर्यंत झाली आहेत. परंतु आपण खरं या घरात किती वेळ असतो याचा विचार कोणी तरी करतो का हा प्रश्न आहे. घराची रंगसंगती, घरातील पडदे, फर्निचर, घराच्या दिशा, घरातील चित्रे यांचा सगळ्यांचा विचार (अविचार) होताना दिसतो. घरात राहणाऱ्या आपल्या सोबतीचे परस्पराचे स्वभावरंग , त्यांच्या विचारांच्या दिशा त्यांच्या आचारांची व्यवस्था याची काळजी घेताना दिसत नाही. एक यंत्रवत माणूस किंवा एक सेमी रोबो अशी अवस्था घरातल्या राहणाऱ्यांची आहे. रोज सकाळ होते आणि रात्र सुध्दा आणि या दरम्यानची धावपळ पुन्हा तीच, तोचतोचपणा आयुष्यात निर्माण करणारी सगळी परिस्थिती वास्तुसुख किती घ्यायला देते. या प्रश्नावर पुन्हा आपण येतो. काही ठराविक विषयाला बगल देऊन किमान हलकफुलक बोलावे. मनाचा त्रागा न करता संवेदना व्यक्त करणारी कुटुंबव्यवस्था आता काहीशी नामशेष व्हायला लागली आहे आणि जे काही कुटुंबसंवाद होण्याची कारणे आहेत त्याचे अवशेषसुध्दा आता धडपड करताना दिसत आहेत. कुटूंब संवाद संपला आहे.

असा निष्कर्ष काढण्याची काही गरज नाही . परंतु तो कुटुंबसंवाद थोडाफार भरकटलेला मात्र आहे. आपण उत्सव सण साजरे करतो ते याचसाठी की सण साजरा करतानाचा आनंद आपण समसमान वाटून घ्यावा आणि एकत्रित आविष्कार करावा.


फार पूर्वी दिवाळीचा फराळ तयार करायचा असो, रांगोळी काढायची असो वा फराळाची देवाणघेवाण असो यामुळे कुटूंबात आणि शेजारी सुखाच्या सहवासाची संकल्पना असायची. आज ती थोडीफार दुरावली आहे. कोणीतरी सुरुवात करायला हवी आहे. आपले घर, आपले कुटुंब,आपले शेजारी यांसहित सण,उत्सव साजरे करण्याचे. यामुळे वास्तूला रंग कोणताही असला तरी घरांघरांत आनंद रंग सगळीकडे असेल, मायेचे पडदे आणि प्रेमाची झालर वास्तू सुख भरभरून देईल, धकाधकीच्या जीवनांत सुध्दा सौख्य गोडवा निर्माण करील या साठी फक्त स्नेहाचा हात एकमेकांना द्यायला आणि आनंदाची बरसात झेलायला हवी !


**दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा !**

***With Best Compliments from***

# WOOD MALL

Furniture ideas from the world





**Opp. Raheja Garden, Near Tip Top Plazz, L. B. S. Marg, Thane (w.)**
**Tel. : 022- 25838800/11/22**
**Fax :25838833**
**Website : www.woodmall.in**
**Email : Info@woodmall.in**

# धन धन हो जसोदामाई

**- सीमा चंद्रशेखर जोशी**

अक्का अखेर गेली. मी तिच्या तेराव्यालाही गेलो नाही. अक्काचे पती काका गेले, तेव्हा देखील मी गेलो नव्हतो. खरं तर तेव्हा आम्ही झांशीहून जळगावला माझ्या बहिणीकडं सहज म्हणून जाणार होतो. आमचं रिझर्व्हेशन वगैरे झालं होतं. मोना आणि मुलं आनंदली होती.

जळगावहून माझ्या बहिणीचं, बेबीचं पत्र आलं की, बरं झालं तू येत आहेस ते. इकडं भुसावळला काका अत्यवस्थ आहेत. कोणालाच ओळखत नाहीत. बरेचदा कोमात जातात. शुद्धीवर असले की, कधी न ऐकलेल्यांची नावं घेतात. ओळखीतल्या एक तुझंच नाव मात्र अधूनमधून घेतात. विचित्र म्हणजे, 'बाबा शाळेतनं आला का ?' असं विचारतात. तेव्हा, तू आल्यावर त्यांना भेटलास तर बरं होईल."

त्या पत्रानं मी विझून गेलो. रिझर्व्हेशन रद्द केलं. मोना रुसून बरीच तणतणली, "हे तुमचं नेहमीचंच कामापुढे तुम्हांला नातलग नगण्य वाटतात. आपण इकडं इतक्या दूर कधीमधी तिकडं जायचं झालं की, हे असं ..."

मी चूपचाप ऐकून घेतलं. कोणा स्वकीयाला शेवटचे आचके देत असलेलं बघण्याची कल्पनाही मला करवत नाही. त्यांच्यावर पडलेल्या मृत्यूच्या सावलीला घाबरून मी स्वतःतच लपू बघतो, हे तिला कसं समजावणार ?....

मागच्या घरच्या भेटीत त्याला तिथं कळलं



की माझी थोरली बहीण अक्का भायखळ्याला हॉस्पिटलमध्ये आहे. ऑपरेशन झालंय तिचं. कॅन्सरची एक मोठी गाठ तिच्या पोटातून काढली आहे.

एकामागोमाग एक असा तो दुसरा आघात. मी जाऊन अक्काला भेटलो. किती वर्षांनी पाहत होतो तिला! तिच्या अंगावर हॉस्पिटलचा पांढरा गाऊन होता. ती आक्रसून अगदी लहानखुरी वाटत होती. चेहराही रंग हरवलेला. तिचं हसू मात्र पूर्वीसारखंच पाणी शिंपडल्यागत टवटवीत होतं.

मला पाहून ती म्हणाली, “बघ रे, तुझ्या बायकोसारखे कपडे घातलेत मी.” थोड्या वेळानं उदास होत म्हणाली, “हे गेले तेव्हा काही आला नाहीस तू. सारखी तुझी आठवण काढायचे. पण तू तिकडं कृष्णाच्या देशात जाऊन त्याच्यासारखाच झालास बाबा. पुन्हा मागं वळून आपल्या माणसांकडं पाहायचं नाहीये तुला. जाऊ दे. मरणानं त्यांच्या दारावरची कडी वाजवली आणि सवयीप्रमाणे ते घाईत लगेच निघून गेले. आता त्या काळ्यानं माझ्या दारावरची कडी वाजवली आहे. पण मी लगेच निघून जाईन थोडीच ? चांगला तिष्ठत ठेवीन त्याला. बघच तू.”

यावर मी काय बोलू शकणार होतो ? ....

ती म्हणाली होती त्यात बरंच तथ्य होतं. मी खरंच अट्टहासानं सारी नातीगोती विसरू पाहत होतो. बालपणीच्या दारिद्र्यांच्या काळोखाशी निगडित असलेल्या सगळ्या गोष्टींना विसरू पाहत होतो. तरीही तिकडे खूप दूर अंतरावर राहत असताना उरात कळ उठावी तसे काही चेहरे अचानक डोळ्यांपुढे तरळायचे. ठसका लागला, की स्वतःलाच दिलासा द्यावासा वाटायचा की, ‘कोणीतरी तुझी आठवण काढतंय ?‘

अशा चेहऱ्यांपैकी एक चेहरा अक्काचा. ती माझ्याहून इतकी मोठी की खरं तर ती माझी आई शोभावी. तिच्या मुलापेक्षा मी वर्षभरानं लहान.

... अक्का सांगायची,“अरे, माझा बाळ झाला तेव्हा पांझरेला महापूर आलेला. तिचं पाणी देवपुरात घुसलेलं. आता थेट आपल्या घरात शिरतं की काय, म्हणून नानांनी आम्हा सगळ्यांना तिथनं हलवलं. खूप दूर अगदी नागावच्या बारीपर्यंत. पुढं गेलो असतो तर नवरानवरीच्या डोंगरावरच माझी बाज असती. तू मात्र शहाणा हां. पूर ओसरल्यानंतर वर्षभरानं झालास. तुझी आईसुद्धा ओसरली तेव्हा.”

“आई ओसरली म्हणजे काय ग ?”

“अरे बाबा, आई म्हणजे नदीसारखी. म्हणून तशीच ओसरते.”

“म्हणजे नक्की काय ?”


“कळेल तुला केव्हा तरी. तुला मेल्याला नसत्या चौकशाच फार,” असं म्हणून अक्का हसायची.

..... मी बाळबरोबर वाढताना अक्काच्या संपर्कात अधिक येणं ओघानंच आलं. पुढं माझ्या वडिलांना संसाराचा गाडा ओढवेना तेव्हा अक्काच पुढं आली, “नाना, भाऊ शिकेल माझ्याजवळ. मला जसा बाळ, तसा तो.” मग काही वर्ष मी अक्काकडंच राहिलो. दरम्यान माझे वडील गेले.

लहान होतो तेव्हा. सहावीं सातवीत होतो. अक्का आणि काका अमळनेरला होते. काका (माझे मेहुणे) फारसे बोलायचे नाहीत. अक्काच त्यांचा धाक दाखवत राहायची. माझ्या वांडपणाला आवरू शकणारा तेवढाच काय तो लगाम होता.

“बाब्या, मारीन हां मी !” अस माईनं चिरक्या आवाजात कितीही ओरडून म्हटलं तरी ते रागावणं फुसकं आहे, हे मी केव्हाच ओळखलं होतं. अक्काच्या भोवती थोडं घुटमळलं, चेहरा जरासा पाडून घेतला, की ती लगेच विरघळते, हेही उमगलं होत. आपण काहीही खोडी केली तरी अक्का आपल्या वतीनं पुढं होऊन बचाव करणार हे माहीत

झालं होतं. एकदा तर गल्लीत विटीदांडू खेळताना मी उडवलेली विटी, आम्ही ज्यांच्या घरी भाड्यानं रहायचो त्या ब्रह्मेकाकूंना लागली. चांगलीच खोक पडली. आज नक्की मार बसणार या कल्पनेनं कावराबावरा झालो होतो. घरात शिरलो तर ब्रह्मेकाकू कपाळाला पट्टी बांधून माईशी बोलत बसलेल्या.



अक्कानं मला पाहताच पकडलं आणि माझ्या हाताला हिसका देत काकूंसमोर उभं करत म्हणाली. "काकू, चांगल्या दोन सणसणीत लगावा याला."

काकू मात्र, " जाऊ द्या हो शांताबाई. पण, बाबा, असं गल्लीत खेळू नये हा," असं म्हणत निघून गेल्या.

संध्याकाळी काकांना सगळा प्रकार समजल्यावर ते थोडं रागावल्यासारखं करू लागताच अक्का उसळून म्हणाली, "गल्लीत खेळू नये तर पोरांनी कुठं खेळावं, म्हणते मी. तिथं धुळ्याला घरासमोर मोट्ठ पटांगण आहे, म्हणून त्याला खेळायची सवय जडलीय. पोरांनी खेळू नये तर काय घरकोंबडं व्हावं ?"

"तुझ्या अशा बोलण्यानं हा जास्तच शेफारेल."

"काही शेफारणार नाही. नाही ना रे भाऊ ?"

मी काय, "हो, शेफारेन," असं उत्तर देणार ?

पण माझा हूडपणा जास्तच झाला की अक्काचा चेहरा उतरायचा. माझ्याशी बोलायची नाही ती. तिला बोलतं करू गेलं तर, "तुला मेल्याला गाल गोबरे करायला काय लागतं. माझीच मेलीची परवड. इकडं आड, तिकडं विहीर," असं म्हणून गोरंमोरं तोंड फिरवून घ्यायची.

तिचा संध्याकाळपर्यंतचा अबोलाही मला असह्य व्हायचा. मी चूपचाप तिला मदत करू पाहायचो. तिनं घासलेली भांडी मी शेल्फात ठेवू लागलो, की खस्सकन माझ्या हातातलं भांडं हिसकावून घेत म्हणायची, "जा, पला इतून. घरात लांडा कारभार करू नये मुलानं"...

...अक्काच्या बोलण्यात म्हणींची रेलचेल असायची. शिवाय, त्या तिच्या कहाण्या. 'करा रे हाकारा, पिटा रे डांगोरा; नगरात कोण उपाशी आहे, त्याची चौकशी करा' अस म्हणत तिचे शंकर-पार्वती फिरत असायचे. कोणतीही कहाणी असो, गोष्ट असो, तिथं माईचे शंकर-पार्वती येणारच.

आमच्या धुळ्याजवळ नकाण्याचा तलाव होता. कधीमधी आम्ही डबे घेऊन तिथं जायचो. तेव्हा बऱ्यापैकी झाडी होती तिथं. त्या तलावाची 'कहाणी' सांगावी तर अक्कानंच.

अक्काच्या लेखी आमचे वडील भोळे सांब तर आई लंकेची पार्वती. 'लंकेची पार्वती' म्हणजे काय ? हे विचारायच धाडस होत नसे आम्हाला. आईला विचारल तर ती म्हणायची, "शांता लहानपणापासनंच मनकवडी. देवळात कधी जाणार

नाही, पण नदीत लाल दगड सापडला तर त्याला गणपती म्हणून पूजेत ठेवायचा हट्ट धरला होता तिनं.'' आमच्या वडिलांनीही अक्काचा तो हट्ट पुरवलेला आम्ही देव्हाऱ्यात पाहतच असायचो....

.... अमळनेरला असताना मी अक्काबरोबर रोज तिथल्या नदीवर जायचो. नदी म्हणजे माईची सगळ्यात आवडती मैत्रीण आणि त्यातही तिच्या माहेरची पांझरा नदी. अक्का सकाळी सडा घालताना दररोज एक ओवी हमखास गुणगुणायची.

''पहाटेच्या स्वप्नात
दिसे पांझरेचे पाणी,
ओलावती माझे केस
तिच्यामधे न्हाल्यावाणी.''

मी आणि बाळ, नदीत डुंबायचो तेव्हा अक्काचं धुणं, पितळी डबे वगैरे घासणं असं काय काय चालायचं. तिला सगळे कसं 'लखलखीत' हवं असायचं. आमच्या त्या घरापुढच्या टीचभर अंगणालाही ती सारवून लखलखीत करायची. तिथं इवलीशी नीटस रांगोळी रेखायची. मी एकदा म्हटलं, '' काय ग, एवढ्याशा जागेला इतकं सारवतेस तू ?'' तेव्हा आपल्या रांगोळीकडं पाहत ती म्हणाली. ''अरे, अंगण असं लखलखीत असलं की मावळण्यापूर्वी चांदण्याही त्यात आपला चेहरा बघायला ओणवतात.'' मी तिच्या रांगोळीच्या ठिपक्यांना चांदण्यांची रांगोळी असं चिडवायचो, तेव्हा तिला ते खरंच वाटून ती खूश व्हायची.

तिथं नदीकाठी सखाराम महाराजांची वाडी होती. आता ती तितकीशी स्पष्ट आठवत नाही, पण, तिथल्या भिंतीवर शुल्कांनी चितारलेल्या ज्ञानोबा तुकारामांचे चेहरे मात्र नीट आठवतात अजून.

नदीच्या मध्यावर पूर्वीच्या महाराजांच्या समाध्या होत्या. एक-दोनदा नदीला आलेला पूर बघायला गेलो होतो. त्या समाध्या गढूळ पाण्यात जवळपास बुडाल्या होत्या. अक्काचा हात धरून मी उभा होतो. तिनंच खरं तर माझा हात घट्ट धरून ठेवला होता आणि पुटपुटली होती, ''काय मेलं नदीच्या मधोमध समाध्या बांधणं. गुदमरायला होत नसेल का त्यांना ? ''

मी तिच्याकडं पाहिलं. तेव्हा तीच जणू गुदमरतेय असे भाव तिच्या चेहऱ्यावर पाहिल्याचं आजही त्या पुराच्या दृश्याबरोबर आठवतं.

वाडीपासून दूर काही अंतरावर काळे खडक होते. त्यांच्याजवळचं पाणी चांगलं दोन-तीन पुरुष खोल असल्याचं ऐकलं होतं. अक्का आम्हांला तिकडं जाऊ द्यायची नाही. म्हणायची, '' अरे, आसरा आहेत तिथं. तिथ जायचं नाही. पाहायचसुद्धा नाही तिकडं.''

'' आसरा म्हणजे काय ग ?''

'' पाण्यातल्या देवता असतात त्या .''

'' म्हणजे माझ्या पुस्तकातल्या जलपरीसारख्या ?''

'' ही कोण रे जलपरी ?''

'' अग, आमच्या पुस्तकात नाविकांच्या सफरीची गोष्ट आहे. जलपरी असते ना, तिचं, वरच अंग बाईचं आणि खालचं मासोळीचं असतं. ती समुद्रातल्या खडकावर येऊन बसते आणि गाणं

म्हणून नाविकांची नाव ओढून घेते आपल्याकडं."

" काय बाई पोरासोरांना भलतंसलतं शिकवतात हल्ली! हां, तुझ्या त्या जलपरीसारख्याच असतात या आसरा. पिडलेल्या सासुरवाशिणी त्यांच्या डोहात आसरा घेतात. पण लहान पोरांनाही त्या आसरा गिळतात म्हणे. मला नाही हां तसं वाटत. अरे आसरा काय न हडळ काय. बाईची जात ती! बाळाला कशाला गिळेल? हां माजलेल्या बाप्यांना गिळत असतील त्या."

तिला आम्ही मुद्दाम डिवचायचो, " हे बापे कोण ग?"" सगळे टोळभैरव पुरुष बापेच असतात मेले. नाही तरी पुरुष म्हणजे एकजात दगड वर्षानुवर्ष पाण्यात रहातील तरी कोरडे ते कोरडेच! क्वचित कधी कुणाला पाझर फुटतो म्हणा. आता एवढे मोठे शंकर. काय झालं, तर म्हणे पार्वतीनं ध्यान मोडलं त्यांनी भरली डोक्यात राख आणि गेले हिमालयात. पार्वती बिचारी वाळून सुकल्या फांदीसारखी झाली. पण आहे का त्यांचं लक्ष?"



काकांना ऑडिटच्या कामानिमित्त सारखं दौऱ्यावर जावं लागायचं. शिवाय त्यांच्या आणि माईच्या वयातही बरंच अंतर होतं. त्याचा त्या त्राग्याशी संबंध असावा, असे आम्हांला तेव्हा कुठून वाटणार?

आम्ही राहायचो त्या घरातल्या न्हाणीघरात एक चिंचोळी विहीर होती. पूर्वीपासून तिथं होती. घरमालकांनी तिच्याभोवती भिंत बांधून तिला घरात असं सामावून घेतलं होतं.

एकदा त्या विहिरीत अक्काची तांब्याची कळशी पडली. कोणी तरी सांगितलं, की कुणी बुरुडाचा आबा आहे. तो विहिरीत पडलेलं काहीही काढून आणतो. बोलावलं त्या आबाला. त्यानं तोंडात तेलाचा बोळा धरला आणि उतरला विहिरीत. पाण्यात त्या तोलाच्या बोळ्यामुळं पडणाऱ्या किरणात तळातलं दिसतं अस त्यानं आम्हा पोरांना सांगितल होतं. तो माईची कळशी घेऊन तर आलाच पण तिच्यासोबत दोन चांदीची जोडवीसुद्धा आणली त्यानं.

कळशी पाहून हरखलेला अक्काचा चेहरा ती जोडवी पाहून उतरला. तिच्या मनात काय आलं कोण जाणे. मला आणि बाळाला म्हणाली, "चला रे नदीवर." नदी घराजवळच होती. आम्ही चूपचाप अक्काबरोबर गेलो. आमच्या हातात ती जोडवी देत अक्का म्हणाली, "पाण्यातल्या वाळूत खोपा करा

आणि ही त्यात पुरून टाका.''

आम्ही तसं केल्यावर तिनं त्या पाण्यातल्या जागेवर वरूनच तीन ओंजळी पाणी सोडलं आणि हात जोडून पुटपुटली. ''बाई गं, जा नदीच्या कुशीत, मोकळी हो. माझ्या घरातला आड विसर. चुकलंमाकलं क्षमा कर. या पोरांना बाधू नको.''

''अक्का, कोणाला सांगतेस तू ?''

''अरे, त्याच बिचारीला. देव जाणे, ती कोणाची कोण. तिनं का अन् कधी तो आड जवळ केला असेल, कोण जाणे. पण बापडी पीडलेली असेल. कधीची घुसमटतेय, कोण जाणे. ''

अक्काच्या त्या बोलण्याचा अर्थ कळायला किती वर्ष जावी लागली !

त्यानंतर मात्र अक्काला तिथलं पाणी गोड लागेना. तिनं हट्ट करून काकांना बदली करून घ्यायला भाग पाडलं. आम्ही पुन्हा धुळ्याला आलो.

दरम्यानच्या काळात माझ्या थोरल्या भावाला लहानशी नोकरी लागली होती. तो, मी आणि आई, एका भाड्याच्या खोलीत राहत होती. अक्का जवळच राहत होती, पण आई मला सहसा तिच्याकडे जाऊ द्यायची नाही. बहिणीकडचं अन्न जास्त खाऊ नये अस म्हणायची. भावाच्या तुटपुंज्या पगारात आम्हा तिघांचं जीवन मोठ्या मुश्किलीनं चाललं होतं, पण आई मात्र कुणाकडून मदत घ्यायला तयार नव्हती.

त्यात मी अकरावीची परीक्षा उत्तम प्रकारे उत्तीर्ण झालो. माझं नाव पेपरात आलं म्हणून अक्का पेढ्यांचा पुडा घेऊन आली. आईनं भिवई हलकीशी उंचावताच अक्का म्हणाली, ''असं वाकडं पाहायला नको हां. भावासाठी मी एकवीरेला नवस बोलले होते. तोच फेडायचाय. बाबा , चल माझ्या बरोबर मंदिरात.''

आईच्या डोळ्यांची परवानगी घेऊन आम्ही दोघं एकवीरेच्या मंदिराकडं गेलो. पण अक्का मंदिरात न जाता मंदिरापुढं बांधलेल्या आणि तिथं जवळच वाहणाऱ्या पांझरा नदीच्या पाण्याकडं जाण्यासाठी उतरणाऱ्या पायऱ्यांवर बसली. मी सुद्धा बसलो.

अद्याप संध्याकाळ झाली नव्हती. जरासं चटके देणारं उन्ह पांझरेच्या शेलाट्या अंगावर थिरकत होतं. डाव्या बाजूला स्मशान होतं. पाठीमागं एकवीरेचं मंदिर. तिथली जुनाट दगडी दीपमाळ अगदी लहानपणी मला खूप प्रचंड वाटायची. ती आता खुजी वाटत होती.

मी अक्काला म्हटलं, ''तू केव्हापासून नवस बोलायला लागलीस ?'' तीन हातातला पुडा उघडून एक पेढा माझ्या तोंडात कोंबला. स्वतःही एक पेढा चघळून म्हणाली, ''अरे, कसले नवस-सायास ? ते उपासतापास तुझ्या आईकडे पण, नुसतं तू पास झालाय म्हणून मी पेढे आणले असते, तर जावयाकडच्या पेढ्यांनी तिला कमीपणा आला असता ना ! म्हणून हा नवसाचा बहाणा.''

मी मुद्दाम तिला डिवचत म्हटलं, ''मग, निदान त्या बहाण्यापुरते तरी देवीपुढं पेढे ठेवायचे नैवेद्य म्हणून ! ती पाहत असेल ना !''

अक्कानं खोटं खोटं रागावून डोळे मोठे केले. ''मेल्या, तू काही अजून बालिस्टर झाला नाहीस हां मला शिकवायला. ती पाहते तर पाहू दे तिला. काय पाहते रे ती इतं ? शेजारच्या स्मशानात प्रेत

जळताना? समोरच्या नदीत त्यांची राख पडताना? तुझी आई घरी तिच्या रेणुकेच एवढ कोडकौतुक करते. तिला परकर काय, डोक्यावर चांदीचा मुकुट काय, चांदीचे डोळे काय, पण काय झालं त्यान? नाना गेलेच ना? आज तुझं एवढं यश साजरं करायला घरात चिमूटभर साखर तरी आहे का? काय बघते ती रेणुका तिच्या चांदीच्या डोळ्यांतून? "

बोलण्याचा ओघ भलतीकडंच गेल्याचं कदाचित अक्काच्या लक्षात आलं असावं तेव्हा. कदाचित ती त्यावेळी खूप गलबलून आली होती म्हणूनही असेल. पण अक्कानं एक आवंढा गिळला. माझ्या पाठीवरून हलकासा हात फिरवून दूर कुठं तरी पाहत ती म्हणाली, "लहानपणी मला दगडातही देवांचे आकार दिसायचे. एक तांबडा खडा मला गणपतीसारखा दिसला, तेव्हा माझे लाड पुरवण्यासाठी नानांनी तो चक्क देव्हाऱ्यात ठेवला. आता त्यांच्यामागं तुमची अशी परवड होताना पाहून मला देवामध्ये दगडही दिसत नाही रे. दगडाला निदान पाझर तरी फुटतो. अशाच कुठल्यातरी दगडानं पाझरलेली ही पांझरा. आता तू गमतीनं म्हणालास, की आपण नैवेद्य न दाखवताच पेढे खात असल्याचं देवी पाहत असेल म्हणून पण खरं कोणी पाहत असेल तर ही नदी पाहातेय. "

"हिच्या वाटेवर अशी कितीतरी गावं, किती तरी मंदिर असतील. ही सगळं काही बघते. लोकांनी टाकलेली घाण तळाशी नेते आणि बदल्यात स्वच्छ पाणी प्यायला देत पुढं जाते. शेवटी तिच्या एखाद्या मोठ्या बहिणीली मिठी मारते."

तिनं बोलणं अर्ध्यावर सोडून दिलं तेव्हा मी माझ्या मनात सतत डाचत असलेला प्रश्न तिला विचारला, "अक्का, तुझा देवावर विश्वास नाही का ग? अणि नसेल तर तुझ्या घरी एव्हढे कुळधर्म, कुळाचार कशासाठी?"

ती उठून उभी राहत म्हणाली, "माझा देवावर विश्वास असो की नसो. त्याचं तुला काय नि कोणाला काय? आणि कुळधर्म, कुळाचार घरातल्या कर्तीच्या डोक्यावर येऊन बसतात त्याला काय करणार?" मग हसत म्हणाली, "हां, त्यानं एक मात्र चांगलं होतं बरं. पोरांना गोडधोड खायला घालायला मिळतं. तुझी आई म्हणूनच तर एवढी सुगरण झाली."

अक्काचं ते सारखं 'तुझी आई, तुझी आई' म्हणणं मला बोचू लागलं. परतीच्या वाटेवर मी तिला विचारलं, "तू सारखं 'तुझी आई, तुझी आई' अस का म्हणतेस ग? ती तुझीही आई आहे ना?"

"आहे ना. मी कुठं नाही म्हणते? पण तीच सारखं म्हणते, की माझा पोरगा दुसऱ्यांच्या मदतीवर शिकणार नाही म्हणून. म्हणजे आम्ही आता दुसरे झालो. नानांच्या हयातीत मी केलं नव्हतं का तुझं? पण आता त्यांच्या पश्चात तिला तसं काही नको आहे. भाऊ पास झाल्याबद्दल बहिणीला पेढेसुद्धा वाटता येत नाहीत त्यामुळे." अक्का पुन्हा रडवेली झाली.

वाटेवरच असलेल्या अक्काच्या घरी न थांबता मी घरी परतलो. डोक्यात विचारांचे भुंगे गूं गूं करीत होते. नाही म्हटलं तरी पुढच्या शिक्षणाचा खर्च आऽवासून पुढं उभा होताच. पुढचं खर्चीक शिक्षण अशक्य होतं, हे स्पष्ट दिसत होतं. त्यामुळं मला पास झाल्याचा आनंद विशेषसा वाटत नव्हता.

घरी गेल्यावर आईने वाटीभर शिरा माझ्यापुढं ठेवला. मला ब्रम्हांड आठवलं. त्या माउलीनं एवढासा शिरा करण्यासाठी सामान कसं जुळवलं असेल ?

आनंदाचा मनोमन झालेला विरस, एक वांझोटी असहायता, अक्काच आताचं बोलणं, या सगळ्या गोष्टींच्या मिश्रणातून माझ्या मनात संताप खदखदू लागला होता. त्या भरात मी आईला मुद्दाम म्हणालो, "तू देखील एक घास घे ना ! पण नको तुझा उपवास मोडेल !"

आईनं खरंच एक चमचाभर शिरा घेत म्हटलं, "का रे, शांतेसारखे टोमणे का मारतोस, आ ?"

मी म्हटलं,"अक्का खरं तेच बोलते. तू कसले एवढे उपवास करतेस आई ? काय झालंय त्यामुळे किंवा ह्या देव्हाऱ्यातल्या तुझ्या रेणुकेमुळे ?"

आई एकदम गोरीमोरी झाली. मी तोपर्यंत तिच्याशी अशा प्रकारे कधीच बोललो नव्हतो. पण आई फार समंजस होती. मला जे नीटस म्हणता येत नव्हतं ते कदाचित तिनं ओळखलं होत. म्हणाली, "अरे, रोजच उपास पडू लागले तर काय लोकामध्ये दवंडी पिटायची ? त्यापेक्षा आज सोमवारचा उपास आहे, आज मंगळवार आहे असं सांगणं सोयीचं आणि या रेणुकेच म्हणशील तर माझ्या जिवाभावाची आहे ती."

"तुला सांगते, चाळीसगांवात माझ्या माहेरच्या देशमुखांची गढी होती. पण त्या मातीच्या ढिगाऱ्यात मी, माझा भाऊ अन् एक बहीण ही तीन गढी राहू होतो. गरिबीचा असाच अंधार मी जगात डोळे उघडल्यापासनं बघत होत्ये. गढीवरून सकाळी उगवणारं लालभडक सूर्यबिंब काही काळ स्वच्छ पाहता यायचं मला. तुझ्या वडिलांनी कोणत्या तिरीमिरीत माझ्याशी लग्न केल कोणं जाणे. पण इथं सासरी आल्यावर पहिल्यांदा घरच्या देवापुढं वाकल्ये तेव्हा रेणुकेचा शेंदूर लिपलेला गोल तांदळा पाहिला आणि मला ते पहाटेचं सूर्यबिंब आठवलं. एका क्षणात माझी सगळी तगमग शांत झाली."

"सूर्य रोज उगवतो आणि किती जणांचे जन्म किती जणांचे जगणं पाहून मावळतो. हिनं देखील आपल्या घराण्यातले किती जन्म-मृत्यू पाहिले असतील ! हे सांगायचं की तिनं पाहिलेली या घराण्याची सातवी पिढी त्याचं म्हणून. तेव्हा, राहो ना बापडी या घराण्यात जितक्या पिढ्या राहू शकेल तितका काळ. चिमूटभर शेंदूर अन् थेंबभर तेलाशिवाय तिला काय लागतं रे ?"

"आणि रात्र झाली म्हणून आपण सूर्याला शिव्याशाप देतो का ? उलट, सकाळी लवकर उगव बाबा, असंच म्हणतो. असा उदास होऊ नकोस. अरे कमकुवतांनी भिंतीला खुशाल पाठ लावावी, आपण मात्र पुढे जात राहावं."

"शांतेनं पेढा खाऊ घातला ना तुला ? वाटलंच होतं मला तीच तुझ्यावर तू लहान होतास तेव्हापासून पोटच्या पोरासारखं प्रेम करते. त्याबाबतीत ती माझाही दुस्वास करते. वेडाबाई जसं काही तू तिच्याच पोटी जन्माला यायला हवा होता तिला."

त्या एका दिवसात त्या दोघींनी मला किती शिकवलं ?

त्यानंतर आईच्या त्या उपासांच्या

पुण्याईमुळेच माझे जीवन अचानक बदललं. माझी रेल्वे सर्व्हीस कमिशनच्या परीक्षेत अॅप्रेन्टिस इंजिनियर म्हणून निवड झाली. आणि मी सगळ्याच बाबतीत कुठल्या कुठे जाऊन पोहोचलो. उत्तर भारतात प्रत्येक वेशीवर टांगलेल्या दारिद्र्याला पाहून आपण निदान इतकं काही भोगलं नाही, हे जाणवत होतं. तरीही मी जी काही अवहेलना भोगली होती. त्यामुळे कोणा नातलगांशी फारसे संबंध ठेवत नव्हतो. पत्रव्यवहारही जेवढ्यास तेवढा.

त्या सुखाच्या दिवसांत अचानक चक्रीवादळ आलं. तारुण्याच्या तिरीमिरीत मी आणीबाणी विरुद्धच्या आंदोलनात उतरलो. कारावास मिळाला. काही महिन्यांकरिता नोकरी गेली. त्यावेळी मला जितकी अपेक्षा होती तितकीच मोजकी पत्रं आली. त्यातल एक अक्काचं होतं.

ती फारशी शिकलेली नव्हती. मोठ्या थरथरत्या अक्षरात तिनं लिहिल होतं, "लहानपणापासून फार हटवादी आहेस तू. आपल्या वडिलांनी असच केलं होतं. काय झालं? जमीनजुमला घालवून बसले. नंतर त्यांना हवं ते आपल राज्य आलं. पण तेव्हाही काही मिळाल का? तीन-चार वर्षांची कच्चीबच्ची तुझी आणि तुझ्या बायकोनं काय करायचं? मला काही समजत नाही बाबा. तिकडं येताही येत नाही."

तिच्या मनात आलं तसं लिहिलेलं तुटक वाक्यांचं पत्र! ते वाचताना माझा सगळा उपरा ताठा गळून पडला आणि त्या रात्री मी एखाद्या पोरक्या पोरासारखा उशीत डोकं खुपसून रडलो .....

त्यानंतर दोन-तीन वर्षांनी काका वारले तेव्हा मी त्यांना शेवटचं भेटणं टाळलं, तरी अक्काला मात्र काही दिवस झाशीला माहेरपणासाठी घेऊन गेलो होतो. मी पुन्हा स्थिरावलो होतो. पणी ती खूपच बदलली होती. तिचा टवटवीतपणा हरवला होता. तिचा चेहरा एखाद्या वाळलेल्या फुलासारखा झाला होता. सोशिकपणासाठीच घडवलेला तो चेहरा! डोळ्यांभेवती जळालेल्या इच्छांची काळी वर्तुळं आणि अबोलपणाच्या सवयीमुळं पांढरे पडलेले ओठ!

तिला म्हटलं, "चलं तुला मथुरा दाखवतो, प्रयाग दाखवतो. तुला नद्या फार आवडतात ना. बघून घे इकडच्या गंगा-यमुना."

त्यावर ती हळूच म्हणाली, "काशिनाथच नाही तर काय करायचं काशी नि प्रयाग पाहून? माझ्यासाठी माझ्या घरचं गोकुळच बरं. मला तिकडं लवकर पाठव बाबा."

मला तोंडात मारल्यागत झालं. माझ्या मेव्हण्याचं नाव काशिनाथ होतं.

मी अक्काचं म्हणून पाहिलं होतं. "अगं नाती मोठ्या झाल्या तुझ्या, बाळ घेईल की सांभाळून. आणखी चार-आठ दिवस आली आहेस तर राहा थोडे दिवस इथं." त्यावर ती म्हणाली, "भाऊ, तुला काय म्हणायचंय ते समजतं मला. लोक काय म्हणतात, तेही कळतं बरं का पण तूच सांग मी करू तरी काय? मला देवळात जाऊन वाती वळत बसणं कधी जमलं नाही की मी कधी शेजारीपाजारी गप्पा मारायला गेले नाही. तुझ्या मेव्हण्याला मी कुणाशी बोललेल फारसं आवडत नव्हतं, म्हणून तोंड मिटून ठेवायची सवयच लागली. रडायचं झालं तर धुळ्याला. अमळनेरला नदी असायची जवळ.

आकृत्तातर माझे डोळेही बाळच्या मनमाडसारखे कोरडे झालेत रे. मग घरातल आवरतं सावरतं राहण्याशिवाय मी काय करू, तूच सांग. माझं मेलीचं नशीबच फुटकं, कोणाचं कितीही कसं, पण कोणी म्हणून नाव घेत नाही. तुझंही मी इतक करायची पण तुझी ओढ मात्र नेहमी त्या बेबीकडं तिनं तुझं असं कितपत केलं रे ?"

अक्काच्या त्या शब्दांनी मी पार दुखावलो. आता इतक्या वर्षांनंतर तिनं बेबीचा असा उल्लेख करून काय मिळवलं ? तिच्या मनात इतकी वर्षं ही मळमळ साचून राहिली होती तर की, हातातून निसटत चाललेलं जीवन पकडून ठेवण्याच्या अट्टवहासात ती एका परीनं माझ्यावरचा हक्क सांगू लागली होती. केलं त्याचा मोबदला मागू लागली होती ? तिच्या या बोलण्यानं तिच्याविषयीची माझी भावना कोळपून गेली .....

बेबी म्हणजे माझी दुसरी बहीण सुनंदा. माणसाला अनेक भावंडं असली तरी कुणा एका विषयीच अधिक ओढ असते. कधी कधी एकच भाऊ किंवा एकच बहीण असली तरी तिच्याविषयी जन्मभर काही विशेषसं वाटत नाही. बेबीविषयी मला लहानपणापासून फार ओढ वाटते आणि अगदी आजवरही ती ओढ टिकून राहिली आहे. तिनं माझ्यासाठी काय केलं किंवा नाही, हा प्रश्नच माझ्या मनात नाही. बेबीनं कधी अक्कासारख्या गोष्टी सांगितल्या नाहीत की माझं तसं संगोपन केलं नाही. आम्हा दोघांत घरगुती संभाषण नेहमीच अगदी जुजबी होतं. लहानपणी तर तासन्तास मी तिच्याभोवती एक शब्दही न बोलता घुटमळत राहायचो. तिला नुसतं पाहणं, तिनं माझ्याकडं पाहून नुसतं हसणं माझ्यासाठी पुरेसं असायचं.

मात्र बेबीनं काहीही उपदेश न करता तिच्या कृतीनं, कर्तबगारीचं उदाहरण माझ्यापुढं ठेवून तिच्या नकळत मला बरच काही शिकवलं. सगळ्यात महत्त्वाच म्हणजे भावनांच गणित तिनं कधीच मांडलं नाही. त्यान भांडवल म्हणून वापरलं नाही. दोन पिढ्यांमधल्या अंतराचे चटके तिलाही बसले. पण तिनं फार सहजपणे आपल्याला कासवासारखं अलिप्तपणाच्या कवचाखाली आक्रसून घेतलं. खरं म्हणायचं, तर मला स्वतःला तिच्या नावावरून नंदलाल म्हणून घ्यायला आवडेल, हेच तिच्या माझ्या खऱ्या नात्याच स्वरूप. देवाणघेवाण या पलीकडंच अक्कानं मात्र मला इतकं काही देऊन त्या दानाचा उच्चार केला आणि मला जसं काही दूर ढकलून दिलं, असं मला तेव्हा वाटलं. तिनं ज्यांच्यासाठी खस्ता खाल्ल्या त्यांना तिच्याविषयी काहीच वाटत नाही ते याचमुळे कां, असंही मनात आलं.

अक्काला कॅन्सर झाला पण त्याच्याशी लढत राहिली. तो रक्तातला खेकडा तिचं एक-एक गात्र पोखरत होता. पण उरणाऱ्या गात्रांनिशी ती त्याच्याशी झुंजत होती. तिनं म्हटल्याप्रमाणे त्या काळ्याला दाराशी तिष्ठत राहायला भाग पाडत होती.

मी तेव्हा मथुरेला होतो. मथुरेजवळच्या बाद येथे ऑईल रिफायनरीजवळ आमचा रेल्वेचा टँकर डेपो सुरू करायचा होता. तो प्रोजेक्ट माझ्याकडे होता.

इण्डियन ऑईलचा कृष्णशरण चौबे मथुरेचाच. तो मोठ्या आग्रहानं मला त्याच्या घरी

घेऊन गेला. म्हणाला, "पाण्डेजी, आज मथुराकी खास चीजका स्वाद लिजिएगा."

"मतलब ?"

"अजी कुछ नही. थोडी ठंडाई चख लीजिए, साग कचौडी खाइए, दिनभर की थकान उडन छूं हो जायेगी, फिर चलेंगे सैरसपाटा करने."

"नही, नही भाई वह ठंडाई आपको ही मुबारक."

"अजी कुछ नही होगा साहब, आपको ठंडाईके बारे में एक कविता सुनाता हूं, ध्यान से सुनिए।"

"भीजत है जब रीझत है, और धोय धरी सबके मनमानी ।

स्वाफी साफ कर, लौंग इलायची घौंट के त्याग करौ रसधानी।

संकर आए, बिसंबरनै जब चम्मकमे डाल जल छानी ।

गंग से ऊंची तरंग उठे तब हिदे मेक आवत भयभवानी।"

एवढ्यात तोंडावर घुमट घेतलेल्या चौबे भाभीनं कचोऱ्या आणल्या. एक मोठा तांब्या भरून ती धवलांगी भवभवानी आणली. मी मोठा हिय्या करून तिचे रसपान करू लागले. हृदयात खरंच गंगेपेक्षा उंच तरंग उठू लागले.

चौबे म्हणाला, "कहो साहब, बढ़िया बनी है न ? सुनो, हमारे निपट निरंजन कविराज आगे क्या कहते है इसके विद्या-विज्ञान, ज्ञान के बारे में - "

"निपट निरंजन कहै बिजिया बिग्यान, ग्यान, दैवे को बलसमान लैबोको अतीमसौ।

जागवे को गोरख, तापिवै को भूवजी सोयबो वो कुंभकरन, भोजनको भीमसौ।।"

मला ठंडाई पिता पिता हसू आलं. –जगण्यासाठी गोरखनाथासारखे, तप करण्यासाठी भावासारखे, झोपण्यासाठी कुंभकर्णासारखे, भोजनासाठी भीमासारखे बळ देणारी आणि घेताना अंतिम म्हणजे शांतीसारखी ही भांग.

मी अर्धा प्याला खाली ठेवत म्हणालो, "चलिए चौबेजी, हमें कुंभकरन सी नींद नही चाहिए।"

चौबे खळाळून हसला आणि "ठीक है" म्हणून माझ्याबरोबर बाहेर पडला.

पावसाळ्याचे दिवस होते. मथुरेला कृष्णजन्मोत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. आठदहा दिवस आधीच प्रत्येक लहान मोठं कृष्णमंदिर सजलेलं असतं. मथुरेच्या प्रसिद्ध तंग (चिंचोळ्या) गल्लीबोळांतून यात्रेकरूंची, पड्यांची गर्दी उसळलेली असते. शुभ्रवसना विधवा भिकारणी कपाळावर गोपीचंदनाचा टिळा लावून "राधे, राधे" म्हणत फिरत असतात. कोपऱ्या कोपऱ्यावरच्या हलवायांच्या दुकानांतून मिठाईच्या तान्ह्या बाळांच्या गालाच्या वासासारखा मंद सुवास दरवळत असतो. मथुरेची मिठाईसुद्धा ब्रजबालेसारखी मुग्धा, माफक गोड, मंद सुवासाची.

चौबेने पाजलेली भंगभवानी हवेतल्या गारव्याबरोबर माझ्या रक्तात संचारू लागली होती. अंगात गुलाबी आळस भिनत होता. तिथं किनाऱ्यावर गर्दीला भरती आली होती. कुठल्यातरी आखाड्याचे महंत प्रवचन देत होते. खांबाखांबावर मोठे कर्णे लावलेले. गंमत म्हणून तिथं थोड्या वेळासाठी

थांबलो.

महंत सांगत होते, ... “तो जसोदारानी कान्हासे बोली, “लल्ला तू हमका माई कहके काहे पुकारता है रे? अम्मा बोल. मैया बोल. माँ कहके पुकार. ई “माई” काहे रे?” कान्हजु बोले, “हम तो तोहे माई कहकेही पुकारे है.”

“पर काहे?”

“तुम्ही देख लियो, हम मा कहत है, अम्मा कहत है, मैया कहत है तो हमारा मुंह खुला रह जावत है पर माई कहत है तब होंठ थोडे भींच जावत है”

“अरे तो तनिक मुंह खुला रह दिजो! मूंह मे ऐसा का है?”

“तुम्ही देख लियो,” कहकर कान्हजुने अपनो मुंह खोला. जसोदारानी देखन लगी तो मोरे अचरजने ठाढी का ठाढी रह गयी. का देखो वाने? देखो की लल्ला के मुखमें चंदा, सूरज तारे डोल रहे है. वो मारे डरके कांप गयी. तब कान्हजु बोले, “माई, ईही कारन तो हम तोका माई कहत है.”

एवढं सांगून महंत गदगदून म्हणाले,“ धन धन हो जसोदामाई! कान्हजुकी वो मा थोडीही थी? पर देखो उसकी ममता कावरताप; की सारे जगतके पालनहार उसके सामने अपना बड्पन दिखाना नही चाहते है। और आज जरा सूटबूट क्या पहन लिया, की हम अपनी मा को ‘माँ’ कहना तो दूर, उससे मिलने को भी कतरते है।”

त्या महंतानं रचलेल्या आख्यानातला तर्क ऐकून मी चकित झालो. स्वतःच ‘माई’ असे पुटपुटताना ओठ जवळपास मिटलेले कसे राहतात ते पाहू लागलो. गंमत वाटली.

रात्री रेस्ट हाऊसमध्येही बिछान्यावर लोळताना ती कथा मनात घोळत होती. तेव्हाच, का कोण जाणे, मला अक्काची आठवण येत होती.

त्या रात्री मी पाहिलेलं ते स्वप्न अजूनही लख्ख आठवतं. मी स्वप्नात पाहिलं की नदीच्या किनाऱ्यावर परकर-पोलक्यातल्या दोन किशोरी हातात हात गुंफून उभ्या आहेत. त्या खरं तर अक्का आणि सुनंदा आहेत. अचानक, अक्का सुनंदेचा हात सोडून नदीकडं धाव घेते. सुनंदा तिला मोठ्या मोठ्याने हाका मारू लागते. तोच सुनंदेच्या जागी मला स्वतः मीच उबा असलेला दिसतो. ती पुढं पुढं धावणारी किशोरी अधूनमधून मागं वळून पाहते तेव्हा कधी तिचा चेहरा अक्का असतो, तर कधी सुनंदेचा. अचानक तिथली नदी त्या किशोरीसहित लुप्त होते. तिथं इराकचं वाळवंट पसरतं. दूर क्षितिजावर मावळतीचं शेंदरी सूर्यबिंब थरथरत असतं. माझ्या घशाला कोरड पडते....

त्या स्वप्नानं दचकून मी जागा झालो. जहाज हिंदकळाव तशी माझी खोली गर्रकन हलल्यागत वाटली. माझ्या घशाला खरोखरच कोरड पडली होती. मी खूप अस्वस्थ झालो होतो. हा सगळा त्या भांगेचा परिणाम म्हणून चिडलो होतो परंतु खरं तर मी खूप घाबरलो होतो. वाईटाची काळीकुट्ट भीती मनात साकळून ठणकत होती.

मला भरभरून वाटलं, की लवकरात लवकर अक्काला, सुनंदेला भेटून यायला हवं, कधीच भेटलो नाही त्यांना. आपल्याच मगरुरीत मस्त राहिलो. पण तेव्हाच माझं मन दुष्टासारखं अक्काच

गलितगात्र चित्र डोळ्यापुढं रेखू लागलं. तिला तशा अवस्थेत माझ्याकडून बघवलं गेलं नसतं.

त्यानंतर काही दिवसांतच अक्काच्या निधनाची खबर आली. नंतर कधी तरी भेटल्यावर बाळानं सांगितलं की, शेवटी तिचा घसाही बंद झाला होता. परंतु जाण्यापूर्वी तिनं खुणेन पाणी मागितलं. ती काही थेंब तरी नक्कीच प्यायली खरंच.

.... म्हणजे अक्कानं अखेर आपला प्राण पाण्याच्या स्वाधीन केला तर ....

---

**फेंगशुई टिप्स**

घरात कॅक्टस अथवा काटेरी झुडपे ठेऊ नयेत. ते ठेवल्याने घरात नकारात्मक ऊर्जा प्रवाहित होत असते.

सुखलेली फुली ही नकारात्मक ऊर्जेचे प्रतिनिधीत्व करतात. फुले सुकल्यानंतर लगेच ते फेकून द्यावीत. त्या जागी ताजी फ्रश फुले ठेवावीत. ताजी फुले सौभाग्यवर्धक असतात.

घरात बंद पडलेले घडयाळ ठेवू नयेत. ती तात्काळ दुरुस्त करुन घ्यावी.

घरात हिंसात्मक छायाचित्र अथवा पोस्टर लावू नये. त्याने घरातील सदस्यांमध्ये तनाव निर्माण होत असतो.

रात्री घराबाहेर सुकण्यासाठी टाकलेले कपडे परीधान करणाऱ्याच्या मनात वाईट विचार घर तरत असतात.

शौचालयाचा दरवाजा नेहमी बंद ठेवावा. तो उघडा असल्याने घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करत असते.

दरवाजा असलेल्या भींतीवर कॅलेंडर अथवा घडयाळ टाकू नये. आपल्या दीर्घायुष्याच्या दृष्टीने ते घातक ठरु शकते.

घरातील तिजोरी, बँक पासबुक, कॅश रजिस्टरवर तीन फेंगशुई नाणे चिकटविल्याने आपल्या उत्पन्नात वृध्दी होते.

लाल दोऱ्यात बांधलेले तीन फेंगशुई नाणे व तीन घंट्या दरवाज्यात लटकविल्याने घरात समृध्दी नांदते.

सौभाग्यासाठी घरात ड्रॅगन ठेवला पाहिजे. मात्र तो दिवाणखाण्यात ठेवावा. शयनकक्षात ठेऊ नये.


---

## *With Best Compliments from*



# अमंगळ मंगळ

**- गजानन ध. म्हात्रे**





अहो, या युगात मंगळबिंगळ यांच्या दोषांचे विचार नव्या पिढीला कसे पटणार? कारण आता मानव चंद्रावरून मंगळावरदेखील गेला आहे. तिथे काय आहे, हे तरुणांना माहीत झाले आहे. त्यामुळे जन्मकुंडलीत तो मंगळ चौथ्या की आठव्या स्थानात असलेला पाहून त्याच्यावर विश्वास ठेवणे शक्य आहे काय? उलट आपले अज्ञान पाहून ते आपली खिल्ली उडवतील!" त्यांच्या त्या उत्तराने साने एकदम खुश झाले.

आकांक्षाच्या सर्वांगाची थरथर अद्यापही थांबलेली नव्हती. दोन दिवसांपूर्वी तिने जिवाच्या आकांताने जो पळ काढला होता तो तिला भयंकर धक्कादायक होता! जर आपण घरातून निसटलो नसतो तर... केवळ ज्योतिषांनी सांगितले म्हणून नव्हे तर गेला महिनाभरात तिने अनुभवलेलं ज्योतिषाचे भाकीत अगदीच तंतोतंत खरं झालं होतं तर! अमित एकाएकी असा राक्षसी वृत्तीचा का झाला होता? त्याच्यात कशाचा तरी संचार झाल्यागत तो का वागू लागला होता? त्याला अचानक माझा एवढा तिटकारा का आला होता? पत्नीच्या बाबतीत पती असा अघोरी आक्रमक तेव्हाच होतो जेव्हा त्याला तिच्या चारित्र्याबद्दल संशय येतो, पण अमितच्या मनात याबाबत तसा लवलेशही नसल्याची आकांक्षाला खात्री होती. तसं काही घडलेलंदेखील नव्हतं. तिचे लग्नापूर्वी कुणाही मुलाशी प्रेमसंबंध नव्हते हे त्यालाही ठाऊक होतं. तशी ती त्याच्या दूरच्या नात्यातीलच असल्यामुळे पूर्ण परिचयाची होती. त्यांच्या विवाहाला सव्वा वर्षे पूर्ण होऊन गेल्या दोनच महिन्यांत एवढा बदल का घडला होता? ती त्याच्या परिवारात एवढी एकरूप झाली होती की तिला तिच्या घरच्यांचा विसर पडल्यासारखा झाला होता. नावाप्रमाणे तिच्या आकांक्षा पूर्ण झाल्यागत! पण हे तुफान अचानक...

आकांक्षाचे वडील श्री. हेमंत राजे हे एक आदर्श प्रोफेसर म्हणून त्या भागात नामांकित होते. आई सौ. हेमलता राजे यादेखील प्राध्यापिका असल्यामुळे ती सहजतेने चांगल्या क्रमांकाने पदवी परीक्षा पास झाली. पुढे एम.बी.ए. करून मोठ्या कंपनीत मॅनेजर होण्याचा तिचा विचार होता. तिला तशी इतरत्र नोकरी शोधण्याची आवश्यकता नव्हती. तिच्या भावाने औषधांची कंपनी काढली असल्याने तिने एम. बी. ए. च्या प्रवेशासाठी फॉर्म भरला होता.

अमितचे वडील श्री. अशोक साने एका खाजगी कंपनीत अधिकारी होते. आईला समाजसेवेची आवड असल्यामुळे ती सतत घराबाहेर असे. अमितने कॉम्प्युटर इंजिनीअरिंगची डिग्री

मिळताच खाजगी कंपनीत चांगला जॉब पटकावला होता. तिथे तो कायम होताच वडिलांनी त्याच्या विवाहाचा विचार केला. अमितच्या वडिलांना ज्योतिषाची जाण होती. त्यामुळे यंदा त्याला विवाहाचा योग आहे हे पाहून त्यांनी अमितच्या आईला त्याच्यासाठी स्थळं शोधायला सांगितलं. काही विवाहमंडळांना त्याची पत्रिका दिली. अमितला कडक मंगळदोष असल्याचे ते अनेकदा बोलले असल्याने त्याच्या आईने



तिच्या गुरूकडे त्याच्या लग्नाबाबत प्रश्न टाकला. तेव्हा ते म्हणाले, "जरी त्याल कडक मंगळ असला तरी विवाहासाठी यंदा चांगला योग आहे." गुरूंची आज्ञा मिळताच त्या जोमाने कामाला लागल्या होत्या. बऱ्याच मुली पाहून झाल्या, पण मनासारखी एकही मुलगी मि़ळत नव्हती. शेवटी आपलं काही चुकतंय असं वाटून त्याचे वडील ज्योतिषाचार्य गोस्वामी या नामांकित ज्योतिषाकडे पत्रिका घेऊन गेले. त्यांनी ती पत्रिका बराच वेळ पाहून चेहऱ्यावर नाराजी व्यक्त करीत ती पत्रिका परत करीत म्हणाले,

"तुम्ही तूर्तास या मुलाच्या विवाहाच्या फंदात पडणे योग्य दिसत नाही."

त्यामुळे नाराज होऊन बरेच प्रश्न-प्रतिप्रश्न केले, पण त्या ज्योतिषाने त्यांना नकारात्मक उत्तर दिले. बरीच विनवणी केल्यावर त्यांनी स्पष्टपणे बजावले,

"मुलाच्या पत्रिकेत व्दिभार्या योग अटळ आहे."

साने हिरमुसले होऊन त्यावर काही दैवी उपाय विचारले. पण त्यांनी स्पष्टच सांगितले की, काहीही उपाय करून हा योग बदलणार नाही. यंदा जर विवाह करायला जाल, तर भलतंच विपरीत होईल. नक्कीच मुलीला दगाफटका होईल, कारण यंदा त्याचा मंगळ फारच उग्र अवस्थेत आहे. त्यांनी निघताना दक्षिणा म्हणून ५०१ रुपये समोर ठेवताच ते घेण्यास त्यांनी नकार दिला. आपण पैशासाठी हे करीत नसल्याचे सांगितले. त्या अजब ज्योतिषाऐवजी ते आणखी काही ज्योतिषांकडे गेले. त्यांनी मात्र वेगवेगळे उपाय सांगून यंदा लग्न करण्यास हरकत नसल्याचे सांगितले. त्या ज्योतिषाच्या अशुभ भाकिताबद्दल सांगताच ते त्या ज्योतिषाची खिल्ली उडवून गोस्वामींना कुणी अर्धज्ञानी म्हटले.

वधू संशोधन सुरू ठेवले, पण मनाजोगी मुलगी मिळत नव्हती. ज्या मुली पसंत येत होत्या त्यांच्याकडून काहीनाकाही खुसपट काढून नकार येत होता. हा हा म्हणता सहा महिने उलटून गेले. त्या ज्योतिषाच्या वाणीत काही तथ्य असावं म्हणून पुन्हा ते सौ. सानेंना सोबत घेऊन गेले. ती पत्रिका पाहताच तेच उत्तर मिळाले.

काही दिवसांनी श्री. साने त्यांच्या दूरच्या नात्यातील एका लग्नसमारंभासाठी गावाकडे गेले असता त्यांच्या नजरेस आकांक्षा पडली. तिला बऱ्याच वर्षांनी पाहिल्यामुळे त्यांनी ओळखलंच नाही. तिचं सौंदर्य, सालस वागणं पाहून ते फारच खूश झाले. त्यांनी सौ. ना तिच्याबद्दल सांगताच त्याही बेहद्द खूश होत म्हणाल्या,

"अहो, अशी सून जर आपल्याला

मिळाली, तर आपलं भाग्यच समजा. पण तुमच्या त्या भविष्याचं काय? हिला अमितचा तो मंगळ काही त्रासदायक नाही ना होणार... ?" त्या शंकेने ते पुन्हा विचारात पडले. बराच वेळ विचार करून निर्णय घेतला की त्या ज्योतिषाचं ऐकलं तर आकांक्षेसारखी सुरेख मुलगी हातची जाईल. जे काही होईल ते ईश्वरावर भरोसा ठेवून पाहू या, असा विचार करून ते म्हणाले,

"अगं, तू असं कर, तिच्या आईला भेटून त्यांचा काय विचार आहे ते तरी विचारून बघ. जर तिचं त्यांनी कुठे ठरविलेलं नसेल आणि यंदा तिच्या लग्नाचा योग आहे का विचार. नंतर सरळ तुझ्या गुरूंची आज्ञा घे!"

त्यांच्या त्या उत्तराने सौ. साने एकदम उत्साहित झाल्या. त्यांनी विलंब न लावताच आकांक्षाच्या आईला गाठले. इतर अवांतर गप्पा केल्यावर हलकेच सौ. राजेंना विचारले,

"आकाक्षांचं शिक्षण जर पूर्ण झालं असेलच, तर तिच्या लग्नाचा विचार करायला हरकत नाहीय. तुमचा काय विचार ठरला आहे... ?" त्या अनपेक्षित प्रश्नाने प्रा.सौ.राजे बिचकल्या. काही वेळाने त्या म्हणाल्या,

"ती एम.बी.ए. करून नोकरी करायचं म्हणतेय." त्या नकाराने नाराज न होता त्यांनी पुष्टी दिली.

"अद्याप शिक्षण घेणार म्हणजे अजून दोन-तीन वर्षे वय वाढणार! त्यानंतर नोकरीचा शोध म्हणजे खूपच उशीर होईल ना! एकतर मुलीची जात म्हणजे आई-वडिलांना चिंताच असते ना..." त्यांचं मतपरिवर्तन करीत त्या म्हणाल्या. तशा सौ. राजे म्हणाल्या,

"तुमचंही बरोबर आहे हो. पण निदान एम.बी.ए. करून तिनं स्वतःच्या पायावर खंबीर उभं राहावं असं ह्यांचं म्हणणं आहे." पुन्हा ती अडचण येताच त्यांनी शकल लढवीत त्या मुद्द्याला हात घालीत म्हणाल्या,

"असं असं, त्यांचंही बरोबर आहे ना! हल्ली मुलगा काय आणि मुलगी काय, समान हक्काचा जमाना असल्यामुळे मुलीने स्वावलंबी व्हायलाच हवंय. आमचा अमित आता चांगल्या जॉबला आहे. त्याच्यासाठी मुलगी शोधत आहोत. काही मुली पाहिल्यादेखील, पण आम्हाला कोणी पसंत नाही आली. आकांक्षाला पाहून आमचे हे तर इतके खूश झाले की त्यांनी तिच्याबद्दल विचारायला सांगितले. तेव्हा तुमचा विचार..." त्या प्रश्नाने ताबडतोब उत्तर देणे शक्य नसल्यामुळे त्या म्हणाल्या,

"माझे मत मी सांगण्यापूर्वी आकांक्षाचे आणि ह्यांचे मत विचारूनच काय ते सांगू शकेन. यासाठी ताबडतोब निर्णय घेणे शक्य होणार नाही." त्यांची तेवढ्या दिरंगाईसाठी थांबणे त्यांना योग्य न वाटल्यामुळे त्या पटकन म्हणून गेल्या,

"हे पाहा हेमलताताई, ह्या योगायोगाच्या गोष्टी असल्यामुळे निर्णय घ्यायला वेळ लावून जमत नाही. आपण सर्व इथेच तर आहोत! एकतर घरी जाऊन निवांत पाच-दहा दिवसांनी विचार करून पुन्हा भेटा असे सांगण्याचा आता जमाना राहिला नाही. कारण हल्लीच्या धावपळीच्या युगात तेवढा वेळ कुणाला आहे? हल्ली कसं, झट मंगनी पट शादी! मुलाने मुलीला पाहिले, मुलीने मुलाला पाहिले,

दोघांनी एकमेकांना पसंत केले की ठरलं लग्न! आई-वडील हे तर नुसते साक्षीचे धनी राहिलेत. आमच्या अमितला तुमची आकांक्षा एकदम पसंत आहे, तुमच्या आकांक्षाला विचारा. तिने जर हो म्हटले की पुढचं आपण इथेच ठरवू शकतो." सानेबाईंचा भयंकर हट्ट पाहून त्यांच्यापासून सुटका करण्याच्या हेतूने सौ. राजे म्हणाल्या,

"त्याआधी असे करू या का... ? याबाबत आधी आपण आकांक्षाच्या वडिलांशी बोलू या!" त्यांच्या त्या अपेक्षित उत्तराने सानेबाई सुखावून ताबडतोब श्री. साने यांना म्हणाल्या,

"अहो, ह्यांचं म्हणणं देखील रास्त आहे. आपण दोघे प्राध्यापक राजेसाहेबांनाच विचारू चला. चला उठा पटकन!" असे म्हणत ती दोघं प्राध्यापक राजे यांच्याकडे निघाली. त्यांची ती घाई पाहून सौ. राजे पार गोंधळून गेल्या. त्यांचा तो हातघाईपणा त्यांना बिलकूल आवडला नाही. पण त्यांच्या आवडीला त्यांनी संधीच न देता ती दोघे चक्क प्रा. राजेंजवळ दाखल झाली. त्यांना जवळ आलेले पाहून सुरुवातीस श्री. राजे त्याना खूश करण्यासाठी म्हणाले,

"व्हेरी गूड मिस्टर साने. अजून तुमचा जोडा तसाच चिरतरुण आहे हं!" त्या अभिप्रायाने लाजून सौ.साने म्हणाल्या,

"इश्श! त्यात काय एवढं? आम्ही आहे त्या इस्टेटीत समाधानी असल्यामुळे आम्हांला कशाची चिंता नाही. त्यामुळे आमच्या तब्येती ठणठणीत आहेत. आता परमेश्वरकृपेने सर्व काही मिळाले आहेच. फक्त मुलाचे दोनाचे चार हात केले, चांगल्या घरची सून मिळाली की मग आनंदी आनंदच." सुनेच्या शोधार्थ ते असल्याचे लक्षात येऊन प्रा. राजे दिलखुलास हसले.

"अरे वाह! म्हणजे आता तुमचे वधू संशोधन कार्य सुरू आहे तर! व्हेरी गुड!" अजाणतेपणे ते बोलले. पण नेमका मुद्द्याला हात घातल्याने सुखावून सौ. सानेंनी आनंदाने विचारले,

"तुमची आकांक्षा आम्हांला फारच आवडली. ती सर्वगुणसंपन्न तर आहेच शिवाय ती लाखात देखणीही आहे.त्यामुळे अशी मुलगी जर आम्हांला सून म्हणून मिळाली, तर त्यापेक्षा मोठं भाग्य नाही, असं आम्हाला वाटतंय. तुमचा काय विचार आहे?" त्या अनपेक्षित प्रश्नाने प्रा. राजेही गडबडले. त्यांना विचारात पडलेले पाहून सौ. सानेच म्हणाल्या,

"तुम्ही आताच उत्तर द्यावे एवढी आम्हांला घाई नाहीय. तुम्ही तिघांनी विचार करून जाते वेळेस काही कळविलेत तरी चालेल !" त्याच प्रश्नाला त्या घट्टपणे चिकटल्यामुळे ते आणखी विचारातच पडले. आपली आकांक्षा खरंच आता विवाहायोग्य झाल्याने आपल्यापासून लवकरच दुरावणार असल्याची प्रथमच झालेली जाणीव त्यांना बोचू लागली. तिचं लग्न होऊन ती सासरी गेल्यावर इतके दिवस सतत तिच्या सहवासात राहिलेले आपण मात्र एकाकी पडणार! इतकी वर्षे घरी आल्यावर सतत तिच्या नावाने हाका मारत तिला काहीबाही सांगत वेळ कसा पटकन जायचा अशा विचारात ते गढून गेले. या विषयावर ते एवढा का विचार करीत आहेत याचा उलगडा न होऊन सौ. सानेंनी त्यांना विचारले,

"अहो साहेब, ह्यात एवढा विचार काय करायचा? आकांक्षा तर इथेच आहे. फारतर तिचा

होय- नाही विचार घेऊन आम्हांला कळवायचं एवढाच प्रश्न आहे." आता मात्र त्यांचा शिक्षकी स्वभाव बाहेर पडून सौ.सानेंच्या घाईला आवर घालण्याच्या हेतूने त्यांनी म्हटले,

"अहो सानेमॅडम, हा काही सहजासहजी एखादं चॉकलेट विकत घेण्यासारखा प्रश्न नाहीय. आकांक्षाच्या सबंध जीवनाचा हा प्रश्न आहे. तेव्हा तिनेदेखील इतक्या घाईगर्दीत निर्णय घेणे मला तरी योग्य वाटत नाही. शिवाय तिला एम.बी.ए. करायचं आहे. ते पूर्ण होण्यापूर्वी तिला लग्नासाठी आग्रह करणे मला तरी रास्त वाटत नाही, तिला वाटेल की आम्हाला तिचा कंटाळा तर आला नाही ना. ती फारच सुज्ञ असल्यामुळे तिनेच विवाहाबाबत निर्णय घेणे योग्य आहे, असे मला तरी वाटते." त्यांची ती नाराजी पाहून श्री. साने विषयांतर करण्याच्या हेतूने म्हणाले,

"बरोबर! अहो, हल्लीचा जमाना निराळा आहे. मुलं इतकी समंजस झालेली आहेत की नोकरी काय किंवा लग्न काय, याबाबतीत त्यांचे निर्णय त्यांनाच घेऊ देणे शहाणपणाचे ठरते. तसं आपलं कर्तव्य म्हणजे हे व्हायचे ते रूढींना किंवा शास्त्राला धरून झालं तर त्यांचं भावी जीवन सुखकर होतं. तुमचा ज्योतिषशास्त्रावर विश्वास आहे की नाही माहीत नाही, पण विवाहापूर्वी मुलांच्या जन्मपत्रिका तपासणे फार जरुरीचे असते. आजवर आपल्या ऋषी-मुनींना हजारो वर्षे अभ्यास करून ज्योतिषशास्त्राचा पाया मजबूत केलेला आहे. त्यामुळे मुलामुलींचे कालसर्पयोग, अशुभयोग, मंगळदोष हे सारे पाहून विवाह केल्यास भावी जीवनातील पीडांपासून त्यांचा हमखास बचाव होतो असा माझा तरी अनुभव आहे." त्यांच्या विषयांतरामुळे प्राध्यापक राजेंचा चेहरा खुलत असल्याचे श्री. सानेंच्या लक्षात आले. त्यांचे बोलून होताच काही वेळ शांत होऊन प्रा. राजे म्हणाले,

"कदाचित, तुमचं बरोबर असेलही. पण माझा या ज्योतिषशास्त्रावर बिलकूल विश्वास नाही. माझ्या वाचनात आलं आहे त्यानुसार मला असे वाटते की मुळात ज्योतिष हे शास्त्रच नाही. कारण शास्त्र म्हटलं की त्याला प्रयोगाने सिध्द करता आले पाहिजे. ज्योतिषाच्या बाबतीत बहुतांश तर्क वापरले जातात. त्यामुळे ज्योतिष हे तर्कशास्त्र असावयास हरकत नाही, असे मला तरी वाटते. जोवर चार-पाच घटना निश्चित घडणारच याची शाश्वती द्यायला कुणी ज्योतिषी पुढे येत नाही आणि आला तर ते खरं ठरल्याचा पुरावा देत नाही, तोवर ज्योतिषाला शास्त्र म्हणून मान्यता मिळणार नाही." त्यावर निराश होत श्री. साने म्हणाले,

"अहो, असे असंख्य पुरावे ज्योतिषशास्त्रात दिलेले आहेत की. पण टीकाकार ते पुरावे एकतर वाचत नाहीत आणि वाचले तरी त्यांना त्या पुराणातील दाखल्यांपेक्षा नवीन दाखले हवे असल्याची सबब सांगून टाकतो. तसं तुमचं एक बरं आहे, तुम्ही आकांक्षाची पत्रिका काढलेली नाहीत. पत्रिका काढली की मग कालसर्पाची शांती, नक्षत्राची शांती, मंगळाचा धोका असले प्रकार डोक्यात घोळत राहतात." त्यांच्या त्या वक्तव्यावर भाष्य करावे म्हणून प्रा. राजे म्हणाले,

"अहो, या युगात मंगळबिंगळ यांच्या दोषाचे विचार नव्या पिढीला कसे पटणार? कारण आता मानव चंद्रावरून मंगळावरदेखील गेला आहे.

तिथे काय आहे, हे तरुणांना माहीत झाले आहे. त्यामुळे जन्मकुंडलीत तो मंगळ चौथ्या की आठव्या स्थानात असलेला पाहून त्याच्यावर विश्वास ठेवणे शक्य आहे काय? उलट आपले अज्ञान पाहून ते आपली खिल्ली उडवतील!" त्यांच्या त्या उत्तराने साने एकदम खूश झाले. त्या आनंदाने ते म्हणाले,

"बरोबर! अहो मंगळ चौथ्या काय किंवा आठव्या स्थानात असला तर तरुण मुलामुलींचे काहीच वाकडे करू शकत नाही. तुमच्या मुलीला एम.बी.ए. पूर्ण करायचे असेल, तर आम्ही तितकी वर्षे थांबायला तयार आहोत हं. कारण एकच, आम्हांला आकांक्षा फारच आवडली आहे." पुन्हा श्री. सानेंचा हट्ट पाहून प्रा. राजे बुचकळ्यात पडले. इतका वेळ गप्पच राहिलेल्या प्रा. सौ. राजेंकडे पाहत ते म्हणाले,

"आकांक्षाच्या लग्नाचं ठरविण्याचा अधिकार माझ्यापेक्षा आमच्या सौ. चा अधिक आहे. त्यांचा विचार नको का ऐकायला ...?" त्यांची ती शिफारस ऐकून पुन्हा खूश होत सौ. साने म्हणाले,


"अगदी बरोबर आहे हं तुमचं. तेव्हा हेमलताताई, समजा आम्ही अद्याप तीन-चार वर्षे थांबायला तयार असलो तर तुमचं आमच्या अमितबद्दल काय मत आहे?" पुन्हा ही ब्याद सुरू झाली वाटून ती टाळण्यासाठी त्या म्हणाल्या,

"ते मी आत्ताच कसे सांगणार हो. तो निर्णय मला वाटतं तीन -चार वर्षांनंतरच घेणे मला तरी योग्य वाटते."

"तेही योग्यच आहे म्हणा. तर प्रा. राजे, आपला घरचा पत्ता माहीतच आहे. पण मोबाईल नंबर दिलात तर बरं होईल. "असे श्री. साने म्हणताच आपले कार्ड देत प्रा. राजे म्हणाले,

"हे माझं कार्ड ठेवा. काहीही काम असेल तर फोन करीत राहा."

झालं, शेवटी त्या प्रश्नाचा तेथेच फडशा पडला होता. पुढे अमितचं लग्न जुळताना मात्र अनंत अडचणी येत गेल्या. त्याला विदेशात नोकरीची संधी आली. योगायोगाने तो चार वर्षांसाठी न्यूयॉर्क येथे गेला आणि त्याने आई-वडिलांना कळवले की तो भारतात परत येईपर्यंत त्याच्या लग्नाचा विचार करू नये. ती वर्षे पटापट निघून गेली. अमित भारतात परतला. त्याला व्होल्टाज कंपनीत मोठ्या हुद्द्याची नोकरी मिळाली. पुन्हा श्री. व सौ. साने यांनी वधू संशोधन सुरू केलं. त्याचं वय वाढल्यामुळे पूर्वीपेक्षा कमी प्रमाणात मुली सांगून येत होत्या. पण बहुतेक प्रौढकुमारिका होत्या. लहान वयाच्या दोनचार मुली पाहिल्या, पण त्यांच्या पत्रिकेतील मंगळ जाचक ठरत होता.



अखेर त्यांनी आकांक्षाचा विचार केला. त्यापूर्वी श्री. सानेंनी आकांक्षाची जन्मपत्रिका तयार केल्यामुळे ती घेऊन सौ. सानेंना त्यांच्या सद्‌गुरूंकडे आज्ञा घेण्यासाठी पाठविले. त्यांनी त्यांच्या गुरूंना दोन्ही पत्रिका गुणमीलनासाठी तपासायला दिल्या. त्यांनी काही आकडेमोड करून त्या पत्रिका नीट

जुळत असून त्यांचा उत्तम संसार होईल अशा आशीर्वादामुळे त्यांनी पुन्हा एकदा प्रा. राजेंकडे मोर्चा वळविला.

रविवार हा सुट्टीचा दिवस पाहून सोबत अमितला घेऊन त्यांच्याकडे निघाले. एक्स्प्रेस हायवेने काही तासांतच साताऱ्याला पोहोचले. दुपारीच त्यांचे घर गाठले. घरात सौ. राजे होत्या. अचानक त्यांना आलेले पाहून त्या मनात थोड्या वैतागल्या. पण वैताग न दाखवता त्यांचे स्वागत करून आत बोलावलं. त्यांना पाणी देता देता विचारलं,

'इकडे कुठे आला होता? महालक्ष्मीच्या दर्शनाला काय?" त्यांच्या प्रश्नाने आनंदी होत सौ.सानेंनी आपला पट्टा सुरू केला,

"आत्ता आधी आमच्या महालक्ष्मीचं दर्शन घ्यायचं मग त्या देवीचं! आकांक्षा कुठे दिसत नाही...?" त्यांचा उतावीळपणा पाहून त्या म्हणाल्या,

"ती किनई वडिलांसोबत नवीन ड्रेस खरेदीला गेलीय."

"अस्सं अस्सं! कुठे साताऱ्याला आहेत ना?" सौ. सानेंनी श्री. सानेंकडे चिंतेने पाहत विचारले.

"हो हो, इथेच गेलेत. एव्हाना यायला पाहिजे होते." त्यांची उत्कंठा संपावी आणि लवकरच त्यांच्या कटकटीतून सुटका व्हावी म्हणून त्यांनी म्हटले.

"काही हरकत नाही. तर आमचा अमित आता अमेरिकेहून परतला आहे. त्याला व्होल्टाजमध्ये मॅनेजरचा जॉब मिळाला आहे. आम्हीही बंगल्यासाठी जागा घेऊन बांधकामाला सुरुवात केली आहे.दोनेक महिन्यांत बांधकाम पूर्ण होईल. म्हणजे काय, अमितच्या नव्या संसाराची सुरुवात त्या बंगल्यात होईल." त्यांना न थांबविता सौ. राजे त्यांचं मुकाट ऐकून घेत राहिल्या. मग त्यांचा आकांक्षाबद्दल पुढील प्रश्न येण्याच्या आतच त्या म्हणाल्या,

"बसा हं, मी चहा घेऊन येते."असे म्हणत टी.व्ही. सुरू करून त्या पाच मिनिटांसाठी आत गेल्या. चहा घेऊन बाहेर येताच डोअरबेल वाजली. दार उघडताच आकांक्षा आलेली पाहून तिला इशारा केला. आकांक्षा आत येताच तिघेही तिच्याकडे अश्यासारखे पाहत राहिले. तिने तिघांना लांबूनच नमस्कार केला आणि हातातील कॅरी बॅग सांभाळत आत गेली. तिला पाहून त्यांचे सुखावलेले चेहरे पाहत सौ. राजे चिंतेत पडल्या, पण तोपर्यंत प्रा.राजे आत आले. सर्व जण उभे राहिलेले पाहून प्रा. राजे म्हणाले,

"अरे, उभे कशाला राहिलात. मी काय शाळा मास्तर वाटलो." त्यांच्या जोकवर सर्व जण हसत खाली बसले. प्रा. राजे यांनी त्यांच्याजवळ बसत विचारले,

"आज कुणीकडे येणं केलंत? गावात कुणाचं लग्न वगैरे आहे का?"

"नाही हो. अमित अमेरिकेरून परतला आणि त्याला व्होल्टाजमध्ये चांगला जॉबही मिळाला तेव्हा तुम्हांलाच भेटायला आलो. हे पेढे घ्या" असे म्हणत सौ. सानेंनी पेढ्यांचा बॉक्स त्यांच्यासमोर धरला. एक पेढा घेत त्यांनी विचारले,

"पेढे कशाबद्दल, अमेरिकेहून सुखरूप परतल्याबद्दल की इथे चांगली नोकरी

मिळाल्याबद्दल ?"

"दोन्हीही आनंदाच्या बातम्यांबद्दल." अमितने सूर काढत म्हटले. तोपर्यंत सौ. सानेंनी आपला मोर्चा सौ. राजेंकडे वळवून चक्क त्यांना पेढा भरविला.

"अरे वाह ! छान पेढा आहे."

"हा बॉक्स तुमच्यासाठीच आहे." असे म्हणत सौ. सानेंनी तो बॉक्स टीपॉयवर ठेवला. मग श्री. सानेंना इशारा केला तसे साने म्हणाले,

"तर प्राध्यापक राजे, आता आकांक्षाने एम. बी. ए. पूर्ण केलं आहे, तेव्हा तिचा पुढचा विचार काय आहे ?" सानेंनी नेमक्या विषयाला हात घातल्यामुळे तो विषय फार न ताणता ते म्हणाले,

"आता तुम्ही सर्व स्वतःच आला आहात तर आकांक्षाचेच मत विचारून घेऊ या! बरं, तुम्ही थकून आला आहात, तेव्हा नाष्ट्याला काय चालेल ? "

"आताच चहा झालाय, तेव्हा नाष्ट्याचं नंतर पाहू या." श्री. सानेंने तोंड उघडत म्हटले.

"बरं, थांबा हं, तिलाच बोलावतो. आकांक्षाऽऽ" प्रा. राजेंनी तिला हाक मारली. तसं सानेंच्या प्रस्तावाची आणि हट्टाची तिला त्यांनी तीन वर्षांपूर्वी बातमी सांगितली होतीच. शिवाय एम.बी.ए. होताच त्यांची टोळधाड कधीही टपकणार असल्याची तिला कल्पना दिली होती. तिने अमितबाबत तेव्हा काही म्हटले नव्हते. त्यांची हाक ऐकून थोड्या वेळाने फ्रेश होऊन आकांक्षा तिथे आली.

"बैस बेटा." ती शांतपणे बसली.

"बेटा, तुझं शिक्षण तर पूर्ण झालंय. आता तुझा लग्नाबाबत काय विचार आहे, हे ह्या सानेपरिवाराला जाणून घ्यायचे आहे. तसं याबाबत तुला डायरेक्ट विचारणे योग्य नाही. पण सर्वांचा स्वभाव मनमोकळा असल्याने मी तसे विचारले. तर सांग, तुला पुढे काय करायचं आहे."

"आता मला नोकरी शोधायची आवश्यकता नाहीच. कारण दादाच्या फॅक्टरीत मलाच हातभार लावायचा आहे." तिने मनमोकळेपणाने म्हटले.

"बरं, हे विचारताहेत की यंदा तुझा लग्नाचा विचार आहे काय ?"प्रा. राजेंनी विचारले.

"दादाच्या फॅक्टरीत एखाद वर्ष काढायचा विचार आहे. बाकीबाबतीत तुमचा विचार मला मान्य आहे." तिने आपलं मत व्यक्त केलं.

"ठीक आहे. तर मिस्टर साने एकंदरीत मामला असा आहे तर!" प्रा. राजे म्हणाले.

"म्हणजे नक्की काय ते आम्हांला समजले नाही," श्री. साने म्हणाले.

"अहो, लग्नाला तिची हरकत नाहीय. पण यंदाच व्हावं असाही त्याचा अर्थ नाही. तुमच्या मुलाविषयी विचारायचं तर आकांक्षा, यांच्या अमितला तू आवडलीस तेव्हा तुझा त्याच्याबाबत काय विचार आहे, कळेल काय ? म्हणजे पाहा, याच क्षणी ह्या सर्वांसमक्ष तू ते सांगावं ही मी अपेक्षा करीत नाही. पण थोडा वेळ विचार करून सांग बस! आता हवं तर तू आत थांब. मी येईन विचारायला ." असे प्रा. राजे म्हणताच आज्ञाधारक मुलीप्रमाणे ती आत गेली. तिच्या पाठोपाठ सौ. राजे. गेल्या. काही वेळ स्तब्धता पसरली. मग हलकेच प्रा. राजे म्हणाले,

"हा एवढा गंभीर विषय आपण एकदम हाती

घेतला. हरकत नाही कुठलंही प्रकरण उगीच ताणून धरण्याचा माझा स्वभाव नाही. तसेच कुठल्याबाबतीत काही आडपडदा न ठेवता बोलणं मला आवडतं. तर अमित, तुम्ही अमेरिकेला तीनेक वर्षे वास्तव्य केलंत, तेव्हा तिथली एखादी भारतीय मुलगी पसंत करून तिथेच स्थायिक का झाला नाहीत? मी तर ऐकून आहे की, अमेरिकेतील ऐश्वर्य, शिस्त, स्वातंत्र्य टाकून भारतात परत येणारी माणसे फारच दुर्मीळ आहेत.''

"खरं सांगायचं तर मला तिथल्या वातावरणात समरस होता आलं नाही. तिथेतर पूर्णतः स्वैराचार आहे. तिथलं वैभव दृष्ट लागण्यासारखं आहे. तिथे राहिल्यावर आपल्या देशाबद्दल खूपच चिंता वाटते. पण का कुणास ठाऊक ते सुख मला नेहमी बेगडी वाटत होतं. म्हणूनच मी भारतात परतलो.'' अमितने स्पष्टीकरण दिलं.

"अरे, एकंदरीत तुझे हे विचार आधुनिक वाटत नाहीत. माणसाने आपल्या पिढीचे विचार स्वीकारायला नकोत काय? आमच्या जुन्या पिढीचे विचार जुने आहेत. जग बदलल्यामुळे आपले विचार बदलायला काय हरकत आहे. मी असे नाही म्हणणार, माणसाने स्वैराचारी व्हावे. कुठल्याही संस्कृतीमध्ये दोष हे असतात, पण त्याहीइतकेच गुणही असतात. त्यांचा माणसाने जरूर स्वीकार करायला हवाय! तुला जर अमेरिकेला स्थायिक व्हायचा व्हिजा मिळणार असेल, तर तू तो स्वीकारण्यात काहीच गैर नाहीय. ते एक प्रगतीचे लक्षण आहे.'' प्रा. राजेंनी आपले आधुनिक विचार मांडले. पण ते त्याला न पटल्याने तो म्हणाला,

"का कुणास ठाऊक, तुम्ही म्हणता तशी मला कंपनीतर्फे ऑफरदेखील आली होती. पण माझं मन आपल्या संस्कृतीला शोधत मायदेशी परतलं. मला तिथे पण आपलेपणा वाटलाच नाही.'' एकंदरीत त्याच्या स्वभावात कोतेपणा असल्याचे प्राध्यापक राजेंच्या मनाने हेरले होते. पुढे अधिक ताणून न धरता त्यांनी विचारले, इथे आल्यावर किती मुली पाहिल्या? म्हणजे तुला सांगून आल्या?'' त्यांनी आपली सत्त्वपरीक्षा पाहायचे ठरविले असल्याचे लक्षात येऊन तो अधिक मोकळा होत म्हणाला,

"मी एका विवाह संस्थेत नाव नोंदविले होते. नेटवर माझ्या साईटवर बायोडेटा दिला होता. त्यानुसार काही मुलींनी प्रपोज्ड केलं होतं. पण आईला त्या तेवढ्या मॉड मुली नाही आवडल्या.'' त्याचं ते उत्तर न पटून त्यांनी विचारले,

"अरेच्च्याऽ! सॉरी मिसेस साने, मी त्याला स्पष्टपणे विचारतो हं. तर ज्या मुलीसोबत तुला संसार करायचा आहे, सारं आयुष्य जिच्या सहवासात घालवायचं आहे, त्यासाठी तुला तिची चॉईस नको का पाहायला?''

"मला माझ्या आई-वडिलांना जपणारी मुलगी जास्त आवडेल. त्याप्रमाणे त्या मुलींना मी सांगितले असता त्यांनी मला स्पष्ट नकार दिला.'' अमितने तेवढ्याच स्पष्टपणे उत्तर दिले.

"ठीक आहे. पण त्यापैकी तुला एखादी मुलगी पसंत आली का? असल्यास का बरे आली?'' प्रा. राजेंनी विचारले.

"मी दोघींना नकार दिला. त्यापैकी एक कारण म्हणजे एकीचा स्वभाव शिष्ट वाटला. तिला जेवण करता येत नव्हतं. आमचा पाहण्याचा कार्यक्रम झाला तेव्हा तिने आई-वडिलांना पायावर डोकं ठेवून

नमस्कार केला नाही. त्यामुळे मला तिचा राग आला आणि मी तिथेच तिला नकार कळविला.'' तो म्हणाला.

"अरेच्चा ! पण हल्ली तसं पाया पडत नाहीत. घट्ट भरजरी साडी नेसल्यावर तसं पाया पडणं किती मुश्कील होतं, हे तुला ठाऊक नसेल. ठीक आहे. दुसरीचं काय झालं... ?'' प्रा. राजेंना त्याच्या स्वभावाची आणखी ओळख झाली. त्यामुळे जास्त खोलात जात विचारले.

"दुसरीच्या पत्रिकेत मंगळ नव्हता. ती फारच सालस आणि सुंदर होती. त्यामुळे तिच्याशी विवाह केल्यास ती दोनच महिन्यांत दगावणार असे ज्योतिषात भाकीत केले होते.'' त्याने स्पष्टतेने सांगितले.

"अरे बापरेऽ ! तू एवढा डिग्री होल्डर असून त्या कुडमुडचा ज्योतिषावर विश्वास ठेवलास ? अरे, ते सारे तर्क म्हणजे थोतांड आहे. ते पोटभरू लोक काहीही भीतिदायक तर्क सांगून ग्रहशांतीसाठी मोठी रक्कम उकळत असतात. कोण मूर्ख ज्योतिषाचे ऐकलेस आणि चांगल्या मुलीला मुकलास रे ?'' प्रा. राजे कळवळून म्हणाले.

"तो कुणी कुडमुडचा ज्योतिषी नव्हता तर खुद्द माझे पप्पाच होते.'' त्याने कबुलीजबाब देत म्हटले.

"मग सॉरी यार!'' त्यांनी सानेंकडे माफीच्या आवेशात पाहिले. तसे साने शांतपणे म्हणाले,

"तसं विषाची परीक्षा पाहा कशाला, असे वाटून मी त्याला सांगितले.'' साने म्हणाले.

"ठीक आहे. जे नशिबी आहे तेच होणार. त्यासाठी ज्योतिषाची गरज नाही, हे माझे विचार आहेत. आमच्या आकांक्षाचाही ज्योतिषावर विश्वास नाहीय. मी माझ्या मुलीची पत्रिका वगैरे बनवलेली नाही हे तुम्हांला ठाऊकच आहे. तिला मंगळ आहे की नाही याचा मी किंवा आमची आकांक्षा विचार करणार नाही. आता आमचे पंच आतमध्ये गेलेत, पाहू या आमच्या पंचांचा काय निर्णय होतोय ते.'' असे म्हणताच गांभीर्य जाऊन तिथे हशा पिकला. मात्र श्री. साने न राहून म्हणाले,

"तुम्हाला मी मागे मोबाईल करून विचारल्याप्रमाणे आकांक्षाची जन्मतारीख आणि वेळ यावरून ही पाहा तिची जन्म पत्रिका तयार केली आहे. तिचा बराच वेळ बारकाईने अभ्यास केला. त्यावरून असा तर्क निघाला की तिलादेखील मंगळ आहे. पण अमितच्या अष्टम स्थानी नीच राशीचा मंगळ असल्यामुळे अरिष्टकारक आहे. त्यामुळे दुसऱ्या ज्योतिषाचा सल्ला घेतला असता त्याने काही शांत करून विवाहास होकार दिला आहे.'' श्री. साने चाचपडत म्हणून मोकळे झाले.

"अरे बापरे! इतकं रामायण सांगून हा मंगळ काही माझा पिच्छा सोडत नाही तर! तुम्ही त्या ज्योतिषाकडे खात्री केली आहात ना, मग ठीक झालं. शेवटी काय, त्याच्या श्रध्देचा हा प्रश्न आहे. मला एखादी गोष्ट अंधश्रध्दा वाटली, ती दुसऱ्याला वाटेलच असेही म्हणता येत नाही.'' असे म्हणत असताच सौ. राजे खुशीतच बाहेर आल्या. त्यांना आनंदी पाहून प्रा. राजे म्हणाले,

"एकट्याच काय खुशीने हसता? काय आनंदाची बातमी आहे ते सर्वांना कळू द्या!'' तशा त्या लाजत म्हणाल्या, -

"आकांक्षा म्हणाली की मी वडिलांच्या आज्ञेबाहेर थोडीच जाणार ?'"

"असं ! म्हणजे झालं. माझी आज्ञा काय ? तर मंडळी हे असं आहे तर. थांबा मीही तिच्या तोंडून ही गोड वार्ता ऐकून येतो तर !'' असे म्हणत ते पटकन आत गेले. काही वेळाने तिला घेऊन बाहेर येत म्हणाले,

"तर मंडळी आमचा होकार आहे. आकांक्षाने तूर्तास नोकरीचा बेत पुढे ढकलून लग्नास होकार दिला आहे. तेव्हा तुमचा काय बेत आहे ते सांगा ?'' तशा अत्यानंदाने सौ. साने उभ्या राहत श्री.सानेंना आणि अमितला म्हणाल्या,

"आता तुम्ही दोघांनी तुमचा बेत सांगा ना !'' तसे साने खुशीने म्हणाले,

"आमचा होकार तर चार वर्षांपूर्वीच आहे !'"

"चला मंडळी, बरं झालं. या आनंदात आता ते पेढे अमितच्या हाती द्या. पहिला पेढा तुझ्या हस्ते आकांक्षाला दे.'' तो उतावीळपणे उठला आणि आकांक्षाला पेढा दिला. तिनेही त्याला पेढा दिला. मग त्याने पुन्हा श्री. व सौ. राजेंना पेढा भरवून आई-वडिलांना पेढे दिले. आकांक्षाने अमितच्या आणि स्वतःच्या आई-वडिलांच्या पायांवर डोकं ठेवून नमस्कार केला. तसे प्रा. राजे म्हणाले,

"हे बघ अमित, असा नमस्कार ही वारंवार करणार नाही हं आणि तूही अपेक्षा करू नकोस. कारण...'"

"कारण आता मला कळलंय.'' असे म्हणतच सर्वांनी एकमेकांना आनंदाने मिठ्या मारल्या.

कुंकू लावण्याचा कार्यक्रम झाला. विवाहाची तारीख निश्चित करून हॉल बुक करण्यापासून सारी तयारी होऊन विवाह सोहळा मोठ्याा उत्साहाने पार पडला. नव्या बंगल्यात नववधुवराने गृहप्रवेश केला. देवधर्म, हनिमून, पाहुणचार इत्यादी पार पडला. सणासुदीला माहेरी जाऊन जावयाचे कोडकौतुक करण्यात एक वर्ष केव्हा निघून गेलं कळलंच नाही. दोघांचा सुखाचा संसार पाहून साने कुटुंबीय, राजे कुटुंबीय मिळून विदेशवारी करून आले.

आता आकांक्षाला घरात बसून कंटाळा येऊ लागल्याने तिने नोकरी करण्याची इच्छा अमितकडे बोलून दाखविली. त्यानेही तिला होकार दिला आणि त्यांच्याच कंपनीत तिला जॉब मिळाला. दोघेही सोबत ये-जा करू लागले. काही दिवसांनी त्याच्या कामाचा व्याप वाढला आणि कंपनीने त्याला



बढती देऊन त्याच्यावर सेल्स मॅनेजरची जबाबदारी टाकली. त्यामुळे त्याला फिरतीची ड्युटी लागली. दर आठवड्याला दूर दूर जावं लागलं. कधी दिल्ली, कधी चेन्नई तर कधी बंगलोर असा प्रवास सुरू झाला. तरीही त्यांच्या प्रपंचाचा गाडा व्यवस्थित चालला होता.

लग्नाला एक वर्ष झाल्यामुळे सासुबाईंनी तिला मुलाविषयी विचारणा केली. तेव्हा तिने अजून एक वर्ष थांबायचा विचार सांगितला. अमितला आईने खडसावले की आता जास्त थांबण्याचे कारण काय ? तेव्हा त्याने तो एकतर्फी निर्णय आकांक्षाचा असल्याने

सांगितले. आईने त्याला खडसावले की, तू या बाबतीत तरी तिचं ऐकू नकोस. ही वेळ एकदा टळली तर पुढे मूल व्हायला खूप त्रास होईल. पण उगाच कधी नव्हे तो वाद होणे योग्य नाही असे वाटून त्याने ते तेवढं मनावर घेतलं नाही. मात्र आईने त्याला टोचणे सुरूच ठेवून वेगवेगळी उदाहरणे देऊन भीती घालत राहिल्यामुळे तो अधूनमधून आकांक्षाला सक्ती करू लागला. तिचा नकार कायम राहिल्याने त्याने दुसरंच निमित्त काढून त्यांच्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी घेऊन गेला. डॉक्टरांनी तिची तपासणी करून काही टेस्ट घेण्यास सांगितले. काही दिवसांनी रिपोर्ट आल्यावर ते तपासणीसाठी गेले असता डॉक्टरांनी लवकरच मूल होण्याची तयारी करण्याचा सल्ला दिला. पण तो सल्ला आकांक्षात तेवढासा पटला नाही. त्या डॉक्टरांना आईने पढविल्यामुळेच त्यांनी तसा सल्ला दिला असल्याने तिने अमितला सांगताच तो खूप संतापला. आपल्या आईला एवढे खोट्यात पाडल्याचे ऐकून रात्री त्याने तिची खूप खरडपट्टी काढली. त्याचा तो आवेश तिला सहन न होऊन ती रुसून बसली. ती रात्रभर मुसमुसत जागी राहिली. दुसऱ्या दिवशी ड्युटीवर न जाता, न खातापिता रुसूनच राहिली. तिचा मोबाईल करून विचारलं असता तिने त्याच्याशी बोलणे टाळले. संध्याकाळी तो जेव्हा घरी परतला तरी तिने त्याच्याशी अबोला धरला. त्याने तिला खूप विनवणी करून जेवणाचा आग्रह केला तरी ती ऐकेना हे पाहून त्याने संतापून तिच्या दोन थोबाडीत दिल्या. तरी ती निमूट, अबोलच राहिली. पुन्हा रात्रभर मुसमुसत राहून तिला न्यायला या म्हणून वडिलांना फोन केला. दुसऱ्या दिवशी आई-वडील घाबरेघुबरे होऊन आले. तिने त्यांनादेखील काहीच कारण सांगितले नाही. तेव्हा त्यांनी अमितला काय झालं ते विचारलं. त्याने सर्व काही खरं सांगून तिची माफी मागितली. पण तिचा राग शांत झाला नाही. अखेरीस दोन दिवसांसाठी तिला माहेरी नेतो सांगून ते तिला सोबत घेऊन गेले.

दोनाचे चार दिवस झाले तरी तिचे मन सासरला जायला राजी होत नव्हतं. पण वडिलांनी तिची शांतपणे समज काढून एवढ्या साध्या कारणासाठी तू रुसणे योग्य नाही हे तिला पटवून तिला सासरी घेऊन गेले. त्या दोघांचा अबोला दूर करून ते घरी परतले. ती पुन्हा अशी रुसू नये म्हणून जरी कुणा नातेवाईकांनी तो विषय काढला तरी अमितनेही मुलाचा विषय काढण्याचे टाळले. अशा प्रकारे त्यांच्या संसाराची गाडी सुरळीत सुरू झाली. पंधराएक दिवस झाले तोच अमित ऑफिसमधून आला नसल्यामुळे तिने मोबाईल केला. पण त्याने तो अटेंड केला नाही. तिने बऱ्याच वेळा मोबाईल फिरवून देखील तो अटेंड करीत नाही हे पाहून ती घाबरीघुबरी झाली. तिने ऑफिसमध्ये चौकशी केली असता तो सात वाजताच बाहेर पडल्याचे सांगण्यात आले. सासूसासऱ्यांना सांगितले तर तो रेंजमध्ये नसल्याचे समजले. काहीतरी अघटित तर घडले नाही ना असे वाटून सारे चिंतेत राहिले. सासऱ्यांनी तिच्यासोबत तिची कार काढून ऑफिसपर्यंत शोधून परत आले. रात्री उशिरा त्याची गाडी आली. डोअरबेल वाजताच तिने पळत दरवाजा उघडला, तर तो झिंगलेल्या अवस्थेत दिसला. त्याचं ते रूप पाहून ती काहीच न बोलता बेडरूममध्ये जाऊन पडून राहिली. सौ. सानेंनी त्याला जेवणाचा आग्रह केला तेव्हा त्याने

जेवून आल्याचे सांगितले. ऑफिसमधल्या कुणाच्या मुलाची बर्थडे पार्टी असल्याचे त्याने सांगून तो बेडरूमकडे गेला. त्याचे आई-वडील हॉलमध्ये चिंतेत बसून जागेच राहिले. तिला झोपलेले पाहून खूप राग आला. तो तिला बळजबरी करून जागी करू लागला. तिने त्याला झिडकारल्यावर त्याने बळजबरी करण्याचा प्रयत्न केला, तशी ती बेडरूममधून हॉलमध्ये पळून आली. सासूसासऱ्यांना पाहून ती थबकली. सासूने तिला त्यांच्या बेडरूममध्ये नेऊन झोपायला सांगितले. बराच वेळ तिला जागी राहिलेली पाहून सासूने समज काढण्याचा प्रयत्न केला. त्याच्या दारू पिण्याने तिला संताप आला होता. पण सासूने सांगितले की तो पहिल्यांदाच प्यायला आहे. यापूर्वी त्याने कधीही स्पर्श केलेला नव्हता. दोन दिवस तसेच अबोल्यात गेले. तिसऱ्या दिवशी ते दोघे ऑफिसमधून लवकर परतले आणि सासूसासऱ्यांसोबत नातेवाइकांच्या रिसेप्शनला गेले. तिथून परतल्यावर त्यांचा अबोला तसाच होता. रात्री त्याने तिला सांगितले की तिने त्या नोकरीचा राजीनामा द्यायचा. तिला आश्चर्य वाटलं. तिने हो की नाही काहीच उत्तर दिले नाही. त्यामुळे चिडून त्याने तिच्या दोन थोबाडीत लावल्या. तिची ओरड ऐकून सासूसासरे हॉलमध्ये आले. त्याला हाक मारली तसा तो त्यांच्याजवळ आला. त्याने भांडणाचे कारण असे सांगितले की आता तिने नोकरीवर जास्त लक्ष देण्यापेक्षा संसारात लक्ष देण्यासाठी नोकरी सोडावी. आपण कमावतो याची तिला जास्त घमेंड झाल्याने ती माझे ऐकत नाही. आपल्याला तिच्या पगाराची काय आवश्यकता आहे? वडिलांनी त्याची शांतपणे समज काढून सांगितले,

"सुनबाई बिलकूल समंजस आहे. तू थोडी तडजोड करून शांत राहा, समजलं?'"

त्याला ते पटत होते, पण आकांक्षा बिलकूल तडजोड करीत नाही हे पाहून तो अधिक संतापत होता. तो तसाच चूपचाप बेडरूममध्ये जाऊन झोपी गेला. सकाळी तिने वडिलांना फोन करून कळविले. तसे ते आले. त्यांनी काय झालं त्याबाबत तिला विचारून तिची समज काढून ते निघून गेले. साने मात्र या प्रकाराने खूपच अस्वस्थ झाले होते. दोघंही समंजस असताना एकाएकी हे का होत आहे याबाबत ते विचार करीत असताना हा प्रकार ग्रहदशेचाच आहे असे वाटून सकाळीच ते गोस्वामींकडे ज्योतिष पाहायला तडक निघून गेले. दोघांच्या पत्रिका समोर ठेवताच त्याने काही वेळ निरीक्षण करून त्यांना बजावले, ''मी तुम्हांला पूर्वीच सांगितले होते की हा विवाह करू नका. तेव्हा तुम्ही मानलं नाही. आता तरी ऐका, हे दोन दिवस ह्या मुलीला भयंकर अरिष्टकारक आहेत. तिचा नक्कीच एखाद्या स्फोटाने मृत्यू ओढवले.'' ते ऐकून साने एकदम घाबरले. यावर काहीही उपाय करायला सांगा मी तो करणार. तसे ते म्हणाले,

"उपाय एकच, तिला ह्याच्या नजरेपासून दोन दिवस दूर ठेवणे. कुठेही अनोळखी जागी ठेवा. नाही तर हा तिचा विनाश करणारच!'' साने गलितगात्र होत पटकन घरी आले. प्रा. राजे सौ. सोबत संतापून आले होते. त्यांना भेटून त्यांची माफी मागून त्यांना त्या ज्योतिषाचे भाकीत सांगून तिला कुठेही दोन दिवसांसाठी दूर नेण्यास सांगितले. तो अजब प्रकार पाहून मुलीच्या भल्यासाठी त्यांनी तिला विचारणा केली. तिच्यात बिलकूल त्राण राहिले

नव्हते. का, कुणास ठाऊक तीदेखील थरथर कापत होती. तिची दया येऊन त्यांनी ज्योतिषाच्या सल्ल्याप्रमाणे तिला दोन दिवस अमितपासून दूर ठेवण्यासाठी तिला घेऊन गेले. त्याला त्या दिवसापेक्षा जास्त नशेने झिंगलेला पाहून त्याचे आई-वडील घाबरूनच गेले. त्याने आल्या आल्याच परत आदळआपट करून त्याने सिलिंडरची ट्यूब उपटली. वडिलांनी पटकन गॅसचा कॉक बंद केला. तो सिलिंडर घेऊन तिला शोधत राहिला. बराच त्रागा केल्यावर ती माहेरी गेल्याचे सांगितले. तसा बाहेर जायला निघाला. त्याला आईने अडवण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो आवरेना. वडिलांनी त्याला ताकदीने घट्ट पकडून ठेवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना त्याने सहज ताकदीने दूर करून तो निसटून बाहेर पडला. कार सुरू करून सुसाट वेगाने निघाला. ती रात्र दोघांनी जागून त्याची वाट पाहण्यात काढली. त्यांनी त्या ज्योतिषाला मनोमन धन्यवाद दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो परतला. त्याचे डोळे लालभडक आणि क्रूर दिसत होते. त्याला नजर भिडवण्याचा दोघांनाही धीर झाला नाही. ते चूपचाप बसून राहिले. त्याने आरडाओरडा करून आकांक्षाला घाणेरड्या शिव्या द्यायला सुरुवात केली. त्याच्यामध्ये खरोखरच राक्षस शिरला होता. त्यानंतर दिवसभर तो झोपूनच राहिला. रात्री जाग आल्यावर परत त्याने त्रागा करून आदळआपट सुरू केली. पुन्हा आवेशाने गाडी बाहेर काढून तिचा शोध काढत निघाला. ती रात्रदेखील त्याने बाहेर काढली. सकाळी परतला तो तसाच. काय करावे काहीच न सुचून दोघेही पुतळ्यासारखे निश्चल राहिले. तो पुन्हा दिवसभर झोपून राहिला. रात्री मात्र खूप भूक लागल्याने जेवण मागू लागला. आईने पटापट जेवण करून त्याला जेवण वाढले. तसा तो दोन-तीन माणसांना पुरेल एवढा जेवला. जेवण होताच तो एकदम शांत झाला. आपल्याला काय झालंय? डोकं का जड झालंय? असे काहीबाही विचारू लागला. नंतर आकांक्षाची आपुलकीने चौकशी करू लागला. जसं काही झालंच नाही असं.

"आकांक्षा अद्याप ड्युटीवरून आली नाही काय? तिची तब्येत बरी नाही काय? ती माहेरी गेलीय काय?" असे काहीबाही प्रश्न विचारून पुन्हा तो शांत झोपी गेला. ठरल्याप्रमाणे तीन दिवसांनी आकांक्षांचे वडील त्यांच्या घरी परतले. गेले तीन दिवस हे त्यांच्या जीवनात अविस्मरणीय ठरलेले होते. अचानक ठरलेला तो सुनामी चक्रावर्त त्यांच्या मनाला खिळखिळा करून गेला होता. बराच वेळ झाला तरी ते हॉलमध्ये येरझारा घालीत राहिले. आपल्या हातून प्राणप्रिय पाडसाची हत्या झाल्यागत अपराधी भावनेनं त्यांचं अंग थरथरत होतं. मन अत्यंत कासावीस झालं होतं. त्याच अवस्थते ते आरामखुर्चीत बसून छताकडे पाहत राहिले. कित्येक वर्षांपूर्वी झेकोस्लाव्हाकियाहून आणलेला तो महागडा झुंबर अद्यापही तसाच तजेल होता. पण आज तो लावण्याचं धाडस न होऊन ते तसेच झिरोचा बल्ब लावून अंधारातच बसले होते. जेव्हा त्या झुंबराचा मुहूर्त आकांक्षाच्या हस्ते केला होता, तेव्हा ती पाच वर्षांची होती. त्याच्या काचांमधून पडणारी रंगीबेरंगी किरणे पाहून ती टाळ्या पिटून उड्या मारत राहिली होती, हे सारं का झालं असावं? अमितचा स्वभाव

एवढा क्रूर असू शकतो...? एवढा शिकलासवरलेला, विदेशवारी करून आलेल्या, असंख्य प्रतिष्ठित माणसांचा मित्र असलेल्या या माणसाने आकांक्षाला जाळून मारण्याइतपत एकाएकी इतके क्रौर्य कृत्य करण्याचा विचार कसा अनावर व्हावा? त्याला त्याची प्रतिष्ठा किंवा नावलौकिक यांचा जरादेखील विचार आला नसेल काय? आपण त्याला लग्नाला होकार देऊन तर काही चूक केली नाही. त्याला तडकाफडकी लग्नास होकार न देता आकांक्षानेसुध्दा त्याला बरेच दिवस विचार करूनच होकार दिला होता. मग एकाएकी त्याच अवधीत मूल होण्यास आकांक्षाने होकार दिला नाही हे काय एवढे मोठे कारण होत नाही. मग त्याला असं वेड्यासारखं वागायला एकाएकी काय झालं असावं...? त्याला तसा आजारही नाही याची त्यांनी त्याच्या वडिलांकडे उटीहून फोनवर खात्रीदेखील केली होती. पुन्हा अवस्वतेने ते फेऱ्या मारू लागले. मग एकाएकी त्यांना आठवले ते त्याच्या ज्योतिषाबाबत. त्या विचाराने पुन्हा ते अस्वस्थ झाले आणि सोफ्यावर बसून दोन्ही हाताने डोकं धरून राहिले. लग्न ठरण्यापूर्वी अमित त्याच्या मंगळाविषयी काही म्हणाला होता. पण नेमकं तेच कारण असू शकत नाही. त्यांनी त्याबाबत मेंदूला ताण देताच त्या वेळचे अमितचे ते बोल आठवले, त्याने एका मुलीला त्याचा मंगळ तिला मारक असल्याने नकार दिला होता. त्याने आपल्याला तसे बजावूनसुद्धा आपण त्याच्याकडे दुर्लक्ष केलं होतं. पुन्हा त्यांना आपल्या मनाच्या भाबडेपणाचं हसू येऊन ते उठले. खिडकीतून पश्चिमेकडे आकाशात पाहिले. दूरवर एक मोठी चांदणी लुकलुकत होती. शुक्र, बुध किंवा मंगळ ग्रह असावा. दगडमातीचे ते ग्रह! त्यांना गुरुत्वाकर्षणाने बांधल्यामुळे ते सूर्याभोवती ठरावीक गतीने फिरत असतात हे आपण शाळेमध्ये भूगोलात शिकलो होतो, तेवढेच! त्यांचे आकारमान, सूर्यापासूनची अंतरे, त्यांचे उपग्रह ही माहिती परीक्षेत स्कोअरिंगसाठी तोंडपाठ केली होती, एवढीच आपली ग्रहताऱ्यांच्या अभ्यासाची मर्यादा आहे. या ज्योतिषांनी त्यांच्याबाबत काय काय तर्कवितर्क काढून त्यांच्या गतीचा संबंध मानवी जीवनाशी लावण्याचा केवढा उपद्व्याप केलेला आहे. ते सारं थोतांड आहे असे समजून त्यांचे सिद्धांत झिडकारणारे आपण तेवढे सखोल अभ्यासक नाहीत, हे कारण असू शकते काय? अमितने तेव्हा जे काही त्याच्या मंगळाचे भाकीत सांगितले होते ते आता खरे कसे झाले...? मिस्टर साने हेसुध्दा सुशिक्षित असून चांगल्या हुद्द्यावर काम कारणारे असून त्यांचा ज्योतिषावर विश्वास आहे; त्याचे कारण ते अंधश्रध्दाळू आहेत की ते ज्योतिषाचे अभ्यासक आहेत म्हणून? ते काही असेल ते असो, झाल्या प्रसंगाने सावध होऊन आकांक्षाला त्या प्रसंगातून पूर्ण रिलॅक्स करून लवकरच आपल्याला आकांक्षाच्या भावी जीवनाचा निर्णय डोळसपणे घ्यायला हवाय. तेवढ्यातच वडिलांचा मोबाईल आला. त्यांनी अमितची चौकशी करून काय काय त्रागा केला ते विचारले. ते सांगताच त्यांनी म्हटले,

''आता आमची आकांक्षा पुन्हा तुमच्या घराची पायरी चढणार नाही, एवढेच अमितला सांगा.'' असा निरोप देत त्यांनी मोबाईल बंद केला आणि श्री. सानेंनीदेखील सुटकेचा निश्र्वास टाकला.

**_With Best Compliments from_**

Happy
Home


# Happy Home

# Group

# परमेश्वर

**- गजानन धर्मा म्हात्रे**

जीवनात जे काही प्राप्त करायचे होते ते सर्वच आपल्याला मिळाले आहे, हे पाहून महेंद्रशेठना आपण जगातील सर्व सुखी झाल्याचे समाधान वाटले. त्यांच्याइतकाच त्यांचा मुलगा बांधकाम व्यवसायात स्थिरावला होता. मुलीला विदेशात व्यवसाय करणारा कर्तृत्ववान जावई मिळाल्यामुळे त्यांची फार मोठी चिंता दूर झालेली. आता नातवंडासोबत आयुष्य अगदी मजेत चाललं होतं. कालचा अमृतमहोत्सवी वाढदिवस राजेशाही थाटामाटात पार पाडला होता. खंडाळ्यातील सर्वांत महागडा आणि आलिशान



अशा 'जन्नत रिर्सोट' वरील पाहुणचारावर सर्वजण बेहद खूश झाले होते. नातेवाईक आणि व्यवसाया संबंधित मित्र असे मिळून चार-पाचशे लोक उपस्थित होते.

मावळत्या संध्याकाळच्या प्रसन्न वातावरणात सुरेल गीताची मैफल रंगात आली होती. जसजशी प्रकाशाची जागा अंधाराने घेतली तसंतसं तिथलं वातावरण धुंद झालं होतं. मग हॅपी बर्थ डे टु यू... या गाण्याने सुरू झाला वाढदिवसाचा समारंभ. त्यांना शुभेच्छा दिल्यावर मनोगत व्यक्त केलं,



"आज मला कोणत्याही गोष्टीची कमतरता नाही. स्वर्गसुखाच्या ज्या कल्पना असतील त्या सर्व मी उपभोगत आहे!" महागड्या मदिरेचा आस्वाद घेत सारेजण नृत्याच्या मैफलीत सहजतेने सामील झाले.

'तृप्ती निवास' हा त्यांचा बंगला म्हणजे छोटा राजमहालच होता. एकेका कंत्राटामध्ये करोडोंचा नफा होऊ लागला, तसा त्यांच्या कामाचा व्यापही वाढत गेला. इंजिनियर, आर्किटेक्ट, मुकादम, अकौंटंट, क्लार्क, ड्रायव्हर, मजूर अशा अनेक नोकरांवर देखरेख ठेवून त्यांची चोख व्यवस्था पाहणे त्यांना गावी राहून शक्य नसल्याने ते गाव सोडून शहरात राहायला आले. सुरूवातीस एका सोसायटीत फ्लॅट घेतला. पण सकाळ- संध्याकाळ कामगारांची आणि व्यवसायासंबधित अनेक लोकांची ये-जा वाढल्यामूळे त्यांनी करोडो रुपये खर्चून हा आलिशान बंगला बांधला. सभोवार सुगंधी फुला-फळांचे वृक्ष फोफावल्याने बंगल्याच्या सुंदरतेत अधिकच भर पडली. वयानुसार हल्ली ते मॉर्निंग

वॉकला भल्या पहाटे टॅरेसवर जाऊन फेरफटका मारून झाल्यावर तासभर पहाटेची मजा चाखत. त्यानंतर तळमजल्यावरील स्विमिंग पुलमध्ये तासभर पोहण्याचा व्यायाम करण्याचा दिनक्रम.

"आजोबा, तुम्ही देव पाहिलात का? तो कसा दिसतो? त्याला नातवंडं आहेत काय? तो कुठे राहतो, तो काय खातो? तो काय करतो? देवबाप्पा आपण मागू ते देतो काय? तुम्हीच नाही सांगू शकत, मग देव आहे, हे खरं कशावरून?..." असे एक नव्हे, त्या चिमुरडीचे असे असंख्य प्रश्न!



टेरेसवर सुदंर सजावट केल्याने रोज सकाळ-संध्याकाळ मोकळ्या आकाशाचे वैभव आणि निसर्गाच्या विविध रंगछटा पहाणे हा त्यांचा सर्वांत आवडीचा छंद झालेला. त्याचे खास मित्र आले की इथेच त्यांची मैफल बसवत. काळोख्या रात्री तर कित्येक तास चांदण्याच्या करामती पहात बसत. त्यांची नात वेदीका कॉंव्हेंटमधील चौथ्या इयत्तेत गेल्यापासून होमवर्क उरकल्यावर झोपेपर्यंत त्यांची सोबत सोडत नसे.

कालच्या थकव्यामुळे लवकरच जेवणं उरकून सारे झोपी गेले. रात्रीचे दहा वाजायला आले होते. महेंद्रशेठना झोप आली नाही म्हणून ते टेरेसवर येरझारा घालून आरामखुर्चीवर पहुडले. नुकतेच हस्त नक्षत्र सुरु झाल्याने आकाश एकदम स्वच्छ होऊन वर अगणित चांदण्या चमचम करत होत्या. पूर्वेकडे चित्रा नक्षत्राची ठळक चांदणी उगवली होती. स्वाती नक्षत्राची छडी आणि विशाखेचं लाटणं, ज्येष्ठेचं कुंकवासारखं ठळक चमकणं; ही सारी नक्षत्रांची किमया त्यांना आनंदित करून गेली. शनी ग्रहाचं मंद तेज निरखून झाल्यावर त्यांनी आकाशाच्या मध्यान्ही येणाऱ्या धनिष्ठेची चौकडी म्हणजे ग्रामीण भाषेत **जौऱ्याचा खाटला** त्यांनी ओळखला. दूरवर पसरलेल्या आकाशगंगेत चमचमणारे लाखो तारे-तारका पाहत पाहत ते तंद्रीत हरवून गेले. लहानपणी मळणीच्या हंगामात खळ्यामध्ये भाताचे उडवे राखण करताना सवंगड्यांसोबत कित्येकवेळा असं आकाश पाहिलं होतं. आज त्यांच्या चिमुरड्या नातीने, वेदिकाने त्यांना या आकाशाचा वेगळ्या अर्थाने विचार करायला लावला होता.तिने सहजतेने विचारले,

"आजोबा, तुम्ही देव पाहिलात का? तो कसा दिसतो? तो कुठे राहतो, तो काय खातो? तो काय करतो? तो देवबाप्पा आपण मागू ते देतो काय? नाही सांगू शकत, मग देव आहे, हे खरं कशावरून?..." असे एक नव्हे, असंख्य प्रश्न वेदिका सहजपणे विचारून गेली. पण त्या प्रश्नाने त्यांना संभ्रमात पाडलं होतं. आजवर या गोष्टींचा तितका विचार करायची गरज भासली नव्हती.

सिव्हिल इंजिनिअरची डिग्री घेतल्यावर सरकारी खात्यात नोकरी मिळाली होती. व्यवसाय करायचे स्वप्न असल्याने ते कंस्ट्रक्शनमध्ये शिरले आणि पटकन नावलौकिक कमावला. आजवरच्या अनेक धार्मिक ग्रंथ वाचून आणि वडिलोपार्जित संस्कारांमुळे देवाचं अस्तित्व मानलं होते. पण चिमुरड्या नातीच्या प्रश्नांचे निरसन सहजपणे करून तिला समजावणं अवघडच काम होतं. त्यासाठी पुन्हा अनेक ग्रंथ नजरेखालून घालायला हवेत किंवा कोणा तज्ज्ञ मित्राचा सल्ला घ्यायला हवाय. प्रत्येक शुभकार्यात त्यांनी परमेश्वराची पूजाअर्चा, होमहवन सारे काही केले होते. अनेक साधुसंत, ज्ञानी पंडित, ज्योतिषी, पुजारी, तांत्रिकमांत्रिक यांचे निःसंदेह सल्ले घेतले होते. पण या चिमुरडीला ते सारे पटवून देणे अवघड असल्याने ते अस्वस्थ झाले होते.

त्या अस्वस्थेत त्यांनी हॉलमध्ये जाऊन पुस्तकांच्या रॅक उघडून पंचांग काढले. त्यांच्या हालचालीची सौ. मीनाक्षी यांना चाहूल लागलीच. डोळे चोळीत त्या बेडरूममधून त्यांच्याजवळ आल्या आणि दबक्या आवाजात विचारले,

"काय हो, सगळे गाढझोपी गेले, तरी तुम्ही जागेच आहात ? बरं नाही का वाडत ? " त्यांनी हळू आावाजात म्हटलं,

"तसं काही नाही गं. आकाशात छानपैकी चांदण्या चमचमत आहेत. पण आता कोणते ग्रह आहेत, ते पहायला हे पंचांग न्यायला आलोय. तुला यायचंय का.. ?" ते ऐकून त्या जांभई देत म्हणाल्या,

"छे बाई! कालच्या धावपळीत मी पार मरगळलीय. त्यात मला लवकर उठायचंय. सुनबाईचं डोकं दुखतंय, तेव्हा वेदिकेची शाळेत जायची तयारी करायचीय. तुम्ही काय ते ग्रह-तारे रात्रभर पाहत बसा. मी जाते झोपायला." त्या गेल्यावर ते टेरेसवर गेले.

आपल्या पुरातन ऋषीमुनींनी आकाशगंगा, तारे, ग्रह आणि त्यांची नक्षत्रे, राशी यांच्या गती, धूमकेतू, उपग्रह, चंद्राच्या कला यांचा अभ्यास करून वर्ष, महिने, आठवडे, दिवस, ऋतू तयार केले. समुद्राची भरती-ओहोटी आणि त्याचे सजीवांच्या जीवनावर होणारे परिणाम शोधले. याचे त्यांना कौतुक वाटले. नातीच्या प्रश्नाने ते फारच अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेत ते पंचागातीला ग्रहांची स्थिती पाहून एकेक ग्रह हुडकून काढू लागले. आज शनीशिवाय कोणताच ग्रह आकाशात नव्हता. कुंभेतील नेपच्यून किंवा धन राशीतील प्लुटो उघड्या डोळ्यांनी दिसणे संभव नव्हते. मग काय, तुळेपासून मीनेपर्यंतची एकेक नक्षत्र धुंडाळताना एक तास केव्हा निघून गेला कळलेच नाही. मध्येच सिंहेतून दोन उल्का निखळलेल्या दिसल्या. हवेत बराच गारठा वाढला. डोळे पेंगू लागल्याने ते टेरेसवरून बेडरूममध्ये आले आणि पटकन निद्रिस्त झाले.

पहाटे पहाटे त्यांना जाग आली तसे ते त्या विचारात गढून अंथरुणातच पडून राहिले. इंजिनिअरिंग परीक्षेच्या पहिल्या पेपरास जाण्यापूर्वी ते लक्ष्मी मंदिरात जायला निघाले असता त्यांचा वर्गमित्र दिवाकर रेगे त्यांना खोडसाळपणे म्हणाला होता,

"अरे भिडू महेंद्र, सरस्वतीला मस्का लावून तू जर पास होणार असशील तर मग इतके वर्षे अभ्यास तरी कशाला करीत होतास ? तेवढी वर्षे

इथेच, या मंदिरात का नाही पूजापाठ करत बसलास? अरे, देवबीव सब झूट आहे यार! ती तुमच्या मनाची कमजोरी आहे. स्वतःच्या कर्तुत्वावर विश्वास नाही म्हणून तुम्ही हे देवदेवतांचे थोतांड बाळगता. मी नाही या अंधश्रध्दांवर विश्वास ठेवत." तेव्हा त्यांनी भयंकर चिडून रेगेला चांगलाच फैलावर घेतला होता. अगदी त्याच्या जातीवर घाव घालत त्याच्या कुळाचा उध्दारदेखील केला होता. पण रेगे त्याच्या विचारांशी स्थिर राहिला होता. राजू शेवडे मात्र पक्का पंडित असल्याने त्याने एकेक पौराणिक दाखले देऊन त्याला गप्प केलं होतं. त्यांना राजू शेवडेची आठवण आली. तो सध्या पुण्यात विख्यात सर्जन म्हणून नावाजला असल्याने त्याला भेटायचा विचार पक्का करून अंगावर ब्लँकेट ओढली.'आजोबा, आजोबा, गुड मॉर्निंग ...!" वेदिकाच्या हाकेने त्यांना जाग आली. सकाळचे आठ वाजले होते. खिडकीतून लख्ख ऊन अंगावर खेळत होतं. त्यांनी मोठ्या कौतुकाने वेदिका उचलून दरवाजापर्यंत गेले. ड्रायव्हरने दरवाजाजवळ कार थांबवताच मीनाक्षीबाईसोबत ती कारमध्ये बसताच वेदिकाने 'बाय बाय आजोबा.." म्हटले.

त्याच अवस्थतेत चहा-नाश्ता केला. तोवर सौ. शाळेतून परतल्या. रोज सतत कुरकूर करणाऱ्या मिस्टरांना चूप पाहून त्याचं काहीतरी बिनसलंय, हे त्यांनी अचूक हेरलं. अंघोळ उरकून देव्हाऱ्यात पूजा न करता पुस्तकांच्या रॅकजवळ घुटमळत आहेत हे पाहून त्यांनी विचारले,

"काय हो, रात्रीपासून या रॅकमध्ये कसलं पुस्तक धुंडाळत बसलात? कुठलं पुस्तक हरवलंय काय? रात्री विचारलं तर पंचांग शोधतोय म्हणाले होतात. मग आता काय शोधत आहात बरे..?" तसे चकित होत म्हणाले,

"अगं, रात्रीपासून एक शंका सतावतेय बघ!"

"शंका..? कसली बरे ? काही आजारबिजाराची आहे की..." त्यांनी प्रतिप्रश्न केला.

"आजारबिजार नाही गं. प्रश्न साधा सोपाच आहे बघ! विचारू..?"

"विचारा.."

"हं.. सांग, या जगात देव आहे का? असल्यास तो कुठे आहे? म्हणजे आपण दाखवू शकतो काय? याच प्रश्नाची उत्तरे मी शोधतोय." ते प्रश्न ऐकून त्यांना हसू फुटलं. आपला एवढा ज्ञानी नवरोबा आज इतके साधे प्रश्न आपल्याला का विचारतोय हे लक्षात न आल्याने त्यांनी विचारले,

"कायहो, संन्यास घेऊन कुठे तपाला हिमालयातबिमालयात जायचा बेत केलात की काय..?" ते ऐकून ते इतक्या मोठ्याने हसले की मुलगा आणि सुनबाई पटकन तिथे आल्या. त्यांना ते कळू नये म्हणून विषय बदलत ते म्हणाले,

"अगं आज आपण असं करू या.." पुढे काय बोलावे हे न उमगल्यामुळे ते अडखळले. तशा सौ. मीनाक्षी म्हणाल्या,

"काय करायचं म्हणालात..?" तो विषय पुढे रेटण्यासठी ते म्हणून गेले,

"आज आपण पुण्याला जाऊ या..." पुणे शब्द उच्चारताच त्यांना रेगेची आठवण आली.

"पुण्याला.. ? कोणाकडे.. ? का.. ?"

"अगं पुण्याला माझा मित्र तो डॉ. रेगे राहतो ना, त्याच्याकडे जाऊ. हॉस्पिटलच्या व्यापामुळे काल तो येऊ शकला नाही ना."

"पण कशासाठी जायचं.. ? तुम्हांला काही ट्रीटमेंट घ्यायचीच काय ?"

"छे गं ! मला काय धाड भरलीय ? तुझा चेकअप करायला जाऊ. म्हणजे काय, तुला जिना चढताना धाप लागतेय म्हणून हो !"

"आता तीन मजले पळत चढल्यावर या वयात थोडी धाप लागणारच. त्यासाठी चेकअप करायची काय गरज ? माझा बीपी, शुगर, कोलेट्रॉल सारं काही नॉर्मल आहे !"

"मग सहज त्याला भेटू आणि रात्री परत येऊ."

"काही नको. तुमच्या जिवलग मित्र आहे, तेव्हा तुम्ही जा. मला आज प्रवचनाला जायचंय. कालचं प्रवचन चुकलंय." त्यांची ती चर्चा ऐकून लाजत मुलगा आणि सूनबाई आपापल्या मार्गाने गेली.

"बरं, मी दोनतीन दिवसांनी जाईन. तूर्तास माझ्या प्रश्नांची उत्तरे मीच शोधत बसतोय," सौ. हसत म्हणाल्या.

"इतकी वर्षे देवाची भक्ती केलीत आणि आता हे अंधश्रध्देचे प्रश्न का बरे पडलेत ? कोणी अंधश्रध्दा निर्मूलनवाला भेटला की काय ?" त्यांच्या प्रश्नाने मनाचा बराचसा ताण कमी झाल्याने त्यांनी विचारले,

"तसं नाही गं. मनात शंका आली."

"अहो, असल्या शंका नवीन नाहीत. काही पुरातन ऋषीमुनींनी अशा शंका काढल्या होत्या. त्यांचं निरसनही केलेलं आहे."

"बापरे ! तुझ्या बरंच लक्षात आहे ! पण तू हे कसं लक्षात ठेवलंस ?" पुढे बोलती करण्यासाठी ते म्हणाले.

"त्यात काय लक्षात ठेवायचे. आपल्या मंदिरात ज्ञानानंद याच विषयावर तर गेले चार दिवस प्रवचन देत आहेत. अजून तीन दिवस त्यांचे प्रवचन होणार आहे. पण तुम्हांला वेळ कुठे असतो. तुम्ही आपले सदान्‌कदा धंद्याच्या व्यापात गुंतलेले असता." मंदिरामध्ये ज्ञानानंद महाराज याच विषयावर प्रवचन देत आहेत, ते ऐकून आनंदाच्या भरात ते म्हणाले,

"अगं, हे मला तीन दिवस आधी का नाही सांगितलेस ? मी सर्व कामे बाजूला ठेवून नसतो का आलो ?" हे ऐकून त्या चकितच झाल्या.

"काय म्हणता काय ? दूरवरून कितीतरी लोक या प्रवचनाला येतात."

"मग आज मी नक्कीच येईन ! पण आता महाराज कोठे असतील. गेल्या तीन दिवसांत दिलेल्या प्रवचनाची माहिती करून घ्यावयाची आहे." ते खूश होत म्हणाले.

"सध्या महाराजांचा मुक्काम जाधवांकडेच आहे. सकाळी नऊ ते दुपारी एक या वेळेमध्ये कोणाला काही शंका असतील तर त्यांनी भेटायला मुभा दिलेली आहे." त्यांनी माहिती पुरवली.

"काय म्हणतेस ? मग विलंब कशाला. आताच आपण जाऊ चल." इतक्या सहजतेने सापडलेल्या संदर्भामुळे ते फारच खूष झाले.

काहीवेळाने घरातील कामे उरकून सौ.मीनाक्षीबाई त्यांना घेऊन महाराजांकडे गेल्या . महाराजांचे दर्शन घेतल्यावर त्यांच्यासमोर ते प्रश्न मांडले. ते शांतपणे ऐकून घेतल्यावर महाराज म्हणाले,

“अहो, देव आणि परमेश्वर यामध्ये फरक आहे. देव म्हणजे मानव अवतारी पुरुष. जसे; भगवान शंकर, राम आणि कृष्ण. ते मोक्षात असल्याने उघड्या डोळ्यांनी दिसत नसले तरी ध्यान-समाधीत किंवा तृतिय नेत्राद्वारे त्यांचे दर्शन होते. परमेश्वर हा डोळ्यांना न दिसणारा पण त्याचे अस्तित्व जाणवणारा असा चेतन पदार्थ आहे. या जगातील भौतिक शक्तींपेक्षा उच्चतर असे काहीतरी आहे, ज्याची आपल्याला (नितांत) गरज भासते आणि त्याचा जेव्हा आपण शोध घेऊ लागतो; तेव्हा आपण ईश्वराचे भक्त होऊ शकतो. जिच्यावाचून आपण जगू शकत नाही, तिला गरज म्हणतात. जशी श्वासोच्छ्वासासाठी हवा, भुकेसाठी अन्न. धर्म तसा विवादात, मनमतान्तरात अथवा ग्रंथात नसतो, तर तो आत्मसाक्षात्कारात असतो. तसं आत्मा किंवा ईश्वर तेव्हाच दिसतो जेव्हा आपल्याला आत्मसाक्षात्कार होतो. अवतारी पुरुषांना ईश्वर समजून ईश्वर प्राप्तीसाठी त्यांची उपासना करू तर ती फलदायी होणार नाही. त्यांच्यात ईश्वर पाहून त्यांची उपासना केल्याने देखील मोठी चूक होईल. म्हणून जगातील प्रत्येक वस्तूत ईश्वर पाहून त्या ईश्वराची उपासना केल्यास फलदायी होईल.” महाराजांना मध्येच रोखून त्यांनी विचारले,

“महाराज, जगात ईश्वर आहे, हे कशावरून समजावे?” त्या प्रश्नावर मिश्किलपणे हसत सांगू लागले,

“डार्विनच्या उत्क्रांतिवादाच्या सिध्दांतानुसार भूतलावर अमिबापासून कालांतराने विविध प्राणिमात्रांची निर्मिती झाली, हे मत शास्त्रज्ञाने मान्य केलं. तर अमिबादेखील काही वस्तूंचा निसर्गनियमानुसार संयोग होऊन तयार झाला हेही मत आहे. शेवटी वेदांनी म्हटल्याप्रमाणे पंचमहाभूतांच्या संयोगानेच ही सबंध सृष्टी तसेच सजीवांची शरीरे निर्माण झाली, हा सिध्दांत नास्तिक किंवा शास्त्रज्ञ का मानत नाही? नव्हे, त्याच सिध्दांताच्या अभ्यासाच्या आधारे वैज्ञानिक शोध लागत आहेत, हे त्रिकाल सत्य आहे. ज्याच्यापासून विश्वाी निर्मिती होते ती अदृश्य शक्ती म्हणजे ईश्वर होय. या विश्वची निर्मिती, पालन आणि विनाश या तीन क्रिया ठराविक कालांतराने अविरत होतात. या सर्वांचा नियंता म्हणजे ईश्वर होय. हे वेदांनी कथन केलेले चक्र निरिश्वरवादी मानत आहेत, पण या तिन्ही क्रियांची नियंती कोणतीतरी शक्ती करते, ती



शक्ती म्हणजे ईश्वर आहे, हे निरिश्वरवादी मानत नाहीत. ईश्वर म्हणजे भौतिक चैतन्य असे ते मानतात. वेदांतातदेखील ईश्वराचे अस्तित्व असेच मानले असून तो निर्गुण, निराकार असाच मानलेला

आहे. काहीजण धार्मिक विधीने मायारूपी वस्तूंच्या प्राप्तीसाठी त्याची भक्ती करून प्रसन्न करू पाहतात, ती अंधश्रध्दा आहे. हिंदू धर्मात जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त व्हायला याच ईश्वराची भक्ति करत आत्मसाक्षात्काराचे साधनामार्ग सांगितले आहे, त्यात कोणत्याही प्रकारची अंधश्रध्दा नाही. वैज्ञानिकांचा उद्देश शरीरसुखासाठी शोध लावणे हा असल्याने त्यांना आध्यत्मिक सुखामध्ये स्वारस्य नसल्यामुळे त्यांना भक्तिमार्ग म्हणजे अंधश्रध्दा वाटण्याचा संभव आहे. पुरातन काळात सांख्य तत्वज्ञानी ईश्वराचे अस्तित्व मानत नव्हते. मानवी शरीरात चेतना किंवा आत्मा असून मृत्यूनंतर तो अस्तित्वात राहून पुनर्जन्म धारण करतो, हे सांख्याना मान्य नव्हते. तसेच जीवाला पुनर्जन्म आहे, हे काहींना मान्य नाही. मानवी देहातील अंतःकरणात चित्त, जे मृत्यूनंतर आत्म्यासोबत परदेहात प्रवेश करते. त्या चित्तात अनेक जन्मांचे पूर्वसंचीत संस्कार तसेच राहतात, ही हिंदूधर्मीयांची धारणा आहे. आत्मा, भूतपिशाच्च, पुनर्जन्म याबाबत आजवर अनेक प्रकरणे घडलेली आहे. ज्यांचे वैज्ञानिकांनी केवळ टीका न करता सखोल संशोधन करायला हवंय." आपल्या शंकेला योग्य उत्तर मिळत आहे, हे जाणून त्यांनी विचारले,

"महाराज, आता आपण आत्म्याबाबत उल्लेख केलात. त्याबाबत मला काही माहिती सांगाल काय?"

"हे जगत (प्रपंच) चित् आणि जड अशा भासमान पदार्थांचे बनलेले आहे. सजीव प्राण्यांच्या ठायी चैतन्य असल्याने ते चित्स्वरूप, तर पृथ्वी, पाणी, पर्वत इत्यादी पदार्थ अचेतन असल्याने त्यांना जड म्हणतात. म्हणजेच आत्मा आणि अनात्मा असे दोनच पदार्थ प्रपंचात आहेत. जिवाची तीन शरीरे आहेत, स्थूल (अवयवांपासून बनलेले व प्रत्यक्ष दिसणारे शरीर), सूक्ष्म (१७ अवयवांनी कार्ये करणारे शरीर) व कारण (घन अज्ञान शरीर). ही शरीरे अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय अशा पंचकोशांची बनलेली आहे. आता हे कोश म्हणजे काय? ते ऐका : (१) **अन्नमय कोश :** ज्याची उपत्ती अन्नापासून होऊन जो करचरणादी अवयवांनी युक्त आहे तो. (२) **प्राणमय कोश :** म्हणजे पाच कर्मेंद्रिये व पंचप्राण यांनी युक्त. (३)**मनोमय कोश :** पाच ज्ञानेंद्रिये व मन यांनी युक्त. (४) **विज्ञानमय कोश :** पाच ज्ञानेंद्रिये व बुध्दी यांनी युक्त. (५) **आनंदमय कोश :** प्रिय, मोद व प्रमोद या वृत्ती. सूक्ष्म शरीराकडून होणारी १७ कार्ये म्हणजे : श्रोत्रें (ऐकणे), स्पर्श, दृष्टी, रसग्रहण, गंध, अंतःकरण (मन, बुध्दी, चित्त, अहंकार), स्वर उच्चारण-वागिंद्रिय, हातांचे, मलविसर्जन, उपस्थी (लिंग), पंचप्राणांचे कार्य (श्वासोच्छ्वास, मलविसर्जन, शरीरनिर्वाह, सुषुप्तिकाळी सकळ इंद्रियांचा उपसंहार, जागृतकाळी इंद्रियांना गोलकात (वसतिस्थानी) ठेवणे, उत्क्रमणकाळी सर्व इंद्रियांना परलोकी नेणे, जठराग्नीने अन्न पचन करणे, शरीरभर अन्नरस पोहोचविणे, पाच उपप्राणांचे कार्य (ढेकर देणे, पापण्यांची उघडझाप, शिंकणे, जांभई देणे, इ.), मृतशरीर फुगविणे ही होत. अशा या पंचकोशांचा नियंता प्राण असून तो व्यवहारकाळी त्यांच्याहून भिन्न असतो. मृगजळ हे सूर्यकिरणांनीच

बनते पण आपण त्याला वेगळे समजतो, तसे पंचकोशांवर आत्म्याचे अधिष्ठान आहे." त्या ज्ञानाने उत्तेजित होत महेंद्रशेठने विचारले,

"मग परमेश्वर आहे, हे कसे मानावे? त्यावर जगाने विश्वास कसा ठेवायचा?" त्या प्रश्नावर फार विचार न करताच महाराज म्हणाले,

"अहो, दुधात दही, लोणी, तूप हे आहेत असे मी म्हटले तर तुम्ही विश्वास ठेवाल काय? नाहीच! पण दुधात दही आहे, हे सिध्द करायचं असेल तर प्रथम दुधात विरजण घातल्यावर काही तासांनी त्याचं दही होतं, जे आपण पाहू शकतो. तसंच परमेश्वराच्या अस्तित्वाचं आहे. समस्त ब्रम्हांडाची त्यामधील दृश्य-अदृश्य शक्तींचाा निर्माता, नियंता आणि विनाशक असा जो कोणी आहे, त्याला परमेश्वर म्हणतात. आजवर मानवाने अनेक वैज्ञानिक शोध लावले आहेत. पण त्याला सजीव निर्माण करणे साध्य झाले नाही. क्लोनद्वारे प्राणी निर्माण करण्यात तो यशस्वी झाला असला तरी त्यात सजीवता यायला जी गोष्ट आवश्यक आहे ती म्हणजे जीव किंवा जीवात्मा हा ईश्वरीय अंश असून त्याचा निर्माता म्हणून जो कोणी आहे, तो परमेश्वरच आहे. परमेश्वर दृश्य नाही म्हणून सांख्य त्याचे अस्तित्व नाकारतात. पण विज्ञानालादेखील प्रत्येक गोष्ट दाखविता येते काय? विद्युतप्रवाह, हवा हे तरी कुठे दृश्य आहेत. म्हणून ते नाहीतच, हे म्हणणे चुकीचे आहे. म्हणजे परमेश्वर नावाची शक्ति या विश्वात काठोकाठ भरलेली आहे, हे म्हणणे बरोबर की चूक..?" मनाजोगे उत्तर मिळाल्याने ते तात्काळ म्हणाले,

"अगदी बरोबर!"

"म्हणजेच काय, तर दुधात दही, लोणी, तूप इत्यादी आहे, हे सिध्द करायला विशिष्ट प्रक्रिया कराव्या लागतात. तसं परमेश्वराचं अस्तित्व सिध्द करायला काही प्रक्रिया कराव्या लागतात." त्यांनी विचारले,

"कोणत्या प्रक्रिया?" तल्लीन होत महाराजांनी म्हटले,

"माया, अधिष्ठानचैतन्य व मायेतील चिदाभास हे तिन्ही म्हणजे ईश्वर होय. परमेश्वराचे ज्ञान होण्यात अनेक अडसर आहेत. ते प्रथम दूर करायला लागतात. त्यासाठी साधने किंवा मार्ग आहेत. हे मार्ग दुसऱ्या कोणी सांगून प्रत्यय येणार नाही तर त्यासाठी स्वतः त्यांचे आचरण करून अनुभव घ्यायचे असतात. पुरातन काळात वेदांतामध्ये अशा शंकांचे निरसन गुरु-शिष्यांच्या प्रश्नोत्तराने करण्याची परंपरा आहे. भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, पासष्टी, तुकाराम गाथा या ग्रंथांमध्ये वेदांत ठायी ठायी आढळतो. परमेश्वराचे स्वरूप समजण्याआधी मनाच्या जागृती, स्वप्न, सुषुप्ति, तुर्या, उन्मनी, कार्यकारण या अवस्थांचे ज्ञान, स्वरूप ज्ञान इत्यादींची आपणांस माहीत असणे आवश्यक आहे. विवेक, भोगविराग, मोक्षाची इच्छा, दृढसंयम यांचा अवलंब करावा लागतो.'' आजवर कधी न वाचलेले ते एकेक अवघड प्रकरण ते मन लावून ऐकतच राहिले.

"पंचीकृत पंचमहाभूतांपासून ईशाचे ईक्षणाने सर्व ब्रह्मांडाची उत्पत्ती झाली. या ब्रह्मांडात अतल, वितल, सुतल, तलातल, रसातल, महातल

व पातल असे ७ अधोलोक आहेत. तसेच भूलोक, भूवलोक, स्वर्लोक, जनोलोक, तपोलोक, सत्लोक असे ७ ऊर्ध्वलोक निर्माण झाले. या लोकांना योग्य असे उद्भिज, स्वेदज, जारज, अंडज अशा योनी निर्माण झाल्यावर त्यांच्यासाठी अन्नही उत्पन्न झाले. प्रपंचाची (विश्वाची) उत्पत्ती, स्थिती व लय होण्याकरिता एकाच ईश्वराने सत्त्वगुणांशी संयुक्त होऊन (१) सृष्टीचा पालनकर्ता विष्णू, (२) रजोगुणांशी संयुक्त होऊन सृष्टी निर्माणकर्ता ब्रह्मदेव आणि (३) तमोगुणाशी संयुक्त होऊन सृष्टी संहारकर्ता रुद्र (महेश) अशी तीन रूपे धारण केली. विष्णू हा हिरण्यगर्भांततर्भूत झाला. ब्रह्मा विराटांतर्भूत झाला आणि महेश हा कारणप्रपंचान्तर्भूत झाला.'' हे वर्णन ऐकून महेंद्रशेठ म्हणाले,

"बापरे, हे समजायला फारच अवघड आहे. साध्या सोप्या भाषेत हे मला सांगाल काय ? " तसे महाराज हसून म्हणाले,

"अहो, आपल्या ऋषीमुनींनी हजारो वर्षांपूर्वी सर्व शास्त्रांचे अनेक वर्षे चिंतन-मनन करून अभ्यास करून जे शोध लावले, तेच आजच्या विज्ञानाने वापरून पुढील संशोधनं केलीत. म्हणजे काय, तर आपले ऋषीमुनी कोणी अंधश्रध्देने वागणारे नसून तेही शास्त्रज्ञच होते. इतक्या गहन विचारांची माहिती साध्या शब्दांतही देता येईल, पण ते शास्त्रीय भाषेत समजावून सांगायचं तर मन, आत्मा, कोश इत्यादी विज्ञानाला ज्ञात नसलेल्या शब्दांची माहिती सांगायलाच हवीय." ते महाराज हसून पुन्हा तल्लीन होत सांगू लागले."

"तर कोश म्हणजे शरीराचे आवरण किंवा इंद्रियांवरील आवरणं असा अर्थ घेऊ. आपले शरीर पंचकोशमय आहे, म्हणजे काय तर अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय आणि आनंदमय हे ते कोश आहेत, त्याबाबत विस्तृतपणे मी सांगितलेच आहे. याच पंचकोशाने आत्माला आवरण घातलेले आहे. आत्म्यानेच आपणांस जलाचे ज्ञान होते. ज्ञानमयी आत्म्यापासून उद्‌भवणारी ज्ञानमयी 'चैतन्य-शक्ति' जेव्हा जड चित्ताच्या संयोगात येऊन त्या ज्ञानाचा उदय करून चैतन्यवत् परिचालित करते, तेव्हा बुध्दीत उत्पन्न झालेल्या ज्ञानामुळे जगाचे ज्ञान प्राप्त होत असते. हा आत्मा पंचकोशाद्वारेच कार्य करत असतो. तो पंचत्वांपेक्षा निराळा असला तरी पूर्णकाम आहे. अहंकार किंवा मीपणा हे प्राणाचे किंवा मनाचे धर्म आहेत पण त्यांचा कर्ता आत्मा; तो आत्मधर्मी आहे. जाग्रत, स्वप्न व सुषुप्ती या मनाच्या तीन अवस्था आहेत. या अवस्थांमध्ये आत्मा अलिप्तच राहतो. शरीर नष्ट झाले तरी आत्म्याचे अस्तित्व नष्ट होत नाही. तसे प्रलयकाली सर्व ब्रह्मांडही नष्ट झाले तरी आत्म्याचे अस्तित्व कायम म्हणजे सद्‌रूप असते. तो स्वप्रकाशाने भासमान असतो." ते ऐकून संभ्रमित झाल्याने त्यांनी विचारले,

"महाराज, मन शरीरात कुठे असते ? ते इतर इंद्रियांप्रमाणे दाखवता येते काय ? "

"छान प्रश्न विचारलात. मनाचे शरीरात विशिष्ट स्थान नसते. ते साऱ्या शरीरात पसरलेले असते. ते शरीरात कार्याच्या ठिकाणी जात असते. कधी मेंदूत, कधी डोळ्यात तर कधी गुडघ्यात तर विचार करताना बुद्धीतही जाते. चित्तानध्ये वृत्ती

उदित झाल्यावर जी संकल्प-विकल्पात्मक क्रिया होते किंवा जी एकाग्रता स्थापित होते तिलाच मन म्हणतात. मन हे जरी दाखवता येणारे इंद्रिय नसले तरी ते शरीरात फार मोठे कार्य करत असते. बहिर्जगदाभिमुखी कार्यरत असणारे मन व बुद्धी या दोन शक्ती शरीरात कार्य करीत असतात. चित्तामध्ये वृत्तीचा उदय दर्शनात मन म्हटले आहे.

लिंगशरीर हे १७ तत्त्वांनी युक्त आहे. त्यामध्ये पंचज्ञानेंद्रिये, पंच कर्मेंद्रिये, पंचप्राण, मन व बुद्धी यांचा समावेश आहे. यापैकी पंचज्ञानेंद्रिय आणि पंच कर्मेद्रिये आपण दाखवू शकतो. पंचप्राण, मन व बुद्धी हे आपल्या देहात अदृश्यपणे महान कार्ये अविरत करत असतात. तुम्हांला सांगितले आहे की आकाशादि पंचमहाभूतांच्या पृथक् सत्त्वांशापासून ज्ञानेंद्रिये निर्माण होतात. तसेच पंचमहाभूतांच्या मिलित सत्त्वांशापासून अंतःकरण निर्माण होते. (अंतःकरणतुष्टय) अंतःकरणाच्या वृत्तिभेदामुळे त्याला मन, बुद्धी, चित्त व अहंकार अशी नावे पडतात. मन आपले अधिठान दैवत चंद्राच्या प्रेरणेने अभिमान धारण करते. चित्त ईश्वराच्या प्रेरणेने धारणादि क्रिया करते. मन जड व घटवत् दृश्य आहे. त्यामुळे त्याच्याकडून आत्म्याकडून मनाला दिले जाते. समई, वात, तेल आणि दिव्याची ज्योत यामध्ये अनुक्रमे समई म्हणजे कर्म, वात म्हणजे मन आणि ज्योतिस्थानी आत्मा असतो. आत्मा म्हणजे एकमेवाद्वितीय चैतन्य आनंदमय, विज्ञानमय, मनोमय व प्राणमय या चार सूक्ष्म कोषांमध्ये अवगुंठित असतो. मृत्यूनंतर जडदेह पंचत्त्वात विलीन होतो." बम्हांडाच्या निर्मितीबाबत तसेच मानवी देहाची सखोल माहिती ऐकून त्यांना कृतार्थ झाल्यासारखे वाटले.

संध्याकाळी टेरेसवर जाऊन कुंड्यामधील रोपांना पाणी घालून झाल्यावर ते झोपाळ्यावर बसून हेलकावे घेत राहिले. पश्चिमेस निरभ्र आकाशातून तजेल दिसणारा सूर्यगोल धरतीच्या कुशीत विसावायला हळू हळू सरकू लागला आणि त्याचे रूप लोभस दिसू लागले. त्याचे तेज निरागस बालकाप्रमाणे मुलायम झालेले दिसले आणि त्यांच्या कानावर वेदिकेची लाडिक हाक पडली, 'आजोबाऽऽऽऽ !" तसं पटकन झोपाळ्यावरून उतरून ते तिच्याकडे वळले. पायऱ्या चढून त्यांच्याकडे पळत येताना त्यांनी तिला उचलून झोपाळ्यावर बसवली. तिला हलके हलके झोके देत छातीला कवटाळून विचारले,

"अग म्हातारे, इतका दम लागतो तर पळत जिना कशाला चढतेस ?"

"मग ! तुम्हांला एक गंमत सांगायचीय !"

"गंमत ! कसली बरे.. ?"

"आहे एक ! पण फुकटची नाही सांगणार.."

"मग कशी सांगणार.. ?"

"मला एक वस्तू द्याल तर सांगेन..!"

"वस्तू ? म्हणजे कॅडबरी की.."

"ते नाही !"

"मग.. ? खेळणं.. ?"

"छे हो आजोबा ! तुम्हांला काहीच कसं ओळखता येत नाही ?"

"अगं आता मी म्हातारा झालोय ना ! माझ्या

अकलेला आता गंज नाही का चढणार?"

"चूक ! वय वाढलं का अक्कल गंजत नाही तर ती वाढते !"

"असं कोण म्हणते ?"

"आमची टीचर !"

"वेडीच आहे ती. बरं सांग, ती गंमत ऐकायला तुला काय लाच देऊ ?"

"लाच नाही काय ! बक्षीस द्या !"

"कोणतं.. ?"

"एक गोड पापाऽऽ !" ते ऐकून त्यांना बराच वेळ हसू आवरेना. शेवटी त्यांना ठसकाच लागला. तशी वेदिका झोपळ्यावरून उतरून समोर ठेवलेली बिसलरी बाटली देत त्यांना म्हणाली,

"पटकन पाणी प्या कसे !" त्यांचे पाणी पिऊन होताच तिला म्हणाले,

"हं, कोणी तरी म्हातारीने आठवण काढली होती बघ, म्हणून ठसका लागला."

"कोण ती म्हातारी... ?"

"दुसरी कोण ? तुझी पणजीच !"

"माझी पणजी तर देवाघरी गेलीय ना !"

"देवाघरी गेली म्हणून काय झालं. तिथून ती मला सतवायची थोडीच राहणार आहे ? तिने आठवण करून दिली की माझ्या वेदिकेला तिचा पण एक पापा द्यायला !"

"खोट्टं ! जर देवबाप्पाच नसेल तर आजी देवबाप्पाच्या घरात जाईलच कशी ?"

"देवबाप्पा नाही..? हे तुला कोणी सांगितले.. ?"

"टीचरने ! आजोबा, आमच्या सायन्सच्या टीचर म्हणाल्या की जगात देवबीव काहीच नाही. ती एक अंधश्रध्दा आहे. जगात जे घडतं ते शस्त्रीय गोष्टींमुळेच घडतं. वॉटर म्हणजे काय, तर एच-२ओ! म्हणजे दोन भाग हायड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन एकत्र करा की झालं वॉटर तयार !" तिला कौतुकाने उचलून घेत पापा देत म्हणाले,


"ही गंमत काय !"

"तुम्हांला कशी काय समजली ?"

"समजली. पण बेटा, जगात इतकं पाणी बनवायला बरोबर तितका प्रचंड दोन भाग हायड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन एकत्र कोणी आणला ?"

"ते नाही सांगितलं ! तुम्हाला माहीत आहे ?"

"बेटा, आम्ही त्यालाच ईश्वर-गॉड असे म्हणतो. म्हणजे काय, तर या जगात जे काही घडते, करणारी जी शक्ती आहे, त्यालाच ईश्वर म्हणतात. तो सर्वत्र भरून आहे पण डोळ्यांनी दिसत नाही इतकाच. जमिनीत बी पेरल्यावर तिचं रोप उगवतं. त्या रोपावर कळी उमटते. त्या कळीचे फूल होतं. त्या फूलाचं फळ होतं. त्या फळात बीया येतात. असं हे चक्र निसर्गनियमाने होत असतं. तो निसर्ग म्हणजेच ईश्वर ! तो दिसत नाही, सर्वत्र राहतो."



"त्याच्याकडे काही मागितल्यावर तो देईल

का ?"

"छेः ! आपल्याला जे काही मिळतं ते आपल्या प्रयत्नाने आणि जिद्दीमुळे मिळतं. लोक मात्र वेड्यासारखे देवाला धनदौलत दान करून, जपतप करून, त्याची पूजाआरती करून काही मागतात ही अंधश्रध्दा आहे. देव काहीच देत नसतो." ते ऐकून थोडी निराश होत वेदिकाने विचारले,

"खरंच ! मग मी मला खूप मार्क्स मिळून वर्गात पहिला नबंर मिळूदे असं देवाकडे मागणार नाही." ते ऐकून मोठ्याने हसत ते तिला गोंजारत म्हणाले,

"बेटी, मन लावून खूप अभ्यास केलास तरच तुला पहिला नंबर मिळेल. ते काम देव कधीच करणार नाही. देव काय जादूगार आहे, तुझे पेपर्स लिहून द्यायला ? पेपर्स तूच लिहायचे असतात." ते ऐकून विचारात पडून तिने विचारले,

"मग मला सांगा, रोज आपण देवाची पूजा कशाला करायची ?" तिच्या प्रश्नाने गोंधळून ते म्हणाले,

"देवाची रोज पूजा कशासाठी करतात माहीत आहे ? तर दिवसभर आपण निरनिराळ्या कामात मग्न असतो. त्यामुळे शरीराइतकेच मनही थकून जातं. दोघांनाही झोपेमुळे विश्रांती मिळते. असे असले तरी काही वेळा मनात जास्त ताण पडून झोप येत नाही. त्यामुळे मनाला आणि शरीराला विश्रांती न मिळाल्याने आरोग्य बिघडते. ईश्वर पूजा किंवा भक्तीसाठी आपल्या ऋषीमुनींनी काही श्लोक, आरत्या, भजन, मंत्र रचले आहेत, ते मनाला सुखी ठेवून प्रसन्न करतात. तसेच धूप अगरबत्ती, कापूर असे सुगंधी द्रवपदार्थांमुळे वातावरण शुध्द होऊन मन तजेल होतं. या जगाचा नियंता म्हणून ईश्वराला साक्ष ठेवून त्याची काही मिनिटे पूजा केल्याने दिवसभर मन प्रसन्न राहते. हाच ईश्वरपूजेचा उद्देश आहे. ईश्वर न मानणारे काही लोक, मात्र पूजेऐवजी मन प्रसन्न करायला मादक द्रव सेवन करतात तर काही इतर मार्ग अवलंबतात. हाच ईश्वर, मानणाऱ्या आणि न मानणाऱ्या लोकांमधील सुख मिळविण्याच्या मार्गातील फरक आहे. बेटा, हे समजायला तुला अवघड आहे." तशी ती आनंदी होत म्हणाली,

"छेः हो आजोबा. आम्ही टीचरला असले तर किती तरी प्रश्न विचारतो. पण त्या तुमच्यासारख्या आमचे समाधान करत नाहीत." सौ.च्या हाकेने दोघांचे संवाद थांबले. दोघेही त्यांच्याकडे पाहत राहिले तोच त्या महेंद्रशेठजवळ येत म्हणाल्या,

"इतक्या कसल्या नातीसोबत गप्पा रंगल्यात ? वेदिका, अगं स्कूलचे कपडे न बदलता तशीच आजोबांना भेटायला आलीस ? चल, प्रथम दूध घे कशी !" तिला दुध पाजता पाजता मिस्टरांना विचारले,

'केलंत का नातीचं समाधान ?" तो प्रश्न ऐकून वेदिकाने रुसून विचारले,

'हे काय आजोबा ? आपल्या गप्पा आजीला का सांगता ? म्हणजे तुम्ही माझ्या प्रश्नांच्या परीक्षेत कॉपी केलीत तर !" ते ऐकून मोठ्याने हसत ते म्हणाले,

"अग ती काय कोण परकी आहे ? शिवाय तुझा प्रश्न किती कठीण होता. मी नापास झालो असतो ना!" ते ऐकून सारेजण हसले. महेंद्रशेठची दृष्टी मात्र अस्तास जाणाऱ्या सूर्याकडे खिळली.

**चारोळी**

वासरमणीचे सोने धरतीवरी पखरले
हरित वृक्षवेलींना नवचैतन्य लाभले
वाट उजळविली प्रभातीच्या प्रकाशाने
मंगलारंभ पक्ष्याच्या किलबिलाटाने

**मिलिंद कल्याणकर**

*With Best Compliments from*

# TAPESHWAR CONST.

**Govt. Reg. Contractor**

**Prop. Anil Banderao Sarate**

*With Best Compliments from*

# Mahalaxmi Contractor

**Govt. Reg. Contractor**

**Prop. Venkatesh Katty**

*With Best Compliments from*

# Dishant Enterprises

**Govt. Reg. Contractor**
**Prop. Jay kedar**

*With Best Compliments from*

# Pradip C. Gada

**Govt. Reg. Contractor**
**Prop. Pradip Gada**

# ‘तेल गेलं तूप गेलं .....’

**- मनोहर तळेकर**

आपलं लग्न व्हावं असं बंडू बुडकुलेला १४ व्या वर्षापासून वाटतंय. आज ४१ व्या वर्षीही तसंच वाटतंय. इतकी २७ वर्षे इतक्या छान वरास कुणी वधू भेटलीच नाही का ?

त्याच्या शाळेत यमू नावाची बारा वर्षांची वर्गभगिनी होती. मोठेपणी मी कोण होणार? हा प्रत्येक शाळेत ठराविक निबंध असतो. मोठेपणी मी यमूचा नवरा होणार हे त्याने लिहायचं ठरविलेले. पण ‘बालविवाह कायदा’ झुगारून तिच्या खेडूत आणि खडूस बापाने तिला तिच्या १६ व्या वर्षीच उजवली. हा बंडूला पहिला धक्का. बंडूला ‘‘यमे, तुला पाहून मला काहीतरी होतंय’’ हे सांगायची संधी कधीच मिळाली नाही.



बंडूचा स्वभाव घुम्या आणि भिडस्त. त्यामुळे कॉलेजात त्याने वर्गभगिनींना काही सांगण्यासाठी धीर जमा करायच्या आधी त्याचे वर्गबंधू त्यांना आपल्या ‘सौ’ करून टाकत. काही भगिनी इतक्या फटकळ की जर बंडूने तोंड उघडले असते तर बंडूचा गाल आणि त्यांचे हात यांची गाठ पडली असती.

पुढे नोकरी खात्यातल्या बायका आधीच कुणाच्यातरी ‘मिसेस’ होऊन आल्याने इथेही कुणाशी जमविण्याची संधी ‘मिस’ झाली.

४१ वर्षांच्या ह्या घोड्याचे लग्न का झाले नाही ? चर्चा रंगायच्या.

पत्रिका जुळत नाही हे जगप्रसिद्ध कारण अनेक ठिकाणी पुढे आलं आणि लग्न मागे पडलं.

काही मुलींना त्याच्या आडनावातील शेवटची दोन अक्षरे आवडली नाहीत. ही पार्श्वभूमी पण त्याला नापसंत करण्यामागे होती.

‘‘पत्रिका जुळते पण मुलगा थोडा थोराड वाटतो.’’

‘‘मुलगा जास्त शिकलेला आहे......’’ तर कधी मुलीचं शिक्षण जास्त असायचं.

‘‘मुलास चाळीस हजार रुपये तरी पगार हवा’’.

‘‘मुलाच्या चालण्यात दोष आहे’’.

अशी शंभर शारीरिक व आर्थिक कारणे.

एका मुलीच्या घरच्या कुत्र्याचे नाव बंडू होतं, तिने त्या कुत्र्याशी इमान राखून ह्या बंडूस नकार


दिला.

मुलगी पहायला गेलं की कांदेपोहे ठरलेले.

वधू परीक्षेस कांदेपोहेच का ठेवतात ? ही मूळची अक्कल कुणाची ? हा संशोधनाचा विषय आहे.

मुलगी आतून खोटं लाजत नाही आली तरी चालेल पण कृपया कांदेपोहे आणू नका, कांदादर्शनाने आणि त्याच्या नुसत्या वासानेच तो बेशुद्ध पडेल अशा अवस्थेस बंडू आला.

उद्या लग्न होऊन आपल्याला मुलगी झाली



तर तिला दाखविण्याच्या प्रसंगी कांदेपोहे ठेवायचे नाहीत आणि जर मुलगा झाला आणि त्याचे पुढे स्वागत कांदेपोह्यांनी झाले तर मुलगी नापसंत कर असं मुलास सांगण्याचे त्याने आत्ताच ठरविलंय. केवढी दूरदृष्टी !

''बिच्चारा, कसं होणार गं बाई बंडूचं ? '' घरातल्या वृद्ध काळजी व्यक्त करायच्या.

''काय करणार. प्रत्येक गोष्टीचा योग यावा लागतो. पण हा देखणा बंड्या इतकी वर्षे अगदीच कोरा राहिलेला नसणार हं'' वृद्धजनांचं निरूपण.

----

असेच काही दिवस गेले आणि एकदाचा तो योगशुभदिन उगवला. नेहमीप्रमाणे कांदेपोह्यांचा कार्यक्रम झाला.

उंदीरगावच्या खंडेराव पाटलाच्या पोरीचं हे स्थळ. बंडूच्या दूरच्या नातलगाने सुचविलेले.

खरं म्हणजे प्रथेप्रमाणे आधी मुलाने होकार-नकार कळवायचा असतो. पण बंडू आणि कंपनी काही बोलण्याआधी पाटीलबुवा दाणकन बोलून गेले. ''पसंत आहे आपल्याला हा जावईबुवा. झ्याक् आहे. पुढच्या महिन्यात साखरपुडा आणि दोन महिन्यांत लगीनबार उडवून देऊ''.

बंडूलाही पोरगी पसंत होती. कशी का असेना मुलगी आहे ना - अशा घायकुतीला आलेला हा गडी. पण ही मुलगी चांगली होती. बंडूस वयानुरूप होती. ती पण पस्तिशीला आलेली, त्यामुळे अंगानेही भरलेली होती. हवी त्या ठिकाणी पुष्ट होती.

असे बंडूचे अखेर जुळले. २७ वर्षंची प्रतीक्षा संपुष्टात आली.

पाटील घराणे श्रीमंत. योती शोडी बक्कळ. दूधदुभत घरचंच. पण उंदीरगाव मागासलेलं. पाटील परंपरा, जुन्या चालीरिती पाळणारे, सनातनी आणि कर्मठ, पण पोरीला तिच्या शहरातल्या मामाकडे शिक्षणास ठेवल्यामुळे आधुनिक व शहरी वातावरणात ती रुळलेली. तीही बंडूप्रमाणे टेकीस आलेली. 'कधी करिशी माझे लग्न' अशी.

मोठ्या मुश्किलीने तिने वडिलांची बंडूशी मोबाईलवर बोलण्याची परवानगी मिळविली. दहा हजारांचा नवीन मोबाईल घेतला. पहिला कॉल बंडूला करून त्याचे उद्‌घाटन केले. बंडू जवळ असता तर त्यातल्या कॅमेऱ्याने फोटोसुद्धा काढले असते. बंडू आणि बंडीची गुलुगुलु कुजबुज काळ मागे टाकत

गेले. दिवस कसा संपला समजायचं नाही. बंडूने आपल्या मराठीच्या प्राध्यापक मित्राकडून सुंदर स्त्रीसाठी वापरावयाच्या विशेषणाची यादी मिळविली. कारण मित्रही रसिक. 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत सुरू होणारी सर्व विशेषणे यादी बरोबर बंडूस त्याने रतिशास्त्रावरील पुस्तके आगाऊ भेट दिले आहे. स्वतःचेही काही अनुभव 'सखोल' वर्णन केले.

पाटीलबुवा भडकायचे कारण दिवसभर तर कधी रात्रीसुद्धा मोबाईल बंडीच्या कानास चिकटलेला दिसायचा.

बंडीची आई मध्यस्थी करायची. ती पाटलास समजवायची. ''असू दे हो, लग्न झाल्यावर ती बोलणार आहेत का असं ? दिवस आहेत त्यांचे आपल्यावेळी ही डबी नव्हती म्हणून, नाहीतर मी सुद्धा ......''

''पुरे पुरे'' पाटीलबुवा खेकसले.

आता साखरपुड्यास फक्त चार दिवस होते. वाङ्‌निश्चयाची अंगठी एकमेकांच्या बोटात घालायची, एकमेकांच्या वडीलधाऱ्या मंडळींना नमस्कार करून मंदिरात जाऊन देवदर्शन घ्यायचे आणि नंतर सर्वांच्या संमतीने फिरायला जायला ते मोकळे होते.

—

"अजून पाटलाच्या पोरीचा फोन कसा आला नाही ? कालचा दिवस असाच गेला. नो फोन"

रात्रभर बंडू जागाच. फोन नाही.

बंडूने मग किती वेळा फोन केला असेल त्यास गणनाच नाही.

''फोन बंद ठेवला आहे'', हा मेसेज प्रत्येक वेळी.

का उचलत नाही ती ? एस.एम.एस. ला उत्तर नाही.

''एंगेज्ड'' बंडू अशा 'होल्ड ऑन्' स्थितीत!

पुढचा दिवस तसाच कोरडा गेला. सरांनी दिलेली विशेषण यादीची अजून खूप पाने बाकी आहेत.



अधीर बंडू स्वतःशीच पुटपुटत होता. येऊ दे तिचा फोन. चांगलं फैलावर घेतो. मग काय लावायची ती विशेषणं लावतो. तो असा विचार करतोय तेवढ्यात फोन वाजला. अखेर पान्हा फुटलेला दिसतोय तिला. बंडूचा विश्वासच असेना. क्षणभर फोनचे बटण दाबून बोलायचंही भान त्यास राहिलं नाही.

—

''हं. बोला बाईसाहेब --- ह्या पायाच्या दासाची अखेर आठवण झाली म्हणायची. फारच लवकर''.

''ए पायाच्या दासा, तुझे पाय तोडायलाच मी

तिकडे येतोय''.

''अं ? कोण बोलतयं ? ''

पलीकडून कान फुटतील एवढा कर्णकर्कश्श पुरुषी आवाज बंडूस ऐकू आला.

''...मी बाईसाहेबांचा बाप बोलतोय, खंडेराव पाटील. नीच, पाजी माणसा, फौजदारास घेऊन उद्याच तुझ्याकडे पोचतोय. लग्नाच्या बेडीऐवजी तुरुंगाची बेडी घालूनच मी परतणार.''

बंडूचा कानावर विश्वास बसेना.

''बाबा काय झालंय काय तुम्हांला ? जावयाशी असं बोलतात ?''

''वर मलाच विचारतोस ? माझ्या मुलीला फसविल्याचा आरोप आहे तुझ्यावर. हे तुझं दुसरं लग्न आहे. अटकेचं समन्स घेऊनच येतोय.''

''काय बोलताय बाबा तुम्ही ? माझं अजून पहिलं लग्नच व्हायचयं.''

''अरे माधव काझ्या ऽ ऽ 'तो मी नव्हेच' नाटकाचा खेळ वाटला काय ? मागच्या आठवड्यात तुझ्याच गावातल्या भाव्यांच्या बंगल्यात गौरी नावाच्या पोरीशी तुझंच लग्न झालं ना ? तुम्ही दोघांनी एकमेकांना लग्नाचे हार घालताना काढलेले फोटो मी स्वतः पाहिलेत. परवा एका हितचिंतकाने आणून दिले मला. फसवलं माझ्या पोरीस. दोन दिवस स्वतःस कोंडून घेतलं, जेवत नाही, झोपत नाही ती. तुला शिक्षा झालीच पाहिजे.''

आता मात्र बंडू खदखदा हसू लागला.

''निर्लज्ज माणसा फिदीफिदी हसू नकोस. ''

''बाबा हसू नको तर काय करू ? अहो मी दूरदर्शनच्या एका वाहिनीत काम करतो. तुम्हांला सांगायचं राहिलं, पण तुमच्या मुलीस मी हौस म्हणून काम करतो हे सांगितलं होतं. पण तिला सुद्धा माझं त्या मालिकेतल्या नायिकेशी लुटुपुटीचं लग्न होणार ही कल्पना सांगितली नव्हती आणि हा घोटाळा झालेला दिसतोय तुमचा सर्वांचा. हे सगळं खोटं असतं हो. तसे मी खोटे खोटे खून केले आहेत. माझी अशी अनेक लग्ने झाली आहेत. कधीतरी मालिकेतल्या अपघातात मेलो सुद्धा आहे. नोकरी सांभाळून मी असली कामे करतो. ते विसरून जायचं असतं.''

पाटील गरजले. ''हौसेच्या नावाखाली तू इतकी बदमाशी करतोस. अनेक पोरी तुझ्या सहवासात येतात. 'लोण्याजवळ विस्तव' असले हे उल्लू माणसांचे धंदे आणि तुझे हे छचोर वागणे. उद्या काय भरवसा रे ? माझी पोरगी कंटाळा आला म्हणून टाकून देशील आणि जाशील त्यांच्याबरोबर भरकटत. पाटलांच्या इभ्रतदार घराण्यास ही थेरं पसंत नाहीत. माझ्या पोरीच्या आयुष्याचा तमाशा होण्याचा धोका मला पत्करायचा नाही.''

''बाबा, तुमच्या हितचिंतकाने आमच्या लग्नात कोलदांडा घालण्याचे उपद्व्याप केले आहेत.''

''तुमच्या मुलीला सांगितलं का हे. मी बोलू का तिच्याशी ?'' बंडूने समजाविण्याचा प्रयत्न केला.

''नको'' तिला सज्जड दम दिलाय. कुंवार राहा, पण ह्या हलकट माणसाची संगत नको. हा विषय, संबंध संपला. साखरपुडा रद्द. हे लग्न मोडलं'', पाटलांनी फोन आदळला.

बंडू !

पायाखालची जमीन सरकल्याचा अनुभव बंडूस आला.

—

प्रहर सकाळचा. दूरदर्शनच्या संजीवनी वाहिनीवर नेहमीप्रमाणे सर्व नटनट्या जमल्या आहेत. ''एका लग्नाची कितवी तरी गोष्ट'' मालिका जोरात चालू आहे. उत्तम टी.आर.पी. आहे.

स्टुडिओत सेटची जुळवाजुळव चालू आहे. पी.जें.ची उधळण. सात मजली हास्यफवारे, कुणाच्या तरी फिरक्या घेणं, कुणाच्या तरी डब्यातले पदार्थ चाखणं चालू आहे. दिग्दर्शक केव्हाही येईल. सेट लागेपर्यंत मजा करा. कालच त्याच्या सूचनेप्रमाणे काही कॅमेरे, लाईटस्, डिमर्स लागलेले आहेत.



बंडूच्या मेकअपला अजून अवकाश आहे. बिच्चारा. एका डुगडुगणाऱ्या खुर्चीत रेलून कालच्या हादऱ्यातून सावरण्याचा प्रयत्न करतोय. पोरगा टी.व्ही. त काम करतो हे लग्न न जुळण्याचा नवं कारण. कितवे ? ते मोजायचे त्याने अलीकडे सोडून दिलं होतं.

एवढ्यात ''बंड्या बंड्या बंड्या'' ओरडत हिरॉईन गौरीची मैत्रीण आणि सहाय्यिका विशाखा बंडूकडे आली.

''बंड्या बोल काय खाणार ? कांदेपोहे की बटाटेवडे ? पसंद अपनी अपनी.''

''कांदेपोहे ? बाप्रऽ ऽ रे.''

''ई ऽ ऽ बंड्या केवढ्यांदा ओरडलास. झालंय काय तुला ?''

''कुणाचे कसले कांदेपोहे ?''

''अरे संगळ्यांच्या ऑर्डरी घेत मी फिरतेय तशी तुझ्याकडे आले. कांदेपोहे आणि बटाटेवडे आपल्या कँटीनची स्पेशॅलिटी आहे ना.''

पण किस खुशीमें हे देतेस विशाखा ?''

''मी नाही देत. माझं काही नाही. आज गौरीला सगळ्यांनी कापायचं ठरवलंय. लग्न ठरलं बाबा तिचं. खरखुरं लग्न. याचा पुढल्या आठवड्यात साखरपुडा पण त्यात फक्त घरचे लोकच असणार म्हणून आज हा खादाडीचा प्रस्ताव मांडला.''

''वा वा मस्त. मी बटाटेवडा खाईन. पण ए जरा गौरीला पाठव''.

''पाठवते. आज मालिकेतल्या तुझ्या खोट्या लग्नाचा हनिमून आणि पुढल्या आठवड्यात खऱ्या लग्नाचा साखरपुडा. सॉलीड मज्जा आहे नाही ?''

गौरी बंडूकडे आली. प्रसन्न वाटली. खास उंची पंजाबी ड्रेसमध्ये छान दिसत होती.

'देवा हिचा तरी साखरपुडा नीट होऊ दे.' बंडू स्वगत बोलला.

''गौरी काँग्रॅटस् ! बस ना.''

''थँक्स बंडू.'' गौरी.

बंडूने विचारले, ''कोण आहे तो भाग्यवान ?''

''जयंत जोशी. सॉफ्टवेअरमधला आहे.

''वा छानच. अमेरिकागमन चान्स असणारच.''

''हो. तसं कंपनीने विचारलं आहे. नशिबात असेल तर घडेल.

'नशिबात असेल तर घडेल.' बंडूला पटलं.

ओढणीशी चाळा करत गौरी खुर्चीतच रेंगाळली.

‘‘गौरी काही सांगायचंय ? ’’

‘‘अं ? हो सांगतेच. तुला माहीतच आहे. आमची परिस्थिती बेताची. चार बहिणी आम्ही. दोन विवाहित. भाऊ नाही. बाबांना पेन्शन बेताचंच. थोडं रूप आहे आणि गाणं, नृत्य येतंय म्हणून मी ह्या लायनीत शिरले. बाबांच्या मित्राने हे स्थळ सुचविलंय. वाईट नाहीय. पण .........

‘‘पण काय गौरी ? ’’

‘‘आता सगळी मनाची ॲडजस्टमेंट. सर्व आपल्या मनासारखं घडत नाही. सगळी जुळवाजुळव. खरं म्हणजे माझ्या मनात तूच होतास. आपल्या ह्या मालिकेचे पाच भाग शिल्लक राहिले तेव्हापासून मी तुझ्याबद्दल विचार करायला लागले. विशाखाला सुद्धा तसं सांगितलं. आपण खरेखुरे नवरा-बायको व्हावंस वाटायला लागलं. शूटिंग ब्रेक्समध्ये मी तसं तुझ्याशी सूचक बोलायचे. एकदोन वेळ तुझे हातही दाबले. पण तुझ्याकडून थंड प्रतिसाद. तुला मी आवडते की नाही अंदाजच येईना.’’

‘‘काय म्हणतेस काय गौरी ? माझ्या कसं लक्षात आलं नाही ? ’’

‘‘तेच ना. आणि नंतर तुझ्या पाटलाच्या पोरीशी साखरपुड्याची बातमी आली आणि घरी गेले तेव्हा कळलं बाबांच्या मित्रांनी माझ्यासाठी जयंत जोशीचं स्थळ आणलंय. ’’

गौरीने बंडूचा हात हातात घेतला व म्हणाली, ‘‘आज प्रथम मी तुझ्याजवळ एवढी मोकळेपणाने व्यक्त होतेय आणि माझ्या मनातलं तुला हे सर्व सांगून तुझ्यातुन मुक्त होतेय. हा विषय संपला आणि तुलाही पाटलाच्या पोरीबरोबर साखरपुड्यासाठी शुभेच्छा. कशी आहे रे दिसायला ती ? माझ्यापेक्षा गोरी गोरी पान फुलासारखी छान ? असणारच. ’’

आपला साखरपुडा मोडला हे गौरीला कसं सांगावं याची जुळवाजुळव बंडू करत होता. तेवढ्यात मेकअपमनची गौरीला हाक आली.

‘‘... चल बंडू तो तिकडे बोंब मारतोय. आज मालिकेचा शेवटचा भाग आणि आपल्याही खऱ्या आयुष्यात नव्या भूमिका. पुन्हा आपण केव्हा कसे भेटणार ? कुठल्या भूमिकेत ? चल बाय् ...... ’’

गौरी मेकअपरूमकडे गेली.

कांदेपोहे आणि बटाटेवडा प्लेटस् आणि चहाची किटली घेऊन पोऱ्या येत होता.

असा कसा मी ठोंब्या ? तेलही घालवलं आणि तूपही गेलं. दर वेळी दारापर्यंत पोहोचतो पण ‘गृहप्रवेश’ नाही. द्वारघंटिका योगच माझ्या प्राक्तनी. काल जमीन सरकली. आज खोल खोल दरीत कोसळतोय असं बंडूस वाटू लागलं.

दिग्दर्शक महाशय आणि निर्माता गाडीतून उतरत होते. सगळ्यांची धावपळ सुरू झाली.

स्वतःशीच भेसूर हसत बंडू हनिमून सीन मेकअपसाठी उठला.

## चारोळी

आपल्या सावलीपासून आपण काही शिकावं
कधी लहान तर कधी मोठे होऊन जगावं
शेवटी आपण काय घेऊन जाणार आहोत
म्हणूनच मैत्रीचे हे सुंदर रोपटे मनापासून जपावं !

**- मिलिंद कल्याणकर**

*With Best Compliments from*

# *NSR Enterprises*

**Govt. Reg. Contractor & Suppliers**

**Prop. Brijesh Doshi**


---

*With Best Compliments from*

# M/s. Tejas Ganpat Bhuvad

***With Best Compliments from***

# Matoshri Construction



***With Best Compliments from***

# *A. R. Construction*




# दिवट्याने लावले दिवे

**- प्रदीप बंगले**

सालदार सखाराम एका तासापूर्वीच बैलगाडी घेऊन तालुक्याच्या एस.टी. स्टँडवर येऊन थांबला. मुंबईहून विशाल तब्बल बारा वर्षांनी येणार म्हणून त्याच्या बापानं त्याला घ्यायला बैलगाडी पाठवली. विशाल त्याचे माय-बाप, दोन लहान बहिणी व गावकऱ्यांपासून खूप दूर डॉक्टरी शिकण्यासाठी मुंबईला होता, तेव्हापासून त्याने जे घर सोडलं होतं त्यानंतर आज तो दहा दिवस सुट्टी घेऊन येत होता. विशालने डॉक्टर होऊन गावात दवाखाना सुरू करावा अशी सगळ्यांची इच्छा, गावात आणि घरात त्याच्याइतक शिक्षण अजूनपर्यंत कोणीच घेतलं नव्हतं. सखारामने शेताकडून बैलगाडी हाकलत घराकडे वळवली. शेतातून जाताना विशालच्या





कितीतरी आठवणी जाग्या झाल्या. पिकातून नागमोडी जाणाऱ्या पायवाटा, उंच ताळीवरून झेपावत वाहणारा पाण्याचा लोंढा, बोंडांतून बाहेर आलेला कापूस, टच्च दाण्यांनी भरलेली ज्वारीची कणसं, मूग, तूर, भुईमुगांच हिरवाईनं भरलेलं गळाभर लेणं, हे सगळं धो-धो पडणारा पाऊस, माय-बापाची पुण्याई अन् देवाच्या कृपेने बक्कल येणारं पीक. मध्येच उन्हाळ्यात वैराग्याच्या दूरवर

पसरलेल्या खाणाखुणा पाहून त्याच्या डोळ्यांत टचकन पाणी तरारलं.

गावच्या वेशीवरून बैलगाडी आंत शिरताना बालपणीचे दिवस त्याला आठवले. मातीतलं इरसाल बेरकीपण, काळजातील भाबडेपणा असलेली नाना तऱ्हेची माणसं, त्यांच्या भेटीगाठीने एकमेकांची मनं उकलली जायची. भरभरून प्रेम देणारी, प्रसंगी कुरबुरी सांगणाऱ्या भोळ्या-भाबड्या आया-बाया, खुशालीची विचारणा, सायंकाळी देवडीवर, पारावर सवंगड्यांशी गप्पांचे फड, शिलांगण खेळून दसऱ्याचं सोनं लुटताना लांबलचक आशीर्वाद देणारी सकुबाई, पांडुरंगाला आळवणारी रंगुबाई, जुनीजाणती गडीमाणसं हे वस्तीचं वैभव डोळ्यांत साठवत विशाल दीर्घ श्वास घेत सोडताना 'गेले ते बालपणीचे दिवस' पुटपुटत बराच वेळ आठवणी त्याच्या मनात रुंजी घालीत होत्या.

विशालनं दारात पाय ठेवताच मायनं त्याला जवळ घेऊन पटापट मुके घेतले. एक तपानंतर आलेल्या लाडक्या विशालच्या गालावर तिनं ढाळलेले गरम अश्रूंचे थेंब मायेचा ओलावा देत होते. विशालने तिचे डोळे पुसले, माय-बापाच्या पायावर डोकं ठेवलं. बापानं पोराच्या डोक्यावरून हात फिरवत 'लई मोड्डा झाला मह्या विशा' म्हणत त्याला जवळ घेतलं. इकडच्यातिकडच्या गप्पा झाल्यावर विशालनं भाकर अन ठेचा पोटात ढकलताना माया नं त्याला ईचारलं, 'पोरा, विशा आजून किती दिस हाय डाकटर व्हायले', विशालनं आवंढा गिळून,'आजून एक वरिस तरी लागीन'' म्हटल्यावर माय-बाप एकमेकांच्या चेहऱ्याकडे पाहू लागले. बाप म्हनला 'पोरा, आता किती तग धरायची आमी, म्हातारे झालो, आता काय बी उमजत नाय, आमी हाय तवर गावात डाकटरकी कर, लगीन कर, वाहरी धारला आली की आमुच्या जीवाले घोर नाही, आजून ह्या दोन पोरी उजवायच्या हायेत, कशाचा काय बी ठीकान न्हाय'' बापाचे पाणावलेले डोळे पाहून विशाल म्हणाला, 'आरं बाबा, डॉक्टर व्हायचं म्हंजी समदं शिकावं लागतं, येक वरिस थांब, समदं बेस होनार हाय.''

माय-बाप, भावंडांना, गावकऱ्यांना भेटून, बरोबर राहून दहा दिवसांची कधी सुट्टी संपत आली, विशालला समजलचं नाही. माय-बापाला विशालचं लई कवतुक. समद्यांना सांगत सुटले. 'गावांत दवाखाना काढणार हाय,'' 'विशालनं नसीब काढलं, लई हुशार हाय पोरगा, त्याच्याइतुकं गावात कोनीच शिकलं नाय, विशा डाकटर हुनार'' सगळं गांव त्याची स्तुती करीत होतं. आपल्यावर सगळे किती जीव लावतात हे बधून, ऐकून त्याच्या डोळ्यांत पाणी यायचं, केव्हा एकदाचा डॉक्टर होतो, अन् घरच्यांना चांगले दिवस दाखवतो असं त्याला झालं. घरातली कुतरओढत्याला सहन होत नव्हती. सगळ्यात मोठा विशाल, घराची सगळी मदार त्याच्या कमाईवर अवलंबून होती. सगळ्यांचा निरोप घेऊन तो मुंबईला आला, एकदाचा डॉक्टर झाला. दोन वर्षात मेहनत, प्रामाणिकपणा, गोड बोलणं यानं दवाखाना गर्दी खेचू लागली. विशाल दिवसरात्र एक करून पैसा मिळवू लागला. पैशांची जमवाजमव करून घरी पैसा पाठवू लागला.

माय-बाप, बहिणींना आता आपले सुगीचे दिवस आले वाटू लागलं. एका वर्षानं येणारा विशाल,

तिसरं वर्ष सुरू झालं तरी गावाकडे फिरकला नाही. ना पैसा पाठवला, ना खुशालीचा निरोप धाडला. सगळे वाट पाहून थकले. तीन वर्षात विशालनं घर घेतलं, संसाराला लागणारी भांडी-कुंडी जमवली, अद्ययावत सुखसोयींनी घर सजवलं, खूप प्रगती केली. एवढ्या मोठ्या घरात रात्री थकून घरी आल्यावर काम करणं त्याच्या जिवावर यायचं, एकटं राहून घर खायला उठायचं. रोज घराची साफसफाई, देखभाल करायची, आपण इतकं कमावतो काहीतरी यावर उपाय करायला हवा, म्हणून तो खूप विचार करून ओळखीने मीरा नावाच्या तरुण मुलीला कामासाठी, घराची साफसफाई करण्यासाठी आणतो. घराची चावी तिला देऊन विशाल दवाखान्यात निघून जायचा. दिवसभर घर तिच्याच ताब्यात असायचं. विशाल रात्री येताना दारू पिऊन, हॉटेलात जेवून यायचा, हळूहळू तो विलासी वृत्तीकडे जाऊ लागाला. मीराच्या लक्षात आलं की डॉक्टर दारू पितात, एकटेच राहतात. आपलं आयुष्य मार्गी लागायला ही चांगली संधी आहे.

विशाल सुट्टीच्या दिवशी घरातच लोळत पडायचा. हे नेहमीचं झालं होतं, विशालच्या आयुष्याला वेगळेच वळण लागलं. मीराने विचार केला, विशाल एकटा, त्याचे नातेवाईक इकडे कोणीच नाही. डॉक्टर, भरपूर पैसा, घर, दवाखाना हे वैभव आणि तरुण मुलगा पाहून तिचा हव्यास वाढत गेला. तिने त्याच्यावर प्रेमाचे फासे टाकण्यास सुरुवात केली. याच्याशी लगट केली तर आपल्या जिवाची चंगळ, मजेत राहून आयुष्य जगता येईल. विशाल तिच्याकडे आकर्षित होऊ लागला. तिचं तारुण्य, गोड बोलण, डोळ मिचकावणं त्याला आवडू लागलं. विशाल तिच्याकडे फक्त शारीरिक आकर्षणाने ओढला जाऊ लागला. दोघांच सळसळतं रक्त एक होऊ लागलं. तिला हवं नको ते आणून देऊ लागला, त्यानं तिला तू माझ्या घरीच राहात जा अशी परवानगीच देऊन टाकली. दोघं गाढवं प्रेमाने वेडे झाले. मीराला हेच हवं होतं. तिने त्याला पूर्ण ताब्यात घेतले. लग्न न करता नवरा-बायकोसारखे दोघं राहायला लागले. विशाल तिच्या प्रेमात आकंठ बुडत गेला. माय-बाप, बहिणी, गावकऱ्यांना तिकडे येण्याची दिलेली कबुली तो पूर्णपणे विसरला.

माय-बापानं नव्या हंगामासाठी विशाल आज ना उद्या येणार, पैसा आणून देणार ह्या विचाराने बी-बियाणं, शेतीची कामांसाठी कर्ज काढलं. सुरुवातीला पाऊस चांगला पडला ह्या खुशीने दोघं चिंतामुक्त झाले. गुडघाभर तरातून आलेलं पीक नंतर पाऊस नसल्याने मान टाकू लागलं. समोर त्यांना नुकसानच दिसू लागलं. सगळं कुटुंब सैरभैर झालं. आधी होते त्याहूनही वाईट दिवस त्यांच्यावर आले. सगळ मोलमजुरी करून पोट भरू लागले. ज्याच्या भरवश्यावर त्यांच जगणं अवलंबून होतं त्यानंच पाठ फिरवली. एक दिवस रागात मायनं पाटलाच्या पोरासंग विशालला निरोप धाडला 'पोरा तू इकडं कवा येणार ? डाकटर झाला का ? लवकर इकडं ये, आमचे लई हाल करू नको बाबा ! " मायनं धाडलेला निरोप विशाल समजला. विशाल खाडकन भानावर आला. आपण जे करायचं ठरवलं होत ते नं करता वासनेच्या आहारी जाऊन सगळचं विसरलो, काय करावं हेच त्याला समजत नव्हतं. विचारांच्या

मुंग्या त्याच्या डोक्यात वळवळ करू लागल्या.

विशालने दवाखान्यात जायचे कमी केले. अधूनमधून जाऊन डॉक्टरकी करायचा. घरात राहून काय करावं याचा विचार करतांना दारू पेगवर पेग मारीत लोळत पडायचा. आपल्याकडून फार मोठी चूक झाली, जन्मदात्या माय-बापाला विसरून क्षणिक सुखासाठी नको ते करीत बसलो याचा त्याला पश्चात्ताप होत होता. मनाशी त्याने ठोस निर्णय घेण्याचे ठरवले. नवं घेतलेलं घर विकून टाकायचं, दवाखाना सहा महिने बंद ठेवायचा. दिवाळीत गावाकडे जाऊन ठरलेली बरीच कामं करायची आहेत. विशालने दिवाळीत मी गावाला येत आहे असा निरोप पाठवला. घर विकून टाकलं, सगळं सामान दवाखान्यात ठेवून, मोठी रक्कम घेऊन गांवाकडे आला. दवाखान्याची चावी मीराकडे देऊन त्याकडे लक्ष दे सांगितलं. मी सहा महिन्यांनी परत येईन सांगून निघून गेला.

इकडे घरात आणि गावात आनंदाचे वातावरण, विशाल दिवाळीत घरी येतोय समजल्यावर माय-बापाला खूप हायसं वाटलं. मायनं ही दवंडी गावात पिटायला सांगितली. दोघांना काय करू, काय नको असं झालं. पोरीनं घराची सारवासारव करून, रंगरंगोटी करा सांगून किडुक-मिडुक विकून दिवाळीची तयारी सुरू केली. जो-तो गावात डाकटर येणार म्हणून हत्तीचं बळ आणून कामाला लागली. गावातली पोरं 'डाकटर येणार' बोंबलत उड्या मारू लागली. एकदाचा विशाला, सगळ्यांनी त्याचं जंगी स्वागत केलं. विशाल घरात पाऊल ठेवण्याआधी भाकरतुकडा ओवाळून टाकला. माय-बापानं त्याच्याकडं मन भरून पाहिलं, कोणाची नजर लागू नये म्हणून कडाकड बोटं मोडली. दिवाळीचे चार दिवस मजेत गेले. विशालनं त्याच्या बापानं शेतासाठी काढलेलं कर्ज फेडून टाकलं. चार महिन्यात दोन्ही बहिणीचं लग्न करून दिलं. राहतं घर पाटलाला विकून शेतात छोटं चार भिंतींचं घर बांधून माय-बापाला, तुम्ही इथं शेतातच रहायचं, पीक काढायचं, ते विकून गुजराण करायची. घराचे उरलेले पैसे त्यांच्या हवाली केले,'याचं काय बी करा, आता समदं बेस करून दिलं" सांगून विशाल मोकळा झाला.

विशालने घरचं सगळं बस्तान नीट बसवून दिलं. त्याला येऊन सहा महिने होत आले. माय-बापाला मी दोन दिवसांनी मुंबईला परत जाणार, मी मुंबईतच दवाखाना टाकला. आन लगीन बी केलं, आता मला माझं पाहावं लागणार, आता मी इकडं लवकर कधी येणार नाही. तुमचं कर्ज फेडून टाकलं, बहिणींची लग्न लावून दिली, शेतात घर बांधून दिलं, पैसा भी दिला, आता शेतात बिनघोर राहा, जे पिकलं त्ये विकून ऱ्हावा, एका दमात त्यानं सांगून टाकलं. असं ऐकून माय-बाप मटकन खालीच बसले. बापानं धीरानं, गोडीनं विशालला समजावून



सांगितलं,'विशा, पोरा आसं तोडून वागू नगंस, तू गांवात दवाखाना टाकनार हुता, तू मुंबईले निघून गेल्यावर आमचे हाल कोन पाहणार, तुह्या पावतुर आमचं हाय कोन ?". गावकरी जमले, सगळ्यांनी त्याला समजावून सांगितले,'आरं विशा इथचं गांवात दवाखाना टाकून डाकटरी कर, तुह्या जीवाचं सोनं होईल पोरा" पण विशाल ढिम्मपणे मान खाली घालून पायाच्या अंगठ्याने जमीन कोरत-उकरत उभा राहिला. त्याचा मुंबईत राहण्याचा निर्णय पक्का होता.

विशालची माय थरथर कापाया लागली, धाय मोकलून रडू लागली, रडतारडता म्हनली 'वसूबारशाच्या सुभ दिशी हा विशा वंशाचा दिवटा माझ्या पोटी आला. जनम देऊन म्या पोट्ट्याले म्हेनतीनं, राबून मोट्ठ क्येलं, आतड्याले चिमटं देऊन म्या शिकवलं, वर्सा-वर्सानं आमुची चामडी लोंबाया लागली, आरं पोट्ट्या, म्हातारे झाले रे तुह्ये माय-बाप, हाडं-हाडं लागे दिसाय, आन तू आमाले तरातरा वढत वावरात टाकले निघाय, म्हने आता आठीच राहून व वराची राखान करा. आठीच पिकलं त्ये खा आन मरा. आरं आसं-कसं आमचं जगनं ? आमाले न सांगून तिकडचं लगीन क्येल ? बायकूच्या नादानं पोट्ट्या माय-बापाला ईसरला. आता आमुचं" जगनचं सरलं रं पोरा, म्हसनात नेऊन टाक आमाले, आरं वंशाचा दिवटा आसून काय उपेग तुह्या आमले ? बोंबलून, कोकलुन त्याची माय छाताडावर, कपायावर बुंक्कं मारत रड-रड रडली. विशानं म्हातारीचे डोळे पुसले, मायानं त्याचे हात झटकले आन् कोपऱ्यात जाऊन बसली.

विशालचा बाप घराबाहेर निंबाच्या झाडाखाली एकटाच जाऊन बसला, त्याला बी रडू यायचं, पनं पोरासमोर त्याले रडता येत नव्हतं. बाप आंतून पार खचून गेला. आसवं ढाळणारी माय त्याला जवळची वाटत व्हती पण आसवं पिणारा बाप त्याला कुठं जवळचा वाटत व्हता ? विशालला समधं मिळाल्यावर माय-बापाला मोडीत काढलं व्हतं. पोट्ट्यानं त्यांना अडगळीत टाकलं व्हतं. कारण विशाल डॉक्टर होऊन जाणता, मिळवता, कमवता झाला होता. व्यवहारी कसं राहावं हे त्याला चांगलच कळायला लागलं होतं. रात्री कोणीच कोणाशी बाललं नाही. विशाल काहीच न खाता झोपून गेला. माय-बाप जुन्या घराच्या रिकाम्या भिंती, आठ्याकडे बराच वेळ बघत बसून राहीले. सकाळी विशा उठला. दोन बादल्या अंगावर ओतल्या बॅगउचलली. माय-बापाकडे तिरक्या डोळ्यांनी बघत 'जातो मी' म्हणत निघून गेला. आजूबाजूचे गांवकरी कोणीच त्याच्याशी बोललं नाहीत. एक वंशाचा दिवटा व त्याला जन्म देणारे माय-बाप विरुद्ध दिशेला वाहत गेले, परत एकत्र न येण्यासाठीच.

---

**हसू नका बरं !**

एक मुलगा पाय घसरून गाढवाच्या पायाजवळ पडतो.
बाजूने एक मुलगी जात असते.
मुलगी : काय रे, भावाच्या पाया पडतोयस का ?
मुलगा : होय, वहिनी !

*With Best Compliments from*

# R. F. Construction

*With Best Compliments from*

# *Shan Construction*

# वास्तुकलेचा इतिहास !

**-ओमनी फीचर्स**

भारतात वास्तुशास्त्र वेदकाळापासून अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे मिळतात. गृह्यसूत्रात वास्तुशास्त्राचे अनेक सिध्दांत आढळतात. शुक्लसूत्रात यज्ञवेदीची रचना करताना कोणत्या विटा वापराव्यात, हे सांगितले आहे. वाल्मीकी रामायणात  नगरे, तट, किल्ले यांची वर्णने जागोजागी आढळतात.

वेदकाळापासूनच वास्तुशास्त्र विकसित झाल्याचा पुरावा म्हणून भारतातील देवालयांकडे पाहता येईल. या देवालयांचा इतिहास अभ्यासपूर्वक तपासला  तर असे आढळून येईल की, या देवालयांच्या निर्मितीमध्ये वेदान्त, योगशास्त्र यांखेरीज भूगोल, भौतिक, गणित, भूमिती आदी शास्त्रांचा, तसेच गुरुत्वाकर्षणादी नियमांचा वापर केलेला आहे. वैज्ञानिक तत्त्वांचा कलापूर्ण वापर करणारी ही देवालये ब्रह्मज्ञानप्राप्तीसह समाजधारणाही करीत होती, किंबहुना 'देवालये' ही त्या काळी समाजजीवनाच्या केंद्रस्थानी होती, असे आढळून येते.

वेदकाळापासून विकसित झालेले वास्तुशास्त्र आणि विज्ञान यांचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे 'हिंदूंची देवालये'!

वेदकाळापासूनच वास्तुशास्त्र विकसित झाल्याचा पुरावा म्हणून भारतातील देवालयांकडे पाहता येईल. या देवालायांच्या निमिर्तीमध्ये विज्ञान आणि अध्यात्म यांची सुरेख सांगड घातलेली आढळते. देवालयांच्या वास्तुशास्त्राचा अभ्यास करून त्याचे अवतरण समाजात करणे, हेच आजच्या विज्ञानयुगातील वास्तुशास्त्रज्ञांना मोठे आव्हान आहे.


चुंबकशक्तीचा वापर करून मंदिरातील मूर्तीची प्रतिष्ठापना करणे!

देशाच्या पश्चिम किनारपट्टीवरील सोमनाथ मंदिरातही चुंबकशक्तीचा वापर करून शिवलिंग अधांतरी ठेवण्यात आले होते, असे म्हणतात. कोणार्क येथील सूर्यमंदिर खूप भव्य होते. या मंदिरात चुंबकशक्तीचा वापर करून सूर्याच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. मंदिरातील चुंबकशक्तीचा सागरातील जहाजांवर परिणाम दिसून येत असे.

प्राचीन शिव-देवालयांचे वैशिष्ट्य!

सहस्त्रो वर्षांपूर्वी निसर्ग, वास्तू आणि शरीर यांच्यामधील ऊर्जासंतुलन वास्तुशास्त्राच्या माध्यमातून साधण्याची कला महान द्रष्ट्यांना अवगत होती. घरातील प्रत्येक वस्तू कशी असावी आणि ती

कुठे ठेवावी, याचा बारकाईने विचार करणारे श्रेष्ठ असे विवेचन हिंदू वास्तुशास्त्रात केले आहे. 'घरात देवघर कुठे असावे, दागिन्यांचे कपाट कुठे ठेवावे', या आणि अशा अनेक बाबींवर निश्चित मार्गदर्शन करण्यात आले आहे.



भारतीय वास्तुशास्त्राने केलेला विचार अन्य देशांत प्रगत झालेल्या वास्तुशास्त्रात नाही !

"परदेशात प्रगत झालेल्या वास्तुशास्त्रात वास्तूच्या भक्कमपणावर भर देण्यात आला आहे, तर भारतीय वास्तुशास्त्रात भक्कमपणाबरोबरच त्या घरत राहणाऱ्या व्यक्ती, त्यांची मानसिक अवस्था आणि त्या व्यक्तीचे देवाशी असलेले नाते या गोष्टींचाही विचार केलेला आहे. दोन वास्तुशास्त्रांत मूलतः हा फरक असल्याचे सांगून अधिवक्ते वझे म्हणाले, 9आपल्या वास्तुशास्त्राला सूर्यापासून निघणारे किरण, चुंबकीय आकर्षण आणि प्रमुख दिशा-पोटदिशा या तीन गोष्टींचा आधार आहे."

पाश्चात पध्दतीनुसार उभारलेल्या वास्तू १० वर्षात कोसळतात आणि भारतातील सहस्त्रो वर्षांपूर्वीची मंदिरे अद्यापही जशीच्या तशी आहेत !

पुरातन रामसेतू वा आजचे पूल

कुठे सहस्त्रो वर्षांनंतर समुद्रात टिकणारा रामसेतू बांधणारा स्थापत्यविशारद वानरयंत्रज्ञ नल,तर कुठे बांधकाम पूर्ण होण्याआधीच कोसळणारे पूल आणि अन्य इमारती बांधणारे भ्रष्ट स्थापत्यविशारद!

**२. वेरूळ**

वास्तुशास्त्राच्या दृष्टीने वेरूळचे कैलास लेणे बघितले, तर आपल्या लक्षात येईल की, कशा रितीने ते उभारले आहे. शिखरापासून खाली एका दगडामध्ये ते कोरत गेलेले आहेत, म्हणजे त्या वास्तुशिल्पींना कोणत्या स्तरापर्यँत त्या वास्तुरचनेचा विचार करावा लागला असेल! त्यांना मोजमापनाच्या काय पध्दती वापराव्या लागल्या असतील आणि कशा रितीने त्यांनी ते केले असेल, याचा आपण विचारही करू शकत नाही, इतके हे भव्य आहे.

**३. नादशास्त्रावर आधारलेले देवालयाचे स्तंभ**

कन्याकुमारीच्या देवालयात एका बाजूला सप्तस्वरांचे दगडी स्तंभ आहेत, तर दुसऱ्या बाजूला मृदुंगाचे ध्वनी स्तंभात बसवलेले आहेत. दगडाचा नाद विशिष्ट स्तरातच यावा, यासाठी दगड केवढा घ्यावा लागेल, दगडाला आतून किती पोकळ करावे लागेल, याचे बिनचूक गणित आणि शास्त्र त्यामागे आहे.

**४. हेमाडपंथी देवालये**

चिरा एकमेकांतून बसवून केलेला हा वास्तुरचना-कौशल्याचा ठळक प्रकार आहे.

मयसभा म्हणजे भ्रम उत्पन्न होऊन जल न दिसता भूमी आहे, असे वाटत असे. अगस्ति संहितेत सोन्याचे पाणी देण्याची विद्या (गोल्ड प्लेटिंग)

सांगितलेली आहे. महाभारतात याचा उल्लेख आहे.



## वास्तूला दृष्ट लागते म्हणजे काय होते?

व्यक्तीला जशी दृष्ट लागते, तशी वास्तूलाही दृष्ट लागते. वास्तूला दृष्ट लागल्यामुळे वास्तूत राहणाऱ्यांना शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक त्रास होतात. घरामध्ये अस्वस्थ वाटणे, नकारात्मक विचारांचे प्रमाण वाढणे, लहानसहान कारणांवरूनही घरात वादविवाद होणे, आर्थिक हानी होणे, सतत कुणीतरी आजारी असणे यांसारख्या विविध समस्या या अशाच त्रासाची लक्षणे आहेत. वास्तूला दृष्ट लागूच नये, यासाठी प्रारंभापासूनच प्रयत्न करणे, केव्हाही अधिक श्रेयस्कर ठरते. व्यक्तीपेक्षा वास्तूला लवकर दृष्ट का लागते, त्या संदर्भातील प्रक्रिया आणि वास्तूतील त्रासाच्या संदर्भात त्या वास्तूमध्ये राहणाऱ्या व्यक्तींच्या साधनेचे महत्त्व ही माहिती या लेखात देत आहोत.

### १. एखाद्या व्यक्तीपेक्षा एखादी वास्तू त्रासदायक स्पंदनांनी लवकर बाधित होण्याची कारणे

**अ.** पवित्र वास्तूला बाधित करणे अवघड असते.

पवित्र वास्तूला (उदा. देवळाला) त्रासदायक स्पंदनांनी बाधित करणे अवघड असते; कारण तेथे चैतन्याचा वास असतो, तसेच तेथे सात्त्विक लहरींचे कार्यकारी भ्रमण चालू झाल्याने अशा वास्तूत वाईट शक्तींना शिरकाव करणे कठीण असते.

**आ.** त्रासदायक (वाईट) कर्म करणाऱ्या व्यक्ती राहणाऱ्या वास्तूला बाधित करणे सोपे असणे.

ज्या वास्तूत त्रासदायक कर्म करणाऱ्या व्यक्ती राहत असतात, त्या ठिकाणी सतत त्यांच्या दूषित विचारांतील तमोगुणी स्पंदने घनीभूत होऊन वास्तू त्रासदायक स्पंदनांनी भारित होते. असे सतत काही वर्षे होत राहिल्यास वास्तू पूर्णतः बाधित बनते. लक्षात घ्या, तमोगुणी विचारांच्या व्यक्ती राहणाऱ्या वास्तूच्या तुलनेत सत्त्वगुणी विचारांच्या व्यक्ती राहणाऱ्या वास्तूला बाधित करणे कठीण असते.

(वास्तूत राहणाऱ्या व्यक्तींची विचारसरणी, गुण-दोष आणि त्यांची साधना या गोष्टी त्या वास्तूत निर्माण होणाऱ्या बऱ्यावाईट स्पंदनांना कारणीभूत असतात. त्यामुळे व्यक्तीने योग्य मार्गाने आध्यात्मिक करणे, हा जीवनातील प्रत्येक समस्येवरील सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे.-संकलक)

**इ.** वास्तू निर्जीव असल्याने तिच्यात वाईट शक्तींविरुध्द लढण्याची क्षमता नसणे.

वास्तू निर्जीव असल्याने आणि ती साधना करून स्वतःची वाईट शक्तींविरुध्द लढण्याची क्षमता वाढवू शकत नाही. तसेच स्वतःही भावाच्या स्तरावर लढवू शकत नाही. त्यामुळे तिला बाधित करणे, एखाद्या व्यक्तीपेक्षा सोपे असते; परंतु व्यक्ती तमोगुणी असेल , तर मात्र तिलाही बाधित करणे सत्त्वगुणी व्यक्तीपेक्षा सोपे असते. (वाईट शक्तींच्या त्रासांच्या निवारणासाठी व्यक्तीची योग्य मार्गाने

आध्यात्मिक साधना चालू असणेच आवश्यक आहे, हेच यावरून स्पष्ट होते.- संकलक)

## २.वास्तूला दृष्ट लागण्याची प्रक्रिया आणि परिणाम

**अ.** वास्तू स्वतः निर्जीव असल्याने आणि ती साधना करीत नसल्याने तिला तिच्यातील दूषित स्पंदने घालवणे अवघड असते; म्हणून वास्तूवर दूषित दृष्टदर्शक वाईट स्पंदनांचा प्रभाव पडू लागला की, ती स्पंदने कालांतराने त्याच वास्तूत घनीभूत होऊ लागतात.

**आ.** वास्तूचे जीवनमान मनुष्याच्या आयुष्यकालापेक्षा अधिक असते. त्यामुळे दूषित वास्तू अधिक काळ त्रासदायक स्पंदनांच्या माध्यमातून कार्य करू शकते.

## ३. दूषित वास्तूचा व्यक्तीवर होणारा परिणाम

**अ.** व्यक्तीत वाईट शक्तीचा शिरकाव होण्याची शक्यता असणे.

वास्तूत घनीभूत झालेली स्पंदने कालांतराने तिच्यातील मर्यादित वायुमंडलालाच तिचे कार्यकारी क्षेत्र बनवू शकतात. परिणामी वर्षानुवर्षे तेथे राहणाऱ्या व्यक्तीवर या दूषित स्पंदनांचा प्रभाव पडून त्या व्यक्तीला वाईट शक्तींचा त्रास होण्याचीही शक्यता असते; म्हणून त्रासदायक वास्तू सोडणे हे व्यक्तीच्या ऐहिक तसेच पारमार्थिक उन्नतीसाठी पोषक ठरते.

**आ.** व्यक्तीची साधना व्यय (खर्च) होणे

साधना करणाऱ्या व्यक्तीची साधना वास्तूतील त्रासदायक स्पंदने न्यून (कम) करण्यात व्यय (खर्च) होते.

**इ.** वास्तू वाईट शक्तींचे निवासस्थान बनल्याने तेथे राहणाऱ्या व्यक्तीला व्यापक स्तरावर त्रास होऊ शकणे.


दूषित वास्तू कालांतराने वाईट शक्तींचे निवासस्थान बनल्याने तेथे राहणाऱ्या व्यक्तींना शारीरिक, मानसिक, तसेच आध्यात्मिक अशा सर्वच स्तरांवर त्रास होण्याचा म्हणजेच व्यापक स्तरावर त्रास होण्याची दाट शक्यता असते.

## घरात गोमूत्र का शिंपडावे?

आपल्या हिंदू संस्कृतीत गोमूत्राला महत्त्वाचे स्थान आहे. शुभ-अशुभ काही घडू नये म्हणून गोमूत्र शिंपडले जाते. त्यामुळे पूजा, लग्न किंवा अन्य कोणताही समारंभ असो त्यावेळी गोमूत्र शिंपडले जाते. तर तुमच्या कुंडलीतील ग्रहात दोष असल्यास किंवा वास्तुदोष असल्यास तुम्ही दर सोमवारी आणि शुक्रवारी थोडेसे गोमूत्र पूर्ण घरात शिंपडल्याने त्रास कमी होतो, अशी धारणा आहे.

सगळ्या परंपरांच्या मागे मनोवैज्ञानिक किंवा वैज्ञानिक कारणे आहेत त्यांचा संबंध धर्माशीही आहे. घर- परिवारातील समस्यांवर तोडगा काढण्यासाठी विव्दानांनी आणि ज्योतिषांनी गोमूत्र शिंपडण्याचा अचूक उपाय सांगितला आहे. जुन्या काळापासून गोमूत्र शिंपडण्याची परंपरा चालत आली आहे. शास्त्रात गाईला पूजनीय आणि पवित्र मानले आहे. गाईला माता असे संबोधले आहे. त्यामुळे गाईपासून मिळणारी प्रत्येक गोष्ट पवित्र आहे. हिंदू धर्मात गायीला पवित्र मानले गेले आहे. वास्तूनुसार गायीचे

गोमूत्र घरातील सगळे वास्तुदोष समाप्त करण्यास उपयुक्त ठरते. गायीची पूजा केल्याने आपले पाप नष्ट होते, अशी धारणा आहे.



काही बाबतीत जर तुम्हांला त्रास होत असेल, घरातील सदस्यांमुळे मानसिक ताण आणि क्लेश सहन करावा लागत असेल तर त्यापासून मुक्त होण्यासाठी अनेक परंपरा आहेत. वैदिक काळापासून अशा काही परंपरा आहेत ज्या घराला समृद्ध ठेवतात. त्यापैकी एक म्हणजे घरात गोमूत्र का शिंपडावे? गोमूत्र प्राशन केल्याने मूत्रपिंडाचे आजार व मूत्रविकार बरे करता येतात. अन्नातून युरिया, कीटकनाशके शरीरात जातात. पाणी आणि हवेतूनही दूषित घटक शरीरात जातात. त्याचा ताण मूत्रपिंडावर येतो आणि त्यातून मूत्रपिंडाचे विकार वाढतात. गोमूत्र हे त्यावर प्रभावी औषध आहे.

आतात गोमुत्राचे फायदे समजून घेतले पाहिजेत. घरातील वास्तुदोष मिटण्यासाठी रोज घरात गोमूत्र शिंपडावे. गोमूत्रामुळे वातावरणातील सूक्ष्म किटाणू नष्ट होण्यास मदत होते. तर ज्या घरात गोमूत्र रोज शिंपडले जाते तिथे सगळ्या देव-देवतांची कृपादृष्टी प्राप्त होते, अशी समजूत आहे. गोमूत्र शिंपडल्याने धान्य आणि धनाची कमतरता जाणवत नाही.

**वास्तुरहस्य !**

आजच्या आधुनिक जीवनशैलीत धनवृध्दी, सफलता, प्रेम व व्यवसाय वृध्दी यासाठी पानीपानी उलगडत जाणारे वास्तुरहस्य म्हणजेच आपले भारतीय प्राचीन विज्ञान वास्तुशास्त्र!

आपले प्राचीन वास्तुशास्त्र हे वेदाधारित आहे. वातावरणातील लहरी, पंचतत्त्वे तसेच दशदिशा यांचा शास्त्रोक्त वापर यात केला आहे. भारतातील राजा अशोकाच्या काळात या शास्त्राचा प्रसार आशियातील वेगवेगळ्या भागांमध्ये झाला. बौध्द धर्मगुरू वास्तुशास्त्राला चीनपर्यंत घेऊन गेले. फेंगशुई शास्त्रातही हे शास्त्र हिंदू वेदांवर आधारित आहे; असा उल्लेख आढळतो.

ही दोन्ही शास्त्रे दिशांच्या तसेच लहरींच्या आधारावर कुठेही वापरता येतात. त्यासाठी तुमची आंतरिक शक्ती, तुमची आंतरिक जाणीव पॉवरफुल असायला हवी. वातावरणातील सूक्ष्म बदल आणि संबंधित व्यक्तींवर होणारे त्याचे परिणाम या गोष्टी तुम्हांला जाणवल्या पाहिजेत. वास्तूमध्ये ज्या काही सकारात्मक, नकारात्मक लहरी असतील त्याच्या संवेदना तुमच्यापर्यंत पोहोचायला पाहिजेत.

वास्तुशास्त्राचा वापर करणे सामान्यांना परवडणारे नाही असा सर्वसाधारण गैरसमज आहे. या खर्चाकडे आपण गुंतवणूक म्हणून पाहायला हवे. सर्वस्व लावून आपण आयुष्यात एकदाच वास्तू खरेदी करतो. तीच वास्तू अथवा घर आपल्याला लाभदायक नाही; हे अनुभवणे फार वाईट असते. प्रत्येक वास्तूत काही ना काही दोष असतात. तसे घरातील व्यक्तींनुसार त्याचे परिणाम जाणवतात.

कोणतीही वास्तू पूर्ण लाभदायी अथवा पूर्ण वाईट नसते. आपण योग्य मार्गदर्शनाच्या आधारे आजच्या आधुनिक जीवनशैलीत वास्तुशास्त्राच फायदे निश्चितच अनुभवू शकतो.

**करिअर वृध्दी**

जागेचे नाते तुमचा नोकरी, धंदा, दैनंदिन कर्तव्य यांच्याशी तसेच आत्मिक बळ यांच्याशीही संबंधित आहे. करिअर एरिआ हा तुमच्या घराच्या दर्शनी भागात दृश्यभागी असतो. तसेच तो ईशान्य कोपऱ्यातही असू शकतो. करिअरच्या जागेची परीक्षा करायची असल्यास तुम्ही तुमच्या नोकरीधंद्याबाबत समाधानी आहात का, ते पाहा. आठवड्याचे ५ कामाचे दिवस तपासून पाहा. जर या जागेत अतिशय चांगल्या वायुलहरी फिरत असतील तर तुम्हांला नोकरीधंद्यात यशस्वी वाटचाल करता येईल. तसेच हा भाग वाढला असल्यास चागल्या संधी चालून येतील. जर या जागेतील वायुलहरी दबलेल्या असतील किंवा हा एरिया वाईट असेल, तसेच इथे संडास-बाथरूम असल्यास नोकरी-धंद्यात अनेक अडचणींना तोंड द्यावे लागेल. कदाचित सगळे



याटाा स्थाता असूनही, तुम्ही कंटाळलेले असाल किंवा तुमची नोकरी धोक्यात असेल किंवा तुम्ही नोकरीतून काढले जाल.

या परिस्थितीत करिअर एरियातील वायुलहरी व्यवस्थित होण्यासाठी तसेच तिथे काही दोष असतील तर तर काढून टाकण्यासाठी उपाय योजावे लागतील.

ही जागा सक्षम करण्यासाठी क्लस्टर ऑफ क्रिस्टलचा वापर करणे अतिशय फायदेशीर ठरू शकते.

जिथे तुमच्या घरात वॉटरड्रॅगन बसवलेले असतात तिथे पाण्याचा धबधबा अथवा त्याचे चित्र लावल्यास करिअरवृध्दीसाठी त्याची मदत होते.

वायव्य कोपऱ्यात स्फटिकगोल टांगल्यास अधिक चांगल्या आर्थिक घडामोडी वाढतात.

या जागी योग्य प्रकाशयोजना करूनही ही जागा सक्षम करु शकतो.

करिअर एरियात कधीही पाय आपटत चालू नये. तसेच भिंतीत शक्यतो खिळे ठोकू नयेत.

**सामाजिक दर्जा**

सूर्य हा आपला सामाजिक दर्जा, मैत्री तसेच अनेकविध नाती संवादाच्या संधींनी परिपूर्ण करतो. नैऋत्य दिशा हा नातेवाईक संबंधांचा कॉर्नर असल्याने तिथे रिलेशन अपॉर्च्युनिटीजसाठी सूर्याचे चित्र किंवा मॉडेल अवश्य टांगून ठेवू शकता. सूर्य हा प्रभावी लहरींची उत्पत्ती करत असल्यामुळे बेडरूममध्ये कधीही रिलेशनशिप एरिया एनहान्स करू नये. हॉल किंवा डायनिंगरूम यासाठी योग्य आहेत. इथे तुम्ही पिवळ्या अथवा लाल रंगाचे दिवे तसेच आकर्षक कंदील लावू शकता.

नैऋत्येस नॅचरल व्हाइट क्रिसेंट किंवा डेकोपरेटीव्ह कॅण्डल लावून आपण आपले सोशल लाइफ समृध्द करू शकतो.

## दोन पिढ्यांमधील वैचारिक दुवा

आजकालच्या आधुनिक काळात वडीलधाऱ्यांबद्दल आदर कमी झालेला दिसतो. तसेच आईवडील व मुलांमध्ये जनरेशन गॅप पडलेली आढळते. वास्तुशास्त्राच्या मदतीने आपण त्यावर उपाय करू शकतो. लहान मुले व आईवडील यांच्या बेडरूम जवळजवळ ठेवाव्यात. दोन बेडरूमच्या मध्ये सुंदर शॅण्डेटियर क्रिस्टल लावून टांगावे त्यामुळे दोन बेडरूममध्ये आपापसात वाहणाऱ्या लहरी एकमेकांमध्ये मिसळून दुरावा कमी होतो. मुलांची बेडरूम त्यांच्या आईवडिलांवरील विश्वास वाढतो. आपोआपच आदर वाढायला लागतो. या दोन बेडरूमच्या मध्ये संडास-बाथरूम येणार नाहीत; याची योग्य काळजी घ्या. फॅमिलीचा हसरा फोटो लाल माऊंटिंग व गोल्डन नैऋत्येस अवश्य लावा. घराचे नैऋत्य कॉर्नर्स मिसिंग असतील, तर बफर टाकून त्रुटी काढून टाकाव्यात. एखाद्या घराच्या समोरून सौम्य वाहणारे पाणी किंवा सौम्य वर्दळीचा रस्ता असेल तर घरातील लोकांच्या विचारात एकसंधता निर्माण होते पण घराच्या समोर हाय-वे असेल समोरून येणारा जिना किंवा लिफ्ट असेल तर वेगवान लहरींची उत्पत्ती होते आणि त्याचा घरातील व्यक्तींच्या मानसिक स्वास्थ्यावर विपरीत परिणाम होतो.

घराच्या मागील बाजूस झाडांचे गच्च बन, उंच पर्वत किंवा उंच बिल्डिंग असून पुढील बाजू मोकळी असेल तर घरातील व्यक्तींना सपोर्ट मिळतो व व्यक्तींमध्ये आपापसात चांगले नातेवाईक संबंध, उज्जवल भविष्य व महत्त्वाकांक्षा प्रस्थापित होतात. मुले व पालक चांगले आप्तेष्ट संबंध प्राप्त करू शकतात.

## अभ्यासिका

वास्तुसिध्दांतानुसार अभ्यसिका शक्यतो ईशान्येस असावी. रचना करताना जमिनीची पातळी इतर खोल्यांच्या तुलनेत खाली नसावी. अभ्यास करताना ईशान्येस अथवा वैयक्तिक विकासाच्या दिशेला तोंड करून बसण्याचा नियम अवश्य पाळावा. स्टडीरूममध्ये संडास-बाथरूम शक्यतो असू नयेत. संडास हे ऋणात्मक ऊर्जा फेकत असून वास्तुशास्त्रातील नियमानुसार जितके दूर असतील तेवढे चांगले. संडास स्टडीरूममध्ये असतील तर तेथून येणाऱ्या या ऋण लहरींमुळे मनाची अस्थिरता, चंचलता, पाठांतरास वेळ लागणे इत्यादी त्रास होतो. जर काही अपरिहार्य कारणामुळे संडास अभ्यासिकेत असेल तर त्याचा दरवाजा नेहमी बंद ठेवावा.

स्टडीरूमकरता नेहमी फिकट रंग वापरावेत. पिवळसर, पांढरा, लिंबू हस्तिदंती रंग आकर्षक तसेच उपयोगी ठरतात.

पिवळा रंग हा प्रकाशाचा द्योतक असून प्रसन्नता देतो आणि वाढवतो. हा रंग स्वास्थ्यप्रद असून आरोग्यासाठी अतिशय चांगला असतो. त्याच्यामुळे विचारशक्ती, स्मरणशक्ती तसेच मनाची एकाग्रता वाढते. फर्निचरची रचना करताना फिकट किंवा मॅट फिनिशचे फर्निचर शक्यतो वापरू नये. कारण अशा फर्निचरमुळे औदासीन्य येण्याची शक्यता असते. स्टडीरुममध्ये ग्लॉसी फिनिशचा वापर करावा. फर्निचर व भिंतीवरील रंग यांच्यात परस्पर संगती असावी. नारिंगी रंग, हिरवा रंग

यांचाही गरजेप्रमाणे वापर करावा. नारिंगी रंग हिरवा रंगात, ऑक्सिजन, लोह, कॅल्शिअम, ॲल्युमिनिअम यांचे प्रमाण अधिक असल्याने उत्साह, स्फूर्ती अधिक असते. बुध्दीला चालना देण्याची क्षमता हिरव्या रंगात असते. राखाडी व काळ्या रंगाचा वापर स्टडीत कटाक्षाने टाळावा. कारण काळा रंग शनीचा असून राखाडीवर शुक्राचा अमंल असतो. या रंगाच्या जास्त प्रमाणात वापराने सुस्ती येणे, कंटाळा येणे, अयोग्य तत्त्वांची वाढहोऊन विद्यार्थ्यांचे मन अभ्यसातून विचलित होणे असे त्रास होणे असे उद्‌भवतात. स्टडी रूमच्या खिडक्या पूर्वेला असल्या तर सकाळच्या सूर्याचे अल्ट्रागॅमा व्हायब्रेशन स्टडीमध्ये येऊन मुलांच्या शैक्षणिक, बौद्धिक वाढीवर त्याचा चांगला परिणाम होतो.

**वैवाहिक सौख्य**

तुम्हांला जर तुमच्या आयुष्यात प्रेम किंवा लग्नाचे योग आणायचे असतील ते नक्कीच त्यासाठी वास्तुशास्त्र मदत करू शकेल. त्यासाठी तुमचे प्रेमकोपरे शोधून काढून त्या दिशा एनर्गाइज करून तुम्ही तुमच्या आयुष्यात वैवाहिक सौख्य किंवा प्रेम नक्कीच आणू शकता. तरुण मुले-मुली चांगल्या मॅरेज लकसाठी त्यांच्या बेडरूम रोमॅन्स दिशेला पूर्ण चंदाचे चित्रही लावू शकतात.

एखाद्या व्यक्तीचे लग्न व्हायचे असेल तर लग्न होईपर्यंत घराच्या प्रवेशदाराच्या उजव्या बाजूस पाण्याचे भांडे फ्लोटिंग कॅण्डल यांनी भरून ठेवावे. प्रेमसंबंध आकर्षित करण्यासाठी त्याचा फायदा होतो. पण एकदा का लग्न झाले की ते भांडे लगेचच बाजूला ठेवले पाहिजे. ज्या व्यक्तींना जीवनसाथी मिळाला आहे किंवा लग्न झाले आहे त्यांनी कधीही दरवाजाच्या उजव्या बाजूला पाणी ठेवू नये. अन्यथा त्यांच्या प्रेमसंबंधात वादळ उठण्याची शक्यता असते. वास्तूतील चुकीच्या प्लेसिंगमुळे ज्या नकारात्मक ऊर्जा उत्पन्न होतात त्यामुळे पती-पत्नींमध्ये नेहमी वादविवाद होऊन त्यांची लग्ने मोडण्याचा संभव असतो. त्यामुळे प्रॉब्लेम निर्माण झल्यावर ते नंतर दुरुस्त करण्यापेक्षा ते निर्माण होणार नाहीत याचीच जास्त काळजी घेतलेली बरी!

प्रवेशद्वारातून जर बेडरूम व त्यामधील बेड दिसत असेल तर वैवाहिक आयुष्यात तिसरी व्यक्ती डोकावण्याची शक्यता असते. सहसा वैवाहिक जोडप्यांनी नवऱ्याच्या रोमान्स दिशेला बेड ठेवावा. हा बेड मोठा डबलबेड असावा. त्यावरील गादी व चादर ही एकच असावी. दोन वेगवेगळ्या गाद्या व वेगवेगळे बेड नवरा-बायकोतले सेपरेशन दाखवतात. सौम्य प्रकाशयोजना असावी. फिकट गुलाबी अशी रोमान्सवाढीसाठी पूरक रंगसंगती असावी. नैऋत्येस नवरा-बायकोचा हसरा फोटो लाल व गोल्डन फ्रेममध्ये लावून तेथे रोझ क्वार्टस् हे सेमिप्रेशिअस स्टोनचे बॉल ठेवावेत. सौम्य एअर फेशनरचा वापर करावा. बेडरूममध्ये आरशांचा वापर काळजीपूर्वक करावा. नवरा-बायकोचे झोपलेले प्रतिबिंब आरशात दिसत असेल तर त्यांच्या वैवाहिक आयुष्यात बाधा दर्शवते. त्यामुळे झोपताना आरशांवर पडदे टाकावेत. टीव्ही व कम्प्युटर्सही आरशांचे काम करीत असल्यामुळे झोपताना त्यावरही पडदे टाकावेत. टॉयलेट्स नेहमी बंद ठेवावीत. कारण

तेथून निगेटिव्ह एनर्जी येते.

फ्रेश फ्लॉवर्स व ग्रीन प्लान्ट बेडरूमबाहेर असलेले चांगले असतात कारण झाडे व फुले हे लाकूडतत्वाला रिलेटेड आहेत व ते प्रभावशाली लहरींची उत्पत्ती करतात. त्यामुळे ते बेडरूममध्ये ॲडव्हायझेबल नाहीत. रोमँटिक वातावरणासाठी सौम्य लहरींची आवश्यकता असते. ताज्या फुलांपेक्षा खोट्या किंवा आर्टिफिशल फुलांची चित्रे असली तरी चालतात पण ती एक्स्ट्रा लार्ज नसावीत. नाहीतर जोडप्यात तणाव निर्माण होईल. जी फुले तरुण जोडप्यांमध्ये वैवाहिक सौख्यात सुख व आनंद घेऊन येतात ती फुले मध्यममवयीन जोडप्यांना त्रासदायक ठरतात. जोडप्यातील पुरुष एखाद्या तरुण स्त्रीकडे आकर्षला जाण्याची शक्यता असते. त्यामुळे बेडरूममध्ये एक्स्ट्रा लार्ज फुलांचा वापर टाळावा.

**व्यावसायिक जागा**

व्यावसायिक जागांची कार्यप्रणालीची सफलता पंचतत्त्वे, दशदिशा लहरी तसेच आठ ट्रायग्रामवर आधारित असते. व्यावसायिक जागांमधील कुठल्या प्रक्रिया स्थानी केल्या पाहिजेत तसेच कुठले तत्त्व सहायक ठरेल हे आठ टायग्रामने माहिती करून घेता येते. जेव्हा कारखाने, फॅक्टरी किंवा वर्कशॉप बांधले तेव्हा प्लॉट चेक करून त्याचे पाताळक्षेत्र उघडे नाही ना ते पाहावे. कारण या जागांमध्ये उत्पादनप्रक्रिया होत असते, त्यावर त्याचा अतिशय वाईट परिणाम होतो.

एखाद्या कारखान्याच्या बांधकामाची सुरुवात करावयाची असल्यास नैऋत्येकडू करावी व पूर्व ईशान्येचा भाग थोडा मोकळा सोडावा. तसेच पूर्व ईशान्येच्या खिडक्या जरा मोठ्या कराव्यात. त्यामुळे तिथून सूर्याचे अल्ट्रागॅमा व्हायब्रेशन आत येऊन प्रभावशाली लहरींची उत्पत्ती होईल व त्याचा उत्पादन क्षमतेवर पॉझिटिव्ह परिणाम होईल. कारखान्याचे प्रवेशद्वार मालकाच्या चांगल्या दिशेला गेले पाहिजे. तसेच उत्पादनाची प्रक्रिया करताना त्याच्या वर्कर्सचे तोंडही मालकाच्या बेस्ट अथवा पर्सनल ग्रोथ दिशांना असणे आवश्यक असते. कारखान्यांमध्ये बॉयलर किंवा भट्टीचा वापर केला जातो. तो ब्रम्हस्थानी येणार नाही याची योग्य काळजी घ्या. पाण्याचा साठा किंवा टाकी उत्तरेस अथवा ईशान्येस बसवावी. ड्रेनेज लाइन्स किंवा सेप्टिक टँक वायव्य किंवा दक्षिणेस घ्याव्यात. नैऋत्य दिशा सेप्टिक टँकसाठी टाळावी. अन्यथा मालकाचे त्याच्या क्लायंटशी असलेले संबंध बिघडण्याची शक्यता असते. जर आधीच बांधलेली असेल तर ब्रम्हासेट टाकून ती त्रुटी कमी करावी. नैऋत्येस मालकाची केबिन घ्यावी. त्याची बैठक व्यवस्था केबिनच्या दरवाजाकडे तोंड करून असावी. तिन्हीबाजूने केबिनला रिफ्लेक्टेड काचा बसवाव्यात. ज्या योगे मालकाचे कारखान्यातील कामगारांवर लक्ष व वर्चस्व राहू शकेल.

काही वर्कशॉप व फॅक्टीच्या कंपाउंड वॉलचा एखाददुसरा भाग उघडा असतो. तो अयोग्य असून त्यामुळे मालकाची मन:स्थिती भरकटल्यासारखी होण्याची शक्यता असते. कारखान्यात प्रकाशयोजना व्यवस्थित असावी. तयार उत्पादने वायव्येला ठेवावीत आणि नैऋत्येला हेवी मशिनरी ठेवावी.

## जमीन खरेदी

वास्तुशास्त्र हे एक वैदिक शास्त्र असून सूर्य, पृथ्वी व अन्य ग्रह यांचे बांधकाम होताना स्थानबदलात होते. मग ते व्यापारी असो की निवासी असो.

वास्तुपूजा प्रकुवीर्त गृहारम्भे प्रवेशनेच।
वास्तूपूजा आकुर्वाणः तवाहासे भविष्यति।

वरील संदर्भ 'विश्वकर्मा प्रकाश' या ग्रंथातून घेतला गेला आहे. भूखंड अथवा वास्तू खरेदी करण्यापूर्वी त्या भूमीची परीक्षा आणि पूजा नियमानुसार करणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रत्येक कार्यात बाधा येऊन नष्ट होण्याची शक्यता असते. आपण खरेदी करीत असलेल्या वास्तूचे नियोजित स्थळ, त्याचा आकार, तयार होणाऱ्या इमारतीचा आकार, तिची दिशा यावर मार्गदर्शन घेणे अत्यंत जरुरीचे असते.

प्लॉटची निवड करताना अतिशय सावधगिरी बाळगावी लागते. ज्या ठिकाणी आनंदी किंवा विजयी झालेल्या व्यक्तींनी निवास केला असेल, अशी जमीन खरेदी करणे सर्वांत चांगले. एखादी व्यक्ती दुसरा पर्याय नाही म्हणून जर ती जमीन विकत असेल तर सावधगिरी बाळगावी. कारण वास्तू व जमीन यामध्ये ज्या घटना घडलेल्या असतात, तशाच प्रकारच्या घटना पुन्हा पुन्हा घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. भूखंडाचे सिलेक्शन करताना चांगल्या वास्तुतज्ज्ञाचा सल्ला घेणे अतिशय आवश्यक असते. कारण उत्तम भूखंडावर वास्तुनियमांच्या आधारे निर्मित भवन हे नेहमीच शुभ असते. ज्याचा लहरींचा चांगला अभ्यास आहे, असा वास्तुसल्लागार त्या भूखंडावर उभा राहून तसेच त्या भूखंडाचे ब्रम्हास्थान मुक्त करून तो भूखंड शुभ आहे का नाही? तसेच अशुभ असल्यास त्याची शुध्दी कशी करता येईल हे सहजी सांगू शकतो. काही भूखंड असे असतात की ज्यांची पाताळक्षेत्रे उघडी असतात. त्याच्या प्रभावाने शून्यचक्र उघडे होऊन निर्धनता, अनारोग्य असे त्रास सुरू होतात.

भूखंडावरील लहरी व आपल्या लहरी यांच्यात एकात्मता साधण्याचा प्रयत्न करावा.

भूखंडावरील ब्रम्हास्थानातील मातीचे वरचे आवरण काढून आतील माती तपासावी.

बिल्डर्सनी प्लॉट खरेदी करताना ते सुयोग्य आकारात नसतील तर योग्य उपायांनी त्यांना सुयोग्य बनवले पाहिजे.

एकूण २७ प्रकारच्या आकाराचे भूखंड असतात. त्यांपैकी काही शुभ पाहूया. जो भूखंड चौरस असून ९० अंशात असतो तो सगळ्यात आदर्श भूखंड असतो. वर्गाकार भूखंड तसेच आयताकार भूखंड अतिशय चांगला असतो.संपूर्ण वर्तुळाकार भूखंड भूस्वामीसाठी पैशाचे सगळे स्त्रोत उघडतो. तो अतिशय दुर्लभ असा भूखंड आहे. पण जर का तो चाकाच्या आऱ्यांप्रमाणे चक्राकार असेल तर अतिशय वाईट फळे देतो.

षटकोनाकार, अष्टकोनाकार, चतुष्ठकोनाकार भूखंडही चांगले असतात. गोमुखाकार भूखंड हा भूस्वामीला निवास करण्यासाठी योग्य असून व्यापारधंद्यासाठी

वापरल्यास हानी होऊ शकते. वाघमुखी भूखंड हा धंद्यासाठी, दुकानांसाठी उत्तम असून निवासाकरता अयोग्य असतो.

बाकी सर्व भूखंड अयोग्य असून योग्य ती उपाययोजना करुन ते वापरात आणता येतात. आजकाल मुंबईसारख्या शहरांमध्ये पाण्याची दुर्लभता आहे. तेव्हा आपण घेतलेल्या प्लॉटवरच जर साठा मिळाला तर त्याचा वापर आपल्याला पिण्याचे पाणी सोडून इतर वापरासाठी करता येतो.

पाणी हे संपत्तीचे द्योतक आहे. चांगला वायू व मुबलक जल हे प्लॉटमध्ये सुबत्ता निर्माण करते. प्लॉटवर पाण्याचा साठा शोधणे अतिआवश्यक असते.

ज्या प्लॉटवर औदुंबर किंवा आपट्याचे झाड असते. त्याच्या पाच मीटरच्या परिघात पाणी अवश्य सापडते. जर प्लॉटवर बोरी- बाभळीची झाडे जास्त असतील तर पाण्याची कमतरता असते. प्लॉटवर पाण्याचा साठा सहसा उत्तर ईशान्येस करावा. नैऋत्र्येस अथवा दक्षिणेस पाणी असल्यास अतिशय अशुभ असते. जर पाण्याच्या लाईन म्युनिसिपाल्टीतून घ्यावयाच्या असतील तर ईशान्यकडून घ्याव्यात.


प्लॉटच्या ब्रम्हास्थानी पाणी कधीही ठेवू नये. तसेच प्लॉट घेतल्यानंतर त्याला कुंपणभिंत अवश्य घालावी.

वास्तुशास्त्र आपल्याला परत आपल्या उत्पत्तीशी जवळीक व एकरूपता साधून देऊ शकते. यासाठी निसर्ग आणि आपल्या मन व तनाला जोपासणारे घरकुल यात एक सुसंवाद व संपर्क राहिला पाहिजे. चेतनेचा स्त्रोत असणाऱ्या उगवत्या सूर्याला जसा नमस्कार करावा. तसा त्या सूर्याच्या प्रकाशकिरणांना घरात प्रवेश मिळावा म्हणून त्या दिशांना मोठ्या खिडक्या ठेवतात. म्हणजे आपल्या अन्नात, शरीरात व चेतनेत या सूर्याच्या अल्ट्रागॅमा किरणांचा शिरकाव व्हावा व जास्तीत जास्त प्रथिने शरीरांतून मिळावीत. घराची जी उत्तर दिशा तिथे नेहमीच स्थैर्य व वृध्दी यांचा अनुभव येतो. म्हणून आपल्या घरात पूर्व ते उत्तर दिशांकडे जीवनावश्यक वस्तूंचे अस्तित्व असावे. म्हणजेच तशी वास्तुरचना करावी.

निसर्गाने अनेक प्रकारच्या देणग्या आपल्याला दिल्या आहेत. त्याचे आपल्या वास्तूत सुयोग्य नियोजन करावे. वास्तुशास्त्रानुसार निसर्गनियमांना अनुकूल व अनुरूप वास्तुरचना करावी व आपल्या क्षेत्रात प्रगती व समृध्दीचा लाभ घ्यावा !

ओम्नी फीचर्स

**वास्तुशास्त्रानुसार आदर्श वास्तु**



सगळ्यांनाच वास्तुशास्त्राप्रमाणे घर घेता येणे अथवा बांधणे शक्य नाही. पण ते साधारणतः या चित्रात दिल्याप्रमाणे असावे... आणि असेही म्हटले जाते की जगातील कोणतेही घर अगदी १००% वास्तुशास्त्राप्रमाणे असू शकत नाही.

यातील ज्या उपदिशा आहेत त्या कमी महत्त्वाच्या नसून खूप खूप महत्त्वपूर्ण आहेत. आणि त्यांच्यावर पंचमहाभूतातील तत्त्वांचा प्रभाव असतो.... आग्नेय या दिशेवर नावाप्रमाणेच अग्नी तत्त्व, ईशान्येवर जलतत्त्व, वायव्येवर वायुतत्त्व आणि नैऋत्य दिशेवर भूमी तत्त्वाचा प्रभाव असतो.... तुलनेने नैऋत्य ही जास्त संहारक परिणाम देणारी दिशा आहे.... अर्थात तिथे खोदकाम केले, बोअर, विहीर मारली तर....

स्वयंपाकाचा अग्नीशी संबंध असल्याने अर्थातच स्वयंपाकघर आग्नेय दिशेला असणे उत्तमच, नसल्यास किमान किचन तरी आग्नेयेला असावा. Gas शेगडी आग्नेयेला तर सिंक ईशान्य दिशेला हवे... घराचा मधला भाग शक्यतो मोकळा ठेवावा. देवघर ईशान्य किंवा आग्नेय दिशेला असावे.

देवघरात जिवंत किंवा मृत व्यक्तींचे फोटो लावू नयेत. त्या आपल्याला प्रिय असल्या तरी त्यांच्या फोटोमधून वाईट स्पंदने येऊ शकतात आणि ती प्रगतीला, उपासना स्थळाला नक्कीच मारक असतात. देवघरात स्वामी समर्थ, साईबाबा, गजानन महाराज, शंकर महाराज, कलावती आई, सिध्दारूढस्वामी या आणि अशाच इतर अनेक संत आणि सिध्दांचे मूळ, अस्सल फोटो अवश्य लावावेतच.... त्यांच्या फोटोमधून येणाऱ्या लहरी अतिशय उपकारक असतात. घरात कोठेही काच, आरसे वापरात असाल तर जपून वापरा. कारण काच ही कोणतीही दिशा आणि वस्तू, वास्तू, चित्रे.... काचते प्रतिबिंबित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीला गुपित करून दाखवते, वाढवून दाखवते आणि घर, वास्तू, दुकान मोठे असल्याचा भास होतो.... चुकीच्या ठिकाणी अयोग्य वापर झाल्यास वाईट गोष्टी, वस्तू प्रतिगुणित होतील.

घरात सकाळ-संध्याकाळ तेलाचा किंवा तुपाचा दिवा आणि अगरबत्ती लावणे खूप हितावह आहे. त्याचे आध्यात्मिक लाभ असतील पण आपले मन मात्र प्रसन्न होते. आनंदाने भरून जाते. आणि देव नेहमीच प्रसन्न असतो. धूप, उदबत्ती लावून प्रसन्न करायचे असते ते आपल्या मनाला.... आपल्या घराला.... घरात मंगल ध्वनी, जपाची टेप असणे आनंददायी का होणार नाही? घरात, देवघरात, पायरीवर, उंबऱ्यावर आपल्याला जी येत असेल ती रांगोळी घालाच. ती घरामध्ये येणाऱ्या वाईट स्पंदनांना अटकाव तर करीलच पण रांगोळी हे एक शुभ यंत्रच असल्याने रांगोळी घालणारा आणि ती पाहणारा या दोघांच्याही मेंदूत पर्यायाने मनात सकारात्मक बदल घडवून आणून भविष्य सुधारण्यास थोडी का होईना नक्की मदत करील यात शंकाच नाही.

स्वयंपाक करत असताना किंवा जेवणापूर्वी अग्नीत, चुलीत, गॅस शेगडीवर किंचित तूप लावलेला भात, पोळीचा, चपातीचा, भाकरीचा कशाचा तरी तुकडा असे काहीतरी थोडेसे समर्पित करा.... अग्नी हा देवांचा दूत किंवा वाहक आहे.

स्वयंपाक बनवीत असताना भगिनी मातांनी दुसऱ्याची उणी काढणे, संतापाने भांड्यांची आदळआपट करणे, नाराजीने स्वयंपाक बनवणे हे घरातील कोणालाही अजिबात हितकर नाही. आद्य शंकराचार्यांचे अन्नपूर्णा स्त्रोत केले तर फारच उत्तम. येत नसल्यास देवाचे नामस्मरण करत स्वयंपाक बनवावा.

**घराचे वास्तुशास्त्र**

घर बांधताना वास्तू आपल्या आयुष्यातील प्रत्येक गोष्टींशी निगडित असल्याने बांधकामापूर्वी अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात. समृध्दी, यश, शांती, चैतन्य यांचा प्रत्यक्ष संबंध वास्तूशी जोडला जात असल्याने वास्तूची निवड करताना नियोजन व वास्तुशास्त्रातील मूलभूत नियमांचा आग्रह धरताना बहुतेकजण दिसतात. यामागे अंधश्रध्देचा भाग नाही, तर घर बांधतच आहोत तर वास्तूचे काही नियम पाळल्यास काय हरकत आहे, असा सरळ विचार त्यामागे असतो.



घर बांधण्यापूर्वी सर्वांत महत्त्वाचे काम म्हणजे प्लॉट निवड. प्लॉटच्या उत्तर दिशेला किंवा पूर्वेकडे मोठा वृक्ष नाही याची खात्री करतानाच दक्षिणेस खड्डा किंवा विहीर नसावी याची दक्षता घ्यावी. प्लॉटचा आकार त्रिकोणी नसावा, चौरस किंवा समचतुष्कोण आकार घर बांधण्याकरिता आदर्श मानले जाते.

वाकडे-तिकडे व अनियमित आकाराच्या प्लॉटवर बांधकाम केल्यास आर्थिक हानी किंवा मतभेद वाढहोण्याची शक्यता असते. मध्यभागी प्लॉट बसका असल्यास अनेक क्षेत्रात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. पूर्व दिशेकडे तोंडवळा असणारे घर शुभ मानले जाते.स्वयंपाक घर मोकळे, हवेशीर असण्यासोबतच त्यांची दिशाही लक्षात घ्यावी.

घर बांधताना वास्तू आपल्या आयुष्यात गृहिणी स्वयंपाक करताना तोंड दक्षिणेकडे नसले म्हणजे झाले. टॉयलेट्स दिशा व जागा ठरवताना विशेष खबरदारी घ्यावी. दक्षिण किंवा पश्चिमेस टॉयलेट्स ठेवल्यास योग्यच. उत्तर दिशेकडे प्लॉटही उत्तम. नदी, तलाव, विहीर, झरे प्लॉटच्या पूर्वेस किंवा उत्तरेस असावे. घराचा मुख्य दरवाजा किंवा प्रवेशव्दार कोणत्या दिशेने यांवर घराचे सौंदर्य खुलण्यासोबतच इतरही गोष्टी निगडित असतात. घराचा दरवाजा ईशान्येस असावा.

अगदी दुसरा पर्यायच नसला तर पश्चिमेकडे दरवाजा ठेवण्यासही हरकत नाही. घर बांधून काही जागा शिल्लक राहावी याची दक्षता घ्यावी. उत्तर किंवा पश्चिमेकडचा भाग मोकळा ठेवल्यास चैतन्यात

वाढच होईल.

**घर बांधताना काय काळजी घ्याल?**

प्लॉट खरेदी केल्यानंतर घर बांधताना आपल्याला खूप गोष्टींचा विचार करावा लागतो. प्लॉटच्या चारही बाजूंनी येणारे रस्ते, प्लॉटची लांबी-रुंदी, प्लॉटवर असलेली झाडे आदी गोष्टी लक्षात घेऊन घराचे बांधकाम करावे लागत असते. घर बांधताना वास्तुशास्त्राचा आधार घ्यावा लागत असतो. वास्तुशास्त्रात घर कुठे बांधावे व कुठे बांधू नये, या संदर्भात काही नियम व माहिती सांगितली आहे. ती पुढीलप्रमाणे....

★ ब्रम्हदेव, विष्णू, सूर्य, शिवशंकर तसेच जैन मंदिरासमोर किंवा मागील प्लॉटवर घराचे बांधकाम करू नये.

★ घर बांधताना उत्तर, पूर्व व ईशान्य दिशेला अधिक जागा सोडावी. घराच्या छताचा उतारही उत्तर किंवा ईशान्य दिशेला केला पाहिजे. घरातील नळ किंवा घराबाहेर केलेली बोअरवेल ईशान्य किंवा नैऋत्य दिशेच्या कोपऱ्यातच पाहिजे.

★ खिडक्या पूर्व व उत्तर दिशेला जास्त प्रमाणात ठेवल्या पाहिजेत. दक्षिण दिशेला खिडक्या ठेवू नये. ईशान्य कोपऱ्यात स्वयंपाकखोली ठेवावी. आऊट हाऊस नेहमी पश्चिम किंवा दक्षिण दिशेला व गाडी शेड उत्तर दिशेला बनवले पाहिजे.



**घराचा मुख्य दरवाज्याचेही काही नियम आहेत...**

★ घराच्या मुख्य दरवाजासमोर रस्ता नसावा. दरवाजासमोर रस्ता असल्यास आपल्या विकासात बाधा येते.

★ दरवाजासमोर मोठे झाड असल्याने घरातील व्यक्ती नेहमी आजारी पडतात.

★ दरवाजासमोर नेहमी पाणी वाहते ठेवल्याने नेहमी आर्थिक नुकसान होत असते.

★ दरवाजासमोर मंदिर असेल तर घरात शांतता कधीच नांदत नाही.

★ घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर स्तंभ (खांब) असतील तर त्या घरातील महिला नेहमी आजारी पडतात.

★ जमिनीच्या तुलनेत घराचा दरवाजा खोलगट भागात असेल तर घरातील मुख्य पुरुष व्यसनाधीन व नेहमी बुडालेला असतो.

★ घरासमोर रस्ता, मंदिर असेल तर घरासमोर अधिक जागा सोडल्याने दोष नाहीसे होतात.

★ घराचे मुख्य प्रवेशद्वार घरातील इतर दरवाजांपेक्षा मोठे असावे.

# वास्तु शास्त्रानुसार भूमीची निवड


- जयश्री गणेशकुमार पंडित

ॐ नमो भगवते वास्तुपुरुषाय।
कपिलाय च पृथ्वी धराय देवाय प्रधान पुरुषायच।।

वास्तुशास्त्र म्हणजे संपूर्ण ब्रम्हांडलहरींचा पृथ्वीवरील सजीव व निर्जीव वस्तूंवर होणारा परिणाम होय. ब्रम्हांडातील पंचतत्त्वे म्हणजे अग्नी, वायू, जल, पृथ्वी व आकाश तत्त्व ह्यांचा सजिव व निर्जीव वस्तूंवर परिणाम होतो. त्याचा विचार करूनच वास्तुशास्त्र निर्माण झाले.

वास्तुशास्त्रावर आचार्य विश्वकर्मा ह्यांचा 'विश्र्वकर्म प्रकाश' हा सर्वांत प्राचीन ग्रंथ मानला जातो. मयमत, मानसार, समरांगण सूत्रधार, सनत्कुमार वास्तुशास्त्र, बृहत्संहिता हे सर्व वास्तुशास्त्रावरील महत्त्वाचे ग्रंथ होत. वास्तुशास्त्राचा गरुड पुराण, अग्नी पुराण, मत्स्य पुराण, स्कंद पुराण इ. मध्ये संदर्भ आढळून येतो. बृहद्संहितेत भूमिपरीक्षा कशी करावी. वास्तूच्या आजूबाजूला कोणत्या वृक्षांची लागवाड करावी इ.चे मार्गदर्शन आहे. महाभारतात मयाने निर्माण केलेली पांडवांची चित्रनगरी तर रामायणात विश्वकर्माची लंका इ. चा वास्तुशास्त्रीय संदर्भ आढळून येतो.

कोणतीही वास्तुरचना करण्यापूर्वी जी भूमी आपण निवडतो ती भुमि कशी असावी याचाही विचार भारतीय वास्तुशास्त्रात केला आहे. हत्ती, सिंह,



बैल, घोडा, त्रिशूल, शिवलिंग इ. सारखा आकार असलेली भूमी ही उत्तम लाभदायक असते तर त्रिकोणी, सुपासारखी, मृदंग, साप, बेडूक, घुबड, कावळा, धनुष्य, खेकडा, बैलगाडीच्या आकारासारखी दिसणारी भूमी ही दुःखदायक विनाश करणारी असते. अशा भूमीवर वास्तू बांधू नये.

भूमीची निवड करताना पुढील गोष्टींचा विचार करावा.:

१) प्रथम भुमी पाहावयास जाताना/गेल्यावर जाणवलेले शुभ /अशुभ शकुनांचा विचार करावा.
२) भूमीचा आकार
३) भूमीच्या मातीचा रंग/गंध/चव
४) भूमीच्या आजूबाजूला असणारी चिन्हे

उदा.पर्वत, नदी, नाले इ.

५) जागेचे आर्द्र परीक्षण
६) दिशा प्रभाव परीक्षण
७) उत्पादकतेची क्षमता / बीजनिर्मिती विचार
८) वायुसंचरण परीक्षण
९) विकिरण परीक्षण – कोणत्या वर्णासाठी ही भूमी श्रेष्ठ आहे. कर्मानुसार – ब्राम्हण – बौद्धिक कार्य, वैश्य म्हणजे व्यापार इ.

यानंतर आय व व्ययचा विचार करावा. ज्या भूमीचा आय हा व्ययापेक्षा जास्त असतो ती भूमी किंवा प्लॉट हा उत्पन्न देणारा असतो. जर त्या भूमीचा आय हा व्ययापेक्षा कमी आला तर अशा भूमीत नेहमी उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण जास्त राहून गृहस्वामी हा कर्जबाजारी होण्याची शक्यता असते. हे आठ आय पुढीलप्रमाणे होत :

| | दिशा | आय | वर्ण |
|---|---|---|---|
| १) | पूर्व | ध्वज | ब्राम्हण, प्रासाद, पूर, नगर |
| २) | आग्नेय | धूम्र | सोनार, अग्निजीवी, वस्त्रांचे व्यापारी |
| ३) | दक्षिण | सिंह | क्षत्रिय, सैन्य, पोलिस |
| ४) | नैऋत्य | श्वान | मजूरा, काबाडकष्ट करणारे |
| ५) | पश्चिम | वृषभ | शेतकरी, पशुपालन, पशुविक्रीकेंद्र |
| ६) | वायव्य | खर | व्यापारी, वैश्यवर्ण |
| ७) | उत्तर | गज | उद्योगपती, बँक, सावकार |
| ८) | ईशान्य | काक | मठ, आश्रम, साधुसंन्यासी |

वरील आठ आयमध्ये ध्वज, सिंह, वृषभ व गज आय असलेली भूमी श्रेष्ठ होय.

यानंतर भूमीमध्ये एकशितीपद, शतपद किंवा चतुःषष्ठिवास्तुपद मंडलाप्रमाणे योग्य त्या पदाची निवड करावी. गृहरचनेसाठी एकशितीपद वास्तुपदाचा उपयोग करतात. यात ९ पदात ब्रम्हस्थान असते. शतपद, वास्तुपदाचा मंदिर रचनेसाठी उपयोग करतात. यात १६ चक्रांत ब्रम्हस्थान असते. तर चतुःषष्ठिपद वास्तुपदाचा उपयोग नगररचनेसाठी करतात. यालाच मंडूकपद वास्तू असे म्हणतात. याचे ब्रम्हस्थान हे चार चक्रांत असते.

वास्तुशास्त्राचा विचार करताना ते एका खोलीसाठीही घटबिंदू सिध्दांताचा वापर करून ह्या शास्त्राद्वारे अंतर्गत रचना करून Positive Rays चा लाभ होऊ शकतो.

**जागेचा / भूमीचा उतार कोणत्या दिशेला आहे, त्यानुसार मिळणारे फल.**

| **दिशा** | **फलप्राप्ती** |
|---|---|
| पूर्व दिशेला उतार | लक्ष्मीप्राप्ती |
| आग्नेय दिशेला उतार | शोक, दुःख |
| दक्षिणेस उतार | मृत्यू |
| नैऋत्य दिशेस उतार | भीती |
| पश्चिम दिशेस उतार | घरात कलह |
| वायव्य दिशेस उतार | मृत्यू |

उत्तर दिशेस उतार वंशवृध्दी
ईशान्य दिशेस उतार रत्नांचा लाभ

वास्तूचे बांधकाम करताना निम, तुळई, भिंती इ. चे बांधकाम कोणत्याही भूमीच्या मर्मस्थानांवरून होत असेल तर ते त्या प्रकारचा दोष वास्तूमध्ये निर्माण करतात. ही मर्मस्थाने, महामर्मस्थाने व उपमर्मस्थाने या नावाने ओळखले जातात.

१) महामर्मस्थाने : वास्तुपुरुष मंडलात शिर, मुख, हृदय, नाभी, वामस्तन व दक्षिणस्तन, शिरा व वंश रेषा एकमेकांना जेथे छेदतात ते छेदनबिंदू इ. ना षण्सहान्ति असे म्हणतात.

२) महामर्मस्थाने : वंश रेषा एकमेकांना ज्या ठिकाणी पद्मध्यात छेद देतात त्या नऊ बिंदूंना महामर्मस्थाने म्हणतात.

३) उपमर्म स्थाने : वास्तुपुरुष मंडलातील शिरा ज्या ठिकाणी छेदतात त्या संपात बिंदूंना उपमर्मस्थाने म्हणतात. (यामध्ये षण्महान्ति व महामर्म स्थाने सोडावीत) बांधकामांमुळे किंवा इतर झाल्यास घरमालकास नुकसान पोहोचवतात.

**घराचे प्रवेशद्वार :- वास्तुशास्त्रात चारही दिशांना प्रवेश चालतो.**

गृहगतवरमैशं राक्षसे पुष्पदंते।
शुभकरमथ भल्लाटां शंकेद्रशे महेन्द्रे।
धनकुल पशुवृदिदं, शंसने तस्य।
भर्तुगृहगत शुभमानं पादमध्यं च भित्ते।।१।।
मयमत्
महेन्द्रे पुष्पदन्ते वा मुख्ये वा थ गृहक्षते।
सर्वेषा मपि वर्णानां द्वारं कुर्यात विशेषतः।।
मानसार अ ३६

पूर्व दिशेला जयंत व महेंद्र पदातून प्रवेश ठेवावा. दक्षिण दिशेला राक्षस (गृहक्षत) पदातून प्रवेश ठेवावा. पश्चिम दिशेला पुष्पदंत पदातून प्रवेश ठेवावा. उत्तर दिशेला भल्लाट पदातून प्रवेश ठेवावा.

चारही दिशांच्या वरील पदांतून मुख्य प्रवेशद्वार असणे हे धन, कूल, पशू व कीर्तीची वृध्दी करणारे आहे.

घराचे प्रवेशद्वार हे पूर्णपणे भिंतीला चिकटून जोडून नसावे. प्रवेशद्वारावर लाकडी उंबरठाही असावा.

१) पूर्वेला प्रवेशद्वार :- बौध्दिक पातळीवर कार्य करणारे शिक्षक, ब्राम्हण, वैदिक ज्ञान प्राप्त लोक, ज्योतिष, डॉक्टर इ. साठी उपयुक्त



राहते.

२) दक्षिणेस प्रवेशद्वार :- अग्निवर उपजीविका करणारे लोक, सैनिक, पोलीस, सराफ, इंजिनिअर, स्त्री विषयक वस्तू विक्रेते, लोहार

इ.

३) पश्चिमेस प्रवेशद्वार :- ड्रायव्हर, मेकॅनिक, रेल्वे, बस इ. साठी उपयुक्त राहतो.

४) उत्तरेस प्रवेशद्वार :- सावकार, व्यापारी, बिल्डर, राजकीय क्षेत्रातील व्यक्ती इ. साठी उपयुक्त ठरते.


कोणत्याही वास्तूमध्ये ब्रम्हस्थान हे मोकळे असावे. वास्तुशास्त्र हे ज्योतिषशास्त्रावरही अवलंबून आहे. मुख्यतः कुंडलीतील चतुर्थस्थान चतुर्थस्थानातील रास, तेथे असणारे ग्रह, चतुर्थस्थानावर दृष्टी टाकणारे ग्रह भूमीचा कारक ग्रह मंगळ, जातकाला चालू असणारी दशा, अंतर्दशा, गोचर ग्रहांचे शुभ किंवा अशुभ, पापग्रहांचे भ्रमण या सर्वाचा अभ्यास बृहत पाराशरी, जैमिनी सूत्र, सारावली, जातक, परिजात इ. ग्रंथांतील नियमांद्वारे करून जातकास वास्तुसौख्य लाभेल की नाही हे सांगता येते.

कोणतीही वास्तू घेताना किंवा नवीन वास्तू बांधताना मुख्यतः गृहकर्त्यास / गृहस्वामीस रवि व गुरू ग्रहाचे बल प्राप्त असावे परंतु जर ग्रह निर्बली अस्तंगत किंवा पापग्रहांनी विध्द असतील तर त्या ग्रहाच्या कारकत्वाप्रमाणे गृहस्वामीस पुढीलप्रमाणे त्रास होतो.

गृहस्वामीच्या कुंडलीत चंद्र बलहीन असता पत्नीस त्रास होतो. शुक्र बलहीन असता संपत्तीचा ऱ्हास होतो. घरात शिक्षणात अडथळे येतात. बुध ग्रह बलहीन असता पुत्रपौत्र हानी होते. मंगळ बलहीन असता भावंडांमुळे वादविवाद होतात किंवा भावंडांबाबत दु:खदायी घटना घडतात. शनि ग्रह बलहीन असता घरात चोरी होणे, हाताखालील नोकरांमुळे त्रास होणे इ. घटना घडतात. रवि बलहीन असता स्वतः गृहमालकास त्रास होतो. याप्रमाणे वास्तुशास्त्राचा ज्योतिषशास्त्राशीही संबंध येतो. वास्तुशांती, गृहप्रवेश किंवा घराचे बांधकाम करताना, दाराची चौकट बसवणे, पाया खोदणे इ. सर्व कार्यात मुहूर्त शास्त्राचा विचार करणे अगत्याचे राहते. सूर्यबल, चंद्रबल, राहुमुख, वृषचक्र, कलशचक्र इ. सर्वांचा विचार करून घेतलेले मुहूर्त हे त्या वास्तूत सुख व आनंद निर्माण करणारे राहतात.

वास्तुशास्त्र हा विषय मोठा आहे. तो थोडक्यात सांगणे शक्य नाही. आताच्या काळात ह्या विषयाबद्दल जनमानसात कुतूहल निर्माण होत आहे. त्यामुळे भारतीय वास्तुशास्त्राद्वारे या शास्त्राविषयी थोडीफार माहिती लोकापर्यंत पोहोचवण्याचा एक छोटासा प्रयत्न केला आहे.

।। श्री कृष्णार्पणमस्तु ।।




*With Best Compliments from*

# श्री. दिनेश रामचंदाणी

# श्री. राजू मलकानी

# श्री. प्रदीप शर्मा



*With Best Compliments from*

**श्री. चितोडकर**



**श्री. दिनेश इंगळे**

**श्री. भापकर**

**श्री. शिकारे**



# मानवी संस्कृतीचा अलंकार घर

- **चारुलता कुळकर्णी**



घर हे केवळ माणसांनाच प्रिय असते असे नाही, पाखरांनासुध्दा त्यांचे घरटे प्रिय असते. जग डळमळले तरी घर जागेवर राहावे, अशी सगळ्यांचीच इच्छा असते. केवळ आपलं घर टिकून राहावं यासाठी घर सोडून दिवसरात्र धावणारी माणसं पाहिली म्हणजे आपल्याला घराचं महत्त्व कळतं. 'घराला माणसांचा आधार आणि माणसांना घराचा आधार', असा हा अतूट संबंध आहे.

प्रत्येक घराला दोन अंगे असतात असे म्हणतात. 'स्थूल' वास्तू हे झाले घराचे बाह्य अंग. घरातले वातावरण हे झाले घराचे 'अंतरंग' वरचे ओढआणि कडेच्या भिंती ही झाली घराची 'प्रकृति' व घरात राहून जी सिध्द होते, ती 'घराची संस्कृती'. ज्या वास्तूत निवारा मिळतो आश्रय लाभतो आणि गरजा पूर्ण होतात ते आपलं घर. म्हणूनच लहान मुलं आपल्या आईचा हात पकडून म्हणतात,"आई घरी चल." उपचाराच्या निमित्ताने रुग्णालयात राहिलेले रुग्ण सुध्दा म्हणतात, "मला घरी जाऊ द्या, तिथे माझी देखभाल उत्तम प्रकारे होईल." कारण घरी गेल्यावर अनेक रुग्ण आपोआप बरे होतात.

ज्या वास्तव्यस्थानात घरधनी असतो, गृहलक्ष्मी असते, चिमणी पाखरे असतात. मातृदेवता असते, कुलाचार असतात, लहानसे देवघर असते, सणवार साजरे केले जातात. अशा आपल्या निवासस्थानाला आपण घर म्हणतो. म्हणूनच म्हणतात, "भारतीय माणूस हा घरवेडा आहे."

घरात राहणाऱ्यांची मने एकमेकांत गुंतून गेलेली असतात. कुठलेही कार्य आनंदाने वाजतगाजत केली जाते. कुणावर संकट आलं, आजारपण आलं तर अवघ्या कुटुंबावर त्याचे सावट पडते. ही घराची बांधिलकी, हे भारतीयांच वेगळेपण आहे.

प्रत्येक घर हे एक सांस्कृतिक केंद्र असते. घरात लहानपणी आपल्याला अनेक धडे मिळतात उदा. मातृभाषा, चालीरिती, उपासना यांचा व्यक्तीजीवनात प्रवेश घडतो तो घरात. आपल्याला 'आई' या नावाचा गुरू घरातच भेटतो. प्रत्येक घर हे अनेक कुलाचारांचे व परंपरांचे वाहक असते. संस्कृतीचा प्रवाह कुटुंब संस्थेच्या पात्रातून वाहतच असतो. घर हे जणू गंगेच्या तीरावर तीर्थ असते. आपले घरवेड आणि वेड्यातून आकाशाला येणारे 'घर' हे भारतीय संस्कृतीने जागतिक संस्कृतीला

दिलेले 'योगदान' आहे.

प्रत्येकाला त्याचे घर मिळावे असा प्रयत्न करणे हा शासनाचा धर्म आहे. संत गाडगेबाबा म्हणत, "तहानलेल्यांना पाणी द्या, भुकेलेल्यांना अन्न द्या, मुलामुलींची योग्य वयात लग्ने जमवा, बेघरांना घरे पुरवा." आजकाल वाढत्या लोकसंख्येमुळे आणि उपजीविकेच्या वाटा बदलल्यामुळे घरे दुभंगण्याची वेळ आली आहे. जागेअभावी 'आतिथ्याचा' संकोच होऊ लागला आहे. अनेक धर्मविधी कार्यक्रम कार्यालयातच पार पडू लागले आहेत. परस्परांच्या घरी येणे / जाणे विरळ होत चालले आहेत. त्यासाठी धार्मिक उत्सव, यात्रा या निमित्ताने तरी एकत्रित यावे. आपली घरे चांगली राहिली तर मुले बिघडण्याची शक्यता कमी होते. बहकणे, बिथरणे, बिघडणे, वाहवत जाणे, व्यसनाधीन होणे, मादक पदार्थांचे सेवन करणे, खोटे बोलणे, एका क्षणाच्या



सुखासाठी युगाची संस्कृती विसरून जाणे या प्रमादांच्या विळख्यांत सापडू पाहणाऱ्या नवीन पिढीला सावरण्याचे काम घरच करू शकते. खरं तर घरंदाजपणा हा मानवी संस्कृतीचा अलंकार मानावा लागेल. केवळ सजावट म्हणजे घर नव्हे, केवळ वस्तुसंभार म्हणजे घर नव्हे, महागड्या वस्तूंची दाटीवाटी म्हणजे घर नव्हे, कृत्रिमतेने प्रदूषित झालेल्या भावनिक वातावरणात आपल्याच तोऱ्यात उभा असणारा 'बंगला' म्हणजे घर नव्हे. पायाखालची चकाचक फरशी, दारावरची आकर्षक बेल आणि उंची रंगीबेरंगी पडद्यांची आरास म्हणजे



घर नव्हे. प्रेम, भक्ती, कृतज्ञता, ओढ, भावनिक, सुखदुखंःची ओढयांनी बहरलरली झोपडी जरी असली तरी तिला घराचा दर्जा प्राप्त होतो. मोडकळीस आलेलं आजोळसुध्दा प्रेमाची वास्तू ठरते. आपल्याला प्रिय वाटते. देवघरात निरांजन, नातवंडांना गोष्टी सांगणारी आजी, राखी पौर्णिमा आणि भाऊबीज या दिवशी परस्परांना स्मरण करणारी भावंडे यावरच आपलं घर टिकतं.

मातृभाषा, स्वधर्म आणि संस्कृती या सगळ्यांचा मिलाफ म्हणजे आपलं घर असतं. पृथ्वीतलावर राहणाऱ्या अवघ्या जीवसृष्टीला आपापले घरकुल प्रिय असते. सूर्यास्ताबरोबर पक्षी-पाखरं आपल्या घरट्यात येऊन परततात. गुरे गोठ्याकडे वळतात. मात्र मोठमोठ्या शहरांत माणसं

कामानिमित्त घराबाहेरच असतात. खरं तर माणसाने जास्तीत जास्त वेळ घरांत राहावे. घराच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी आपल्याला पेलेल व खचेल ते घरकाम करावे. आपले घर केवळ नोकरांवर सोपवू नये. परस्परांशी मुक्तपणे संवाद करावा. थोडक्यात अनेक बाबतींत समानता व जरूर तेथे स्वतंत्रता या तत्त्वाचे सर्वांनी पालन करावे. कारण स्त्रियांची नाती अनेक असतात. आई- वडिलांची मुलगी, पतीची पत्नी, मुलांची आई, सुनांची सासू आणि नातवंडांची आजी. या सर्व नात्यांतून सरमिसळ होऊन त्यातूनच टिकते घर!

घर असावे घरासारखे
नकोत नुसत्या भिंती।
प्रेम जिव्हाळा तेथे असावा,
नकोत नुसती नाती।।


कुटुंबात फक्त माणसचं असतात, असं मला वाटत नाही. तर राहत घरं, फर्निचर, अंगण, घरांतील पाळीव पशू-पक्षी, आवारातील प्राणी-पक्षी, झाडे हे सर्व त्या कुटुंबातच, एक भाग बनून राहतात. घराच्या भिंती जरी बोलत नसल्या तरी त्यांचं अस्तित्व मात्र जाणवत असतं. उपजीविकेसाठी माणसं जेव्हा घराबाहेर पडतात तेव्हा त्यांना अनेक अडीअडचणींना तोंड द्यावं लागतं तेव्हा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे घरांतील माणसं एकमेकांना सांभाळून घेतात. एकमेकांना मानसिक आधार देतात. म्हणूनच याला 'घर' म्हणतात.



*With Best Compliments from*

**Klassic Associates**

**Engg. & Cont. Nashik**



*With Best Compliments from*

**Harshad Gandhe**

**Engg. & Cont. Wada.**

# घर - कविच्या नजरेतून

- दिलीप सरवटे

घर या विषयावर विचार करताना आपण सामान्यपणे घराचा आकार, दिशा, त्याचे वास्तुशास्त्र, घराची अंतर्गत सजावट, घर कोणत्या शहरात आहे, कोणत्या भागात आहे व प्रामुख्याने आपली गरज व घराची किंमत यांचा ताळमेळ या बाबींचाच विचार करतो.

परंतु कवी/गीतकार या घराकडे वेगवेगळ्या संकल्पनेतून पाहतात. वानगीदाखल काही गाणी.

- खेड्यामध्ये घर कौलारू
- असावे घर ते आपुले छान
- घरात हसरे तारे असता पाहू कशाला नभाकडे
- जिवलगा, राहिले रे दूर दूर माझे
- या चिमण्यांनो परत फिरा रे
  घराकडे आपुल्या, जाहल्या तिन्हीसांजा
- दो दिवाने शहरमे, रात में और दोपहरमें
  आब–ओ-दाना ढूंढते है, एक आशियाना ढूंढते है
- दो पंछी दो तिनके, कहो ले के चले है
  कहाँ ये बनांएगे एक आशियाँ
- देखो मैंने देखा है ये एक सपना
  फूलोंके शहर में है घर अपना

खरंतर ही यादी अशीच कितीतरी लांबविता येईल. पण अशाच काही मोजक्या गाण्यांच्या अंतरंगात डोकावण्याचा हा छोटासा प्रयत्न.



उत्तमकुमार व शर्मिला टागोर यांच्या प्रमुख भूमिका असलेला व भीमसेन यांचे दिग्दर्शन लाभलेला 'दूरियाँ" हा चित्रपट आपल्याला आठवत असेल. या चित्रपटांतील एका गीताकडे खास लक्ष जाते. गीतकार सुदर्शन यांनी साध्या शब्दांमधून घराला मध्यवर्ती ठेवून उत्तुंग प्रेमाचे विचार मांडले आहेत.

गीत आहे. -'जिंदगी मेरे घर आना'

नायक म्हणतो -

'मेरे घर का सीधा सा इतना पता है
ये घर जो है चारों तरफ से खुला है
ना दस्तक जरुरी, ना आवाज देना
मेरे घर का दरवाजा कोई नही है
बडी धूप है दोस्त
कडी धूप है दोस्त
तेरे आँचलका साया चुराके जीना है जिंदगी'

तर नायिका म्हणते

'ना दस्तक जरुरी ना आवाज देना
हवाओंकी खुशबूसे पहचान लूंगी
तेरा फूल हूं दोस्त
तेरी भूल हूं दोस्त

तेरे हाथों मे चेहरा छुपाके जीना है जिंदगी'

खरच आपल्या घराचे छत, भिंती, दरवाजे, अंतर्गत सजावट या गोष्टी आपल्याला सुखी करतात का हो? या प्रश्नाचे उत्तर हो असे आहेच पण याशिवाय कुटुंबातील सर्वांविषयीचा जिव्हाळा, प्रेम हे देखील महत्वाचे किंबहुना प्रमुख घटक असावेत हा अनुभव आपल्याला हे गाणे ऐकताना येतो.

जयदेव यांच्या संगीतरचनेतील हे गीत गायले आहे अनुराधा पौडवाल व भूपिंदर सिंग यांनी.

साथ साथ या चित्रपटातील फारुख शेख व दीप्ती नवल या कलाकारांवर चित्रित झालेले जावेद अख्तर यांचे ये तेरा घर ये मेरा घर हे ' गाणे देखील असेच वैशिट्यच पूर्ण आहे,

'ये तेरा घर ये मेरा घर
किसीको देखना हो गर
तो पहले आके माँग ले
मेरी नजर तेरी नजर.'

गीतकारांनी या गीतात एक आगळीच अट घातली आहे. ते म्हणतात की हे घर तुम्हांला असेच नाही पाहता येणार. त्यासाठी तुम्हाला ते आमच्याच नजरेतून पाहावे लागेल.

या गराची वैशिष्टये देखील अशीच काहीशी आहेत.

'जो चांदनी नही तो क्या रोशनी है प्यार की
दिलों के फूल खिल गये तो फिक्र क्या बाहार की
हमारे घर ना आएगी कभी खुशी उधार की।'

कुलदीप सिंग यांच्या संगीतरचनेतील हे गीत जगजीत सिंग व चित्रा सिंग यांच्या सुमधुर स्वराने नटले आहे.

मराठीत देखील अनेक गाणी आपल्याला त्यातील काही खास भावनांमुळे आवडतात. सुधीर मोघे यांचे असेच हे गीत।

' घर दोघांचे, घरकुल पाखरांचे'

कवी एखाद्या छोट्याशा वाक्यामध्ये जीवनातले मोठे मर्म सांगून जातात. कविंच्या या गीतातील ही ओळ आपल्याला एक तत्वज्ञान शिकविते

'कधी भांडलो ही थोडे, थोडे दुरावलो ही
पण खूण त्या क्षणाची जपली मनात नाही
रुजले कधी न बीज दोघात संशयाचे'
' विश्वास ठेविला मी, विश्वास तू दिलास
जपलेस तू मला अन् मीही तुझ्या मनास
एका क्षणात आपुल्या सुख साधले युगांचे.'

सुधीर मोघ्यांनी या काव्यात किती मोठे तत्त्वज्ञान सांगितले आहे. काही काही खुणा/आठवणी न जपण्यातच जीवनातील खरी गंमत असते पण अनेक वेळा आपल्यात राम गणेश गडकरींच्या 'भावबंधन नाटकातील घनश्याम प्रवेश करतो आणि म्हणतो,'

"लतिके, बाण जेथून सुटतो तेथे त्याची काहीच साक्ष राहत नाही पण जिथे तो जाऊन भिडतो तिथे जखम होते व जखम जरी बरी झाली तरी कायमचा व्रण तरी शिल्लक राहतोच राहतो."

तर आपल्याला ठरवायचे आहे की आपण घनश्याम बनायचे की विसरभोळे धुंडीराजपंत!

# आमचे कोकणातील बैठे घर

**- सुरेश देहेकर**



हल्ली फ्लॅट संस्कृती आली आहे. पण पूर्वी तसे नव्हते. पूर्वी सर्वांचीच घरे बैठी असायची. पुढे अंगण असायचे तर मागे परसदार, अंगणात तुळशी वृंदावन असायचे. आईला तुळशीपूजा करताना मी अनेकदा पाहिले होते. त्यावेळी तिच्या चेहऱ्यावरचे सात्विक भाव पाहून खूप बरे वाटायचे. मीही तुळशीला हात जोडायचो मग आई हसून म्हणायची, "बाळ, तू तुळशीला हात जोडतोस खरा पण तुझे सारे लक्ष दूध- साखरेच्या नैवेद्यावर आहे. खरे ना!" आईचे म्हणणे १०० खरे होते.दिवाळी आली की रांगोळीकरता मातीचा ओटा आम्ही सर्व भावंडे मिळून करायचो. मग बेबीताई सुंदर अशी रांगोळी काढायची. आता अंगण उरले कुठे ? काही दिवसांनी अंगण दाखवा आणि पैसे कमवा असे सांगण्याची पाळी येईल. लोकसंख्या वाढत गेली व जमीन अपुरी पडू लागली. जागेला सोन्याचा भाव आला व ऐसपैस जागा जाऊन १० X १० च्या खुराड्यात लोक राहू लागली. कालाय तस्मै नमः म्हणतात ते काही खोटे नाही पण बैठी घरांची मजा फ्लॅट्सना नाही एवढे मात्र नक्की. आम्ही अंगणात मनसोक्त खेळायचो. धुळीने माखायचो. मग संध्याकाळी पुन्हा अंघोळ करायचो. त्यावेळी पाणीटंचाई नव्हती. आता लोकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. तिथे दुसरी अंघोळ ही कल्पना न केलेलीच बरी. संध्याकाळी 'शुभंकरोति' व परवचा हा ठरलेला असायचा. त्यावेळी एकत्र कुटुंब पध्दती होती. एकमेकांविषयी प्रेम, जिव्हाळा व आदर असायचा. पण भाऊबंदकी आली. जागेच्या वाटण्या झाल्या व सारे काही हरवले. आता लहानपणी भाऊ-भाऊ आणि मोठेपणी जीव घेऊ अशी स्थिती आहे. माणूस खूपच स्वार्थी आणि आपमतलबी बनत चालला आहे. आमचे बैठे घर मोठे ऐसपैस होते. वडील फॉरेस्ट डिपार्टमेंटमध्ये कामाला असल्याने त्यांना जंगलात जाण्यासाठी घोडा भत्ता (Horse Allowance) मिळायचा. आमच्याकडे घोडा होता. गाई-म्हशी होत्या. बैल होते. बैलगाडी होती. घोड्यांसाठी तबेला व गुराढोरांसाठी गोठा होता. पण आई व घरातील इतर बायका सर्व कामे विनातक्रार करायच्या. घराला एक माळा होता. माळ्यावर जायला आतून एक जिना काढला होता. ओटी, माजघर, देवघर, स्वयंपाकघर, पाहुण्यांची खोली, बाळंतबाईकरता खोली, असे सारे काही होते. न्हाणी

म्हणजे हल्लीचे बाथरूम व टॉयलेट म्हणजे शौचालय परसदारी होते. हल्लीच्या मुलांना परसदार म्हणजे काय ते सांगावे लागेल.

परसदारी वाफे काढून मिरच्या, वांगी, टॉमेटोंची रोपे लावली होती. न्हाणीघरातले पाणी तिथे फिरवले जाई. शिवाय शेवग्याचे झाड, आंबा, पारिजात व गुलमोहर ही झाडेही होती. फळझाडे व फुलझाडे यांचीही कमतरता नव्हती. सकाळी आजोबांना व आजीला मी कित्येक वेळा फुले आणून द्यायचो. मग माझ्या पाठीवर शाबासकीची थाप पडायची. शेवग्याच्या शेंगा आम्ही कधीच विकत खाल्ल्या नाहीत. शेजाऱ्यांना त्या फुकट वाटायचो. आता २० रुपये पाव किलो शेंगांचा भाव ऐकल्यावर झाडे लावण्याचा किती फायदा असतो याची जाणीव होते. आता अंगण गेले. परसदार गेले व माणुसकीही गेली. हल्लीच्या मुलांना जर असे लांब - रुंद परसदार पहावयास मिळाले तर ती मुले म्हणतील, "कोण हा मूर्ख माणूस ज्याने एवढी ऐसपैस व लांब -रुंद जागा सोडली आहे. एवढ्या जागेत दोनतीन इमारती बांधता येतील आणि जर बिल्डरला विकली तर भरपूर पैसाही मिळेल." कालानुरूप माणसाची विचारसरणी बदलत असते ती अशी.

मला मात्र आमचे कोकणातील बैठे घरच आवडते. आता आमचे बैठे घर खऱ्या अर्थाने खाली बसले आहे. ते उठून उभे राहाण्याची शक्यता फारच कमी आहे कारण वडील व काका वारल्यावर आम्ही सर्व वेगवेगळ्या ठिकाणी स्थलांतरित झालो व भाऊबंदकीमुळे व वडिलोपार्जित घरावर सर्वांचाच हक्क असल्याने कुणीही स्वतःहून पुढे येत नाही. आले तर त्यांचे एकमेकांशी पटत नाही अशी स्थिती आहे.

आता बहिणींपासून साऱ्यांचेच लक्ष आपल्या हिश्श्याकडे आहे. भावाची माया कुणालाच नको आहे. साऱ्यांना पैशाचीच माया प्रिय आहे, त्याला ते तरी काय करणार ?

आमच्या बैठ्या घरांनी दिलेले आनंदाचे क्षण मी आजही विसरू शकत नाही. माझ्या डोळ्यांसमोर फ्लॅशबॅकसारखे सारे चित्र उभे राहाते. गोठ्यात म्हशीचे दूध काढताना आई दिसते. घोड्यावरून रपेट करताना वडील दिसतात. देवघरात पूजा करणारी आजी व तिच्या चेहऱ्यावरील प्रसन्नतेचे भाव दिसतात. आजोबांनी माझ्या आवडीची गरमागरम आणलेली कांदाभजी आठवतात. असे एक ना दोन कितीतरी प्रसंग सांगता येतील. ही यादोंकी बारात न संपणारी आहे. पण या साऱ्या आठवणी मला आनंद देतात. काम करण्याची ऊर्जा देतात. भले आज आमचे बैठे घर पडायला झाले आहे तरी त्याच घरामुळे आम्ही आमच्या पायावर उभे राहिलो हे विसरता येणार नाही.

---

**चारोळी**


स्त्रीस्वातंत्र्यावर लेख लिहिले
समान हक्कांवर भाषणे ठोकली
गोडगोलेच्या प्रेमपाशात अडकून
वाघिणीची शेळी बनली।

**सुधा नांदेडकर**

# दिमाखदार पडदे

**- किर्ती वैती**

वेगवेगळ्या स्टाइलच्या खिडक्या, घराचा रंग आणि त्यांना साजेसे असे पडदे लावणे हासुद्धा घरसजावटीचा महत्त्वाचा भाग असतो. पण हल्ली साधे पडदे लावण्यापेक्षा लोकांना वेगवेगळ्या डिझाइनचे पडदे लावायला आवडतात. पण हे नव्या स्टाइलचे पडदे घरात लावणं इतकं खर्चीक असतं की त्यात पडद्याची आणखी एक जोडी विकत येईल. पण इतका खर्च न करता तुम्ही पडदे अगदी स्वस्तात मस्त सजवू शकता.



घराच्या सजावटीत पडद्यांची भूमिका फार मोठी असते पण पडद्याचे कापड निवडताना त्याचा फार विचार केला जात नाही. पडदे घराची शोभा वाढवत असतात हे तर खरेच पण पडद्यांची निवड घराच्या मालकाच्या चोखंदळपणावर आणि अभिरुचीवरही प्रकाश टाकत असते. पडदे घराच्या आणि खोल्यांच्या वैशिष्ट्यांना आणि सजावटीलाही उठाव देत असतात. म्हणून पडद्यांची निवड करताना ङगार बारकाईने विचार केला जात असतो. पडदे घराला उठावही आणू शकतात आणि निवड नीट न केल्यास घराची सजावट बिघडवूही शकतात. आपण बाजारात गेलो की लक्षात येते की साड्यांनंतर पडद्यातच अनेक रंग, अनेक डिझाइन्स आणि अनेक वाण बघायला मिळतात. अर्थात आपण बजेट ठरवून गेलो तर आवाक्यातले पडदे आपल्यासमोर निवडीसाठी उरतात. निवड थोडी सोपी होते. पडद्यात बघायची पहिली गोष्ट म्हणजे कापड. व्हेल्व्हेट, सिल्क या कापडांना पैसा जास्त लागतो पण ते घराला शोभिवंत करीत असतात. असे कापड परवडत नसेल तर आपण मिक्स कापड घ्यायला हरकत नाही. पण ते आपल्या घराच्या आतल्या भिंतींना शोभले पाहिजे. आपण मॅचिंगचा विचार करताना केवळ रंगांच्या मॅचिंगवर बोलतो पण भिंतींचा प्रकार आणि पडद्याचा दर्जा यांचेही एक मॅचिंग असते. पडद्याच्या रंगांवर खोलीचे किंवा घराचे वातावरण अवलंबून असते. घरात शांतता असावी असे वाटत असेल तर कॉटनचे पडदे चांगले वाटतात. तो इफेक्ट मखमल किंवा सिल्कच्या

पडद्यांनी साधत नाही. रंगसंगती अर्थात कलर मॅचिंगही आवश्यक असते. कापड घेताना घराचा रंग आणि पडद्याचा रंग जुळवून पाहता येत नाही. तेव्हा आपल्या घराच्या आतल्या भिंतींचे रंग लक्षात ठेवले पाहिजेत. घरातल्या सर्वच खोल्यांना एकाच प्रकारचा रंग दिला असेल तर सर्वच पडदे निवडताना त्या रंगाशी संगती साधणारा रंग निवडला पाहिजे. खोलीला हिरवा रंग असेल आणि तो गडद असेल तर तशाच रंगाचा पडदा असू नये. अशा वेळी फिकट हिरवा पडदा निवडावा. त्याने फार वेगळा इफेक्ट येतो. काही वेळा कॉन्ट्रास्ट मॅचिंगही साधले जाते. तेही चांगले पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, खोली मोठी असेल तरच खिडक्यांचे पडदे कॉन्ट्रास्ट रंगाचे असावेत. त्याने खोली लहान वाटते. घराच्या हॉलमध्ये हा प्रकार चालेल पण बेडरूमला हा नियम लागू होणार नाही. पडदा किती मोठा असावा याचाही योग्य निर्णय घेतला पाहिजे. त्याबाबत विचार करताना केवळ भिंती, त्यांना दिलेले रंग आणि त्यांची लांबी-रुंदी याचाच विचार करून भागत नाही तर घरातल्या इतर वस्तू, त्यांचे रंग, मांडणी, फर्निचर आणि त्यांचा प्रकार यांनाही महत्त्व असते. कारण पडद्यांनी केवळ भिंतींचीच नव्हे तर पूर्ण घराची शोभा वाढत असते.

★ पडद्यांचा प्रामुख्याने वापर होतो तो उजेड नियंत्रित करण्यासाठी तसेच खासगीपणा (प्रायव्हसी) जपण्यासाठी. याशिवाय खिडक्यांच्या कडा लपवण्यासाठी तसेच जागेच्या सजावटीचा केंद्रबिंदू म्हणूनही पडद्यांचा वापर केला जातो. डेकोरेटिव्ह पडद्यांमुळे घराचं सौंदर्य अधिकच खुलवता येतं.
★ पडद्यांमध्ये कॉटन, हॅण्डलूम, एम्बॉस, लेस, नीटिंग क्लॉथचे पडदे जास्त चांगले. पॉलिएस्टरच्या पडद्यांची फार देखभाल करावी लागत नाही. इस्त्रीचं झंझट नाही. त्यांचे रंगही लवकर उडत नाहीत. त्यामुळे हे पडदे वापरायला अधिक चांगले.
★ भारदस्तपणा, सौंदर्य यांची आवड असेल तर मात्र कॉटनच्या पडद्यांचा विचार करावा. यात वेगवेगळ्या रंगसंगती, लहान-मोठ्या चौकटी, पट्टे असलेलं कापड मिळू शकतं. घर तसंच ऑफिस दोन्हींसाठी ते उठून दिसतं. मात्र त्याची नीट देखभाल ठेवावी लागते. कॉटनच्या पडद्यांमध्ये थोडं जाड कापड हवं असल्यास जेकार्डचं मिळू शकतं.
★ फ्लोरोसेंट रंगाच्या पडद्यांचीही सध्या खूप चलती आहे.
★ व्हेल्व्हेटमध्येही पडद्यांचे बरेच प्रकार उपलब्ध आहेत.
★ उत्तम गुणवत्ता आणि सौंदर्य यावर तुमचा भर असेल तर सिल्कचे पडदे अनेक आकर्षक डिझाइन्स आणि रंगांत निवडता येतात. अत्यंत तलम, मखमली स्पर्श, ॲन्टिक लूक ही त्यांची वैशिष्ट्यं सांगता येतील.
★ किटकॅट टाइपमध्ये, प्लेन पॉलिएस्टरमध्ये आकर्षक रंगसंगतीत पडदे मिळतात. जिथे वारंवार पडदे बदलावे लागतात तिथे हे छान

दिसतात.

★ रिमोटवर ऑपरेट करता येणारे पडदेही आता बाजारात उपलब्ध झाले आहेत.

★ सध्या नेहमीच्या प्रकारांबरोबर को-ऑर्डिनेटर सेट म्हणजेच सोफा सेट आणि पडद्याचं सारखं कॉम्बिनेशन, फक्त प्रकार वेगळा, या प्रकारातही पडदे मिळतात.

★ खोली मोठी असल्यास मोठ्या डिझाइन्सचे आणि छोटी असल्यास छोट्या डिझाइन्सचे पडदे लावावेत.

★ खिडक्यांसाठी साधे, प्लेन पडदे लावताना मधोमध लेसने बांधून किंवा नीट चुण्या घेऊन अगदी खाली बांधून पडद्याच्या एकूण ॲपियरन्समध्ये आकर्षकता आणता येते.


★ पडद्याच्या रचनेमध्ये त्याची लांबी, उंची हा घटकही महत्त्वाचा आहे. लांब पडद्यामुळे तो लावलेल्या खिडकीबरोबरच बाकीची जागा तो उंच भासवतो.

★ पडदे शिवताना अमेरिकन प्लेट हा प्रकार जास्त लोकप्रिय आहे. स्कॅल्पची फॅशनही बरीच चालते. यात निरनिराळ्या प्रकारच्या झालरी मिळतात.

★ पडद्याचं आयुष्य वाढवायचं असेल तर त्याला अस्तर लावावं. त्यामुळे पडदे फिकट होत नाहीत. ते जास्त दिवस टिकतात.

★ लेसी कर्टन्स या थोड्या पारदर्शक प्रकाराचा डिव्हायडर म्हणून उपयोग करता येतो.

★ पडद्यांबाबत एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा, ती म्हणजे तुमचं घर तिसऱ्या-चौथ्या मजल्यावर किंवा त्यापेक्षा अधिक उंचीवर असेल तर शक्यतो गडद रंगाचे पडदे निवडावेत. त्यामुळे खोल्यांमधील जादा उजेड मंद व्हायला मदत होते. घर जर का तळमजल्यावर किंवा झाडांनी वेढलेलं असेल तर फिक्या रंगाचे पडदे निवडावेत. त्यामुळे बाहेरचा प्रकाश परावर्तित व्हायला मदत होते. खालच्या मजल्यावर घर असेल तर नेटच्या कापडाचे कपडे मुख्य पडद्याच्या आतून लावावेत. त्यामुळे प्रायव्हसी अधिक चांगल्या प्रकारे जपता येते. शिवाय उजेड आणि हवेला प्रतिबंध होत नाही.



★ घरातील पडदे व चादरी हे ऋतुमानानुसार बदलावेत. थंडीत सिल्क, जेकॉर्ड, सॅटिनच्या चादरी वापराव्यात.

- ★ बेडरूममध्ये बॉक्स टाइप दिवाण असल्यास व दिवाणाच्या आत चादरी, उश्याा, गा ठेवत असल्यास त्यात अध्येमध्ये तसंच कोपऱ्यात झुरळनाशक गोळ्या टाकाव्यात.

**टिप्स :**

- ★ घरातले पडदे, सोफ्याचं कापड किंवा कुशन कव्हर्स यांचे दोन-तीन सेट्स करून ठेवावेत.
- ★ पडदे, सोफा, कुशन कव्हर्स यांसाठी शक्यतो ब्राइट कलर्स वापरावेत.
- ★ शक्यतो हे कपडे पहिल्यांदा ड्रायक्लीन करावेत. नंतर ते घरी साध्या थंड पाण्यात धुतले तरी चालू शकतात.
- ★ पडदे, कुशन कव्हर्ससाठी आपण कोणत्या प्रकारचे कापड वापरतो, याचबरोबर ते कापड कसे वापरतो यालाही महत्त्व असतं. कधी कधी मांजरपाटासारखं अतिशय स्वस्त कापडही त्यावर थोडं भरतकाम करून सुंदर, रिच दिसू शकतं.


*With Best Compliments from*

Cell : 9323853300




**Paresh Soni**

**Real Estate Consultant**

116, 1st floor, Paradise Tower,
Alok Hotel, Naupada,
Thane(W)–400 602
Cell : 9323853300

*With Best Compliments from*




आमचे सर्व सभासद, ग्राहक व सर्व हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सारस्वत बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)
मिले यहाँ, दीनों जहाँ

प्रशासकीय कार्यालय: एकनाथ ठाकूर भवन, ९५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई -४०० ०२५. दूरध्वनी - (०२२) ६६०० ५५५५

# वास्तु टिप्स

- आश्विनी चव्हाण

**वास्तु टिप्स**

आरोग्यदायी जीवनासाठी झोपताना पूर्वेला व दक्षिणेला पाय करून झोपू नये . आपण कुठे व कसे झोपतो यावर आपले आरोग्य अवलंबून असते.

उत्त्तम आरोग्यासाठी उत्तर दिशेला पाय करून झोपावे म्हणजे आर्थिक, मानसिक,शारीरिक प्रगती चांगली होते.

आजार बरे होत नसतील तर झोपण्याची जागा बदलून पाहा. म्हणजे आजार लवकरात लवकर बरा होईल.

बेडसमोर आरसा अथवा आरशाचे कपाट येऊ देऊ नये. त्यामुळे शरीरातील ऊर्जेची हानी होते व आजार वाढतात.

आरोग्यदायी जीवनासाठी बॉक्स बेडवर झोपू नये बॉक्स बेड वर झोपणे म्हणजे आजारांना निमंत्रण देण्यासारखे आहे.

घरामध्ये सुख-समृध्दीदायक आयुष्यासाठी फुटलेले आरसे, फुटलेली खेळणी,तुटलेले फर्निचर इ. वस्तु ठेवू नये .

भरपूर प्रगतीसाठी आणि यशदायी गतिमान आयुष्यासाठी बंद पडलेले घड्याळ घरामध्ये ठेवू नये .

झोपताना घराच्या दक्षिण किंवा पश्चिम दिशेमध्ये बेड असावा म्हणजे आरोग्य आणि ऐश्वर्य चांगले मिळते.

घरातील वय वर्ष २५ ते ६० असलेल्या कमावत्या व्यक्तीने उत्तरेला पाय करून झोपावे. उत्तर दिशा ही उत्तरोत्तर प्रगती करणारी असते त्यामुळे कोणतेही काम करताना उत्तरेला तोंड करून करावे.

घरामध्ये अडगळ ,भंगार किंवा जुन्या बंद पडलेल्या वस्तू ठेवणे म्हणजे आपणच आपली प्रगती थांबविण्यासारखे आहे.

घराची उत्तर दिशा बंद असेल तर कर्जबाजारी होण्याचे प्रमाण वाढते आणि घरातील आर्थिक समस्या वाढतात.

नवीन घर घेताना वास्तुशास्त्रानुसार घर आहे की नाही हे पाहून घर विकत घ्यावे म्हणजे घरामध्ये सुख-समृद्धी आणि उत्तम आरोग्य राहते.

नवीन घर घेताना घराचा दरवाजा उत्तर किंवा पूर्व दिशेला असावा म्हणजे घराच्या दरवाजातून बाहेर बघताना उत्तर किंवा पूर्व दिशा असावी.

नवीन घर घेताना दक्षिण, पश्चिम, नैऋत्य आणि आग्नेय या दिशातून येणारे दरवाजे टाळावेत.

भाग्योदयासाठी घराच्या हॉलमध्ये बांबू ट्री म्हणजेच लकी ट्री ठेवावा.

घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये आणि घरामध्ये शुभ ऊर्जा भक्कम राहावी यासाठी मुख्य दरवाजाला लाकडी उंबरा बसविणे महत्त्वाचे

आहे.

घराच्या मुख्य दरवाजावरती वाळलेली फुले, पाने, सुकलेली तोरणे काढून टाकावीत. म्हणजे घरामध्ये शुभ उर्जा प्रवेश करण्यास कोणताही अडथळा निर्माण होत नाही.

घरातील सर्व खोल्यांमधील घड्याळे ही उत्तर किंवा पूर्व भिंतींवर लावावीत म्हणजे घड्याळाकडे बघताना आपले तोंड पूर्व व उत्तर या शुभ दिशांना होते.

घरातील सर्व खोल्यांमधील कॅलेंडर्स ही पूर्व किंवा उत्तर भिंतींवर लावावीत म्हणजे कॅलेंडर कडे बघताना आपले तोंड शुभ दिशांना होते.

कोणतेही काम करताना आपले तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला असावे म्हणजे आपले काम वेळेत आणि विना अडथळा पार पडते .

झोपताना कधीही दक्षिणेला पाय करून झोपू नये त्यामुळे आजारपण वाढते आणि माणूस कर्ज बाजारी होतो .

घराच्या ईशान्य दिशेला वजन ठेवू नये. ईशान्य दिशा ही नेहमी हलकी आणि मोकळी ठेवावी म्हणजेच घरामध्ये शांतता राहते .

सुखसमृद्धीसाठी घराच्या मुख्य दरवाजासमोर बालाजीचा फोटो लावावा .

बेडरूममध्ये देवघर किंवा देवाची मूर्ती, फोटो असू नये .

लाल, काळा, मरून हे तीन कलर घरामध्ये जास्त वापरू नयेत यामुळे घरा मध्ये सुखसमृद्धीदायक आयुष्यासाठी अडचणी येऊ शकतात .

झोपताना बेडस्विच बोर्ड पाशी येऊ देऊ नये .

त्यामुळे निद्रानाशाचा अडथळा येऊ शकतो .

घरामध्ये नकारात्मक शक्ती प्रवेश करू नये म्हणून मुख्य दरवाजाजवळ तुळस असणे आवश्यक आहे

दरवाजाच्या चौकटीवर आतूनबाहेरून विघ्नहर्त्याची म्हणजेच गणपतीची टाइल्स लावणे आवश्यक आहे .

घराच्या प्रत्येक रूममध्ये खडे मिठाचा बाऊल ठेवणे .

आठवड्यातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने फरशी पुसणे यामुळे घरामध्ये सुख समृद्धी राहते.

मुलांची शैक्षणिक प्रगती चांगली होण्यासाठी त्यांना पूर्वेला डोके आणि पश्चिमेला पाय करून झोपवावे .

मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी पूर्वेला तोंड करून अभ्यासाला बसवावे .

लहान मुलांना घराच्या नैऋत्य दिशेमध्ये झोपवू नये त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येऊ शकतात .

घरामध्ये पैसा, संपत्ती, ऐश्वर्य टिकवून राहण्यासाठी घराच्या नैऋत्य दिशेमध्ये तिजोरी किंवा पैशाचे कपाट ठेवावे .

घरामध्ये शैक्षणिक आर्थिक प्रगती व्हावी यासाठी भडक रंगाचे कपडे वापरणे टाळावे .

ईशान्य दिशेला वास्तुदोष असेल तर मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतात .

नवीन घर बांधताना किंवा विकत घेताना घराचा आकार आयताकृती किंवा चौकोनी असावा .

मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी सरस्वतीचे

प्रज्ञावर्धन स्तोत्र आणि गणपती अथर्वशीर्ष मुलांनी रोज म्हणावे .

उत्तम वैवाहिक आयुष्यासाठी नवरा- बायकोने दोन जोडलेल्या बेड वर झोपू नये .

नवीन घर घेताना पहिल्या व शेवटच्या मजल्यावरचे घर विकत घेणे टाळावे.

आरोग्यदायी जीवनासाठी घरामध्ये पिवळा, काळा, लाल हे रंग कोठेही येऊ देवू नये .

घर बांधताना यशस्वी जीवनासाठी नैऋत्य दिशेला बोअरिंग, विहीर पाण्याची टाकी बांधू नये.

दक्षिणेला पाय करून झोपू नये कारण आरोग्य, पैसा व मानसिक ताण यांची हानी होते .

घराच्या मुख्य दरवाजाजवळ उतरता किंवा चढता जिना असेल तर अनेक वाईट घटनांना सामोरे जावे लागते .

घराच्या मुख्य दरवाजासमोर लिफ्ट असेल तर घरामध्ये आर्थिक ,शारीरिक व मानसिक हानी होते .

हिंशू पशू पक्ष्यांची, जंगली जनावरांची तोंडे घरामध्ये लावु नयेत .

घरात किंवा घराच्या बाहेर काटेरी वनस्पती ठेवू नयेत .

उत्तम प्रगती हवी असेल तर काळ्या शाईचे पेन वापरू नये .

उत्तम प्रगतीसाठी तांब्याची अंगठी करंगळी शेजारच्या बोटामध्ये म्हणजेच अनामिकेमध्ये धारण करावी .

कोणतेही काम करताना प्रत्येक गोष्टीला हो म्हणावे नकारात्मक बोलणे टाळावे.

घरामध्ये बुडते जहाज किंवा वादळामध्ये फसलेली नौका यांची चित्रे भिंतींवर लावू नयेत .

घरामध्ये कोठेही लाल, मरून, काळ्या रंगाचे पडदे वापरू नयेत .

घराच्या मुख्य दरवाजावरती भयानक चित्रे, लिंबु मिरची ,राक्षसाची तोंडे असे चित्र लावू नये.

घरामध्ये अश्रू ढाळणाऱ्या स्त्रियांची, पुरुषांची किंवा मुलांची चित्रे लावू नयेत.

घराच्या मुख्य दरवाजावरती सुकलेली फुले, वाळलेली पाने यांची तोरणे जास्त दिवस ठेवू नये.

घराचा मुख्य दरवाजा पूर्ण उघडणे महत्त्वाचे आहे म्हणजेच मुख्य दरवाजाच्या आत आणि बाहेर कोणताही अडथळा ठेवू नये .

घरामध्ये सुखसमृद्धी मिळावी यासाठी सकाळ- संध्याकाळ धूप, अगरबत्ती, निरंजन लावणे महत्त्वाचे आहे .

घरामध्ये सुखसमृद्धी मिळावी यासाठी घरामध्ये नकारात्मक बोलणे, भांडणे टाळावीत .

मुलांच्या उत्तम प्रगतीसाठी त्यांची बेडरूम ईशान्य, उत्तर किंवा वायव्येला असावी.

मुलांचे स्टडी टेबल पूर्व आणि ईशान्य दिशेमध्ये असावे .

मुलांच्या उत्तम शैक्षणिक प्रगतीसाठी स्टडी टेबलचा आकार आयताकृती, चौकोनी असावा, गोलाकार नसावा .

मुलांच्या बेडवरती किंवा स्टडी टेबलवरती कपाट असु नये .

आपल्या घराचे पार्किंग कोणत्याही दिशेस असो परंतु पार्किंगमध्ये गाडी लावताना उत्तर किंवा

पूर्वेला तोंड करून लावावी .

नवीन कार घेताना लाल, काळा व मरून कलर या रंगाची कार घेणे टाळावे .

नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटसच्या अंकांमध्ये चार व आठ हे अंक येऊ देऊ नये .

नवीन कार घेताना कारच्या नंबर प्लेटमधील अंकांची बेरीज तीन, सहा, नऊ अशी असावी अंकांची टोटल चार व आठ नसावी .

कार प्रोटेक्शनसाठी कारच्या डिक्कीमध्ये खडे मीठ कापडी पिशवा मध्ये भरून ठेवावे .

घराच्या आग्नेय दिशेला टॉयलेट, पाण्याचे बेसिन येऊ देऊ नये .

घर बांधताना ईशान्य दिशेला जिना येऊ देऊ नये.

घराची उत्तर दिशा बंद असेल तर हेल्थ आणि वेल्थ प्रॉब्लेम येऊ शकतात .

घरामध्ये देवांचे फोटो भिंतींवर टांगून ठेवू नये, त्यांचे पावित्र्य भंग होते .

घरातल्या कर्त्या व्यक्तीने वायव्य दिशेला झोपू नये.

घरामध्ये कोठेही फॉल सिलिंग करू नये. घराची उंची कमी होते त्यामुळे घरातील अडचणी वाढू शकतात.

इन्व्हर्टर , यू.पी.एस. बॅटरी घराच्या आग्नेय दिशेला असावी.

ऑफिसमधले टेबल आयताकृती किंवा चौकोनी असावेत गोलाकार नाावेत .

ऑफिस विकत घेताना ऑफिसचा दरवाजा उत्तर, पूर्व किंवा ईशान्येचा असावा.

व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने उत्तर दिशेला तोंड करून बसावे .

ऑफिसमधील खिडक्या उत्तर आणि पूर्व दिशेला असतील तर भरपूर प्रगती होते .

व्यावसायिकाने झोपताना उत्तरेला पाय करून झोपावे म्हणजे व्यवसायात लाभ भरपुर होतो .

ऑफिसमध्ये अकाउंट डिपार्टमेंट उत्तर किंवा वायव्य दिशेला असावे .

ऑफिसमध्ये लाल, काळा, मरून हे रंग वापरू नयेत.

ऑफिसमध्ये ईशान्य दिशेला पिण्याचे पाणी ठेवावे आणि जागा सुद्धा रिकामी ठेवावी .

ऑफिसच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये खड्डा, चढ-उतार, उंच वाढणारी झाडे अशा गोष्टी येऊ देऊ नयेत .

ऑफिसमध्ये खूप मोठे देवघर ठेवू नये. देवाचा छोटासा फोटो ठेवावा .

ऑफिसमध्ये इन्व्हेटर, यु.पी.एस. बॅटरी आग्नेय दिशेला असावीत.

ऑफिसमध्ये टॉयलेट हे वायव्य दिशेला असावे.

देवघर घराच्या ईशान्य दिशेला असावे .

घरामध्ये किंवा दुकानामध्ये देवाची पूजा करताना आपले तोंड पूर्व दिशेला करावे .

गणपती बाप्पाची मुर्ती घराच्या ईशान्य दिशेला स्थापन करावी आणि पुजा करताना आपले तोंड पुर्व दिशेला करावे .

देवघरामध्ये एका देवाच्या दोन किंवा तीन मूर्ती कधीही ठेवू नयेत. प्रत्येक देवाची एक मूर्ती ठेवावी.

देवघरामध्ये उदबत्ती, निरंजन आणि समई देवघराच्या आग्नेयेला ठेवावी .

सुखसमृद्धीसाठी घराची दक्षिण आणि पश्चिम दिशा जास्तीत जास्त जड करावी .

दक्षिण दिशेचा वाईट प्रभाव नष्ट करण्यासाठी दक्षिणेला अशोकाची किंवा सागाची उंच झाडे लावावीत.

घरामध्ये जाळ्या-जळमटे, कोळ्यांची घरटी लागू देऊ नये. जाळ्या-जळमटे मध्ये राहू केतू या पाप ग्रहांचे अस्तित्व असते .

झुरळे, मुंग्या, ढेकूण, पाली हे घरात होणे म्हणजे अशुभाचे संकेत आहेत वेळच्या वेळी पेस्ट कंट्रोल करावे .

खराब झालेल्या वस्तू शिळे अन्न ,भुरा लागलेले खाद्य पदार्थ यांचा संग्रह करू नये यामुळे घरामध्ये नकारात्मक शक्ती वाढते .

शुभलक्ष्मी आगमनासाठी मुख्य प्रवेशद्वारावरती स्वस्तिक आणि घराच्या आतुन बाहेरून गणपताची टाइल्स लावावी.

घराचा उंबरा काळ्या कडाप्पाचा लावू नये लाकडी सागवानी असावा.

घराचा उंबरा पांढरे मार्बल ,प्लायवुड किंवा जंगली लाकडापासून बनवलेला नसावा.

घराच्या मुख्य दरवाजातील पायपुसणी हिरव्या, निळ्या, पिवळ्या, क्रीम कलरची असावी.

घराच्या मुख्य दरवाजातील पायपुसणी लाल, काळ्या ,मरून रंगाची नसावी.

सेफ्टी डोअरचा कलर काळ्या रंगाचा असु नये. क्रिम, आयव्हरी या रंगाचे सेफ्टी डोअर हवेत.

घराची डोअर बेल ही पालीचा चूक-चूक आवाज करणारी बसवू नये हे अशुभ आहे.

घराची डोअर बेल ही घंटेचा आवाज करणारी असावी हे शुभ असते.

घराची डोअर बेल कोणत्याही मंत्राची किंवा आरतीची नसावी या अपूर्ण वाजल्यामुळे या मंत्र सामर्थ्याचा घराला काही उपयोग होत नाही.

सेफ्टी डोअर आणि मुख्य दरवाजांना महिन्यातून एकदा ऑइलिंग करून घ्यावे. दरवाजातून कर-कर आवाज येणे हे अशुभ लक्षण आहे.

घरामध्ये स्वयंपाकघर किंवा इतर ठिकाणी असलेल्या नळातून पाणी टपकणार याची काळजी घ्यावी पाणी टपकणे अशुभ मानले जाते.

घरामध्ये किंवा घराच्या बाहेर चप्पल, शूज कधी पालथ्या पडू देऊ नयेत. त्यामुळे घरामध्ये नकारात्मक शक्ती वाढून त्रास होऊ शकतो.

घराच्या मुख्य दरवाजासमोर आरसा असू नये कारण मुख्य दरवाजातून चांगली उर्जा बाहेर परावर्तित होते.

विंड चाइमचा (पवन घंटी) मधुर आवाज मनाला शांती देतो. दुःख दुर करतो. संगीताचा आपल्या शरीरावर सकारात्मक प्रभाव पडतो.

विंड चाइम (पवन घंटी) ही सहा पाइपची घराच्या वायव्य दिशेला लावावी.

नवीन जागी मन रमत नसेल किंवा कोणत्याच कार्यात यश येत नसेल तर घराला रंगरंगोटी करावी, घरातील अडगळ, भंगार काढून टाकावेत.

फिश पॉट घराच्या उत्तर आणि ईशान्य दिशेला ठेवावा.

मुलांच्या स्टडी टेबलच्या समोर लक्ष विचलित

करणारे पोस्टर किंवा चित्र लावू नये, त्याऐवजी अभ्यासाचा चार्ट पेपर किंवा टाइम टेबल लावावे.

घरामध्ये सुकलेली फुले, पाने, झाडे ठेवु नये त्यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

हसरा हॅप्पी मॅन घरात असेल तर हे सकारात्मक दृष्टिकोन उत्साह व आनंदी जीवनाचे प्रतीक मानले जाते. हे प्रतीक घरात ठेवल्यामुळे दुःख दूर होऊन आनंदी राहण्यासाठी प्रेरणा मिळते.

हसरा हॅप्पी मॅन घराच्या मुख्य दरवाजासमोर तोंड करून ठेवावे.

देवावर वाहिलेली फुले, हार म्हणजेच निर्माल्य घरामध्ये ठेवणे चांगले नसते लगेचच त्याचे वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे.

देवी-देवतांच्या मूर्ती किंवा फोटो भितींवर शो-पीस प्रमाणे लावू नयेत. त्यांचे पावित्र्य भंग होते.

मुख्य प्रवेशद्वाराकडे पाय करून झोपू नये त्यामुळे घरामध्ये येणाऱ्या लक्ष्मीचा अपमान होतो.

घरातील महत्त्वाची पुस्तके, कागदपत्रे पूर्व दिशेला असलेल्या कपाटात ठेवावीत.

नवीन घर घेताना बिल्डिंग आणि स्कीमच्या प्लॉटचा एंटरन्स उत्तर आणि पूर्वेचा असावा.

घरामध्ये पैसे टिकून राहावे सुख - समृद्धी लाभावी यासाठी दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर गजलक्ष्मी घरामध्ये उत्तरेला तोंड करून स्थापन करावी.

वास्तुपुरुष हा वास्तुशांती केल्यावर घराच्या आग्नेय दिशेला स्थापन करावा.

वास्तुशांती झाल्यानंतर सोन्याचा वास्तुपुरुष स्थापन करावा.

घरामध्ये झाडू दरवाजाच्या मागे ठेवावा. समोर दिसेल असा ठेवु नये.

घराच्या मुख्य दरवाजासमोर ओळीने तीन किंवा दोन दरवाजे नसावेत.

ब्रम्हस्थळाच्या मध्यभागी प्लॉट बसका असल्यास अनेक क्षेत्रांत अडचणींचा सामना करावा लागतो.

घरामध्ये तुटलेली, फुटलेली, चीर पडलेली भांडी ठेवू नयेत.

घराच्या आग्नेय दिशेला नळ किंवा पाण्याची टाकी येऊ देऊ नये त्यामुळे घरामध्ये पैसा टिकत नाही.

कार किंवा टू - व्हीलर पार्क करताना उत्तर आणि पूर्व दिशेला तोंड करून पार्क करावी.

कारमधील इंटेरिअर आणि सीट कव्हर काळे, निळे, लाल, मरून या डार्क रंगाचे नसावे.

कारमधील इंटेरिअर आणि सीट कव्हर व्हाईट, ऑफ व्हाईट, आयव्हरी, क्रीम या रंगाचे असावेत.

घराच्या खिडक्या पूर्व आणि उत्तर दिशेला असाव्यात म्हणजे सूर्यप्रकाश जास्तीत जास्त घरामध्ये येतो.

दिवाळीचे सहा दिवस लक्ष्मी आगमनाचे, लक्ष्मी पुजनाचे आणि लक्ष्मीला फिरता देणारे असतात. त्यामुळे घरामध्ये आनंददायी वातावरण ठेवावे. भांडणे, वादविवाद, नकारात्मक बोलणे टाळावे.

दिवाळीचे सहा दिवस शुभ-पुण्यकाल लक्ष्मीदायक असतो. लक्ष्मीचा वरदहस्त कायमस्वरूपी घरावर राहावा यासाठी या कालावधीमध्ये अशुभ कृत्य, अशुभ वर्तन टाळावे.

दिवाळीमध्ये लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी घराच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर सुंदर रांगोळी काढावी.

लक्ष्मी पूजनासाठी श्रीयंत्र, लक्ष्मीचा फोटो, टाक, नाणी, सोने, चांदी, गजलक्ष्मी आणि कुबेर मूर्ती असे ठेवावे.

घराला रंगरंगोटी करताना घराच्या दक्षिण व पश्चिम भिंतीला डार्क रंगसंगती करू शकता.

महिन्यातून एक ते दोन वेळा घरामध्ये गोमूत्र सिंचन करावे.

घरातील देवघर बाथरूम किंवा टॉयलेटच्या बाजूला ठेवू नये.

हॉल, किचनमध्ये बांबू - ट्री लावल्याने तेथील नकारात्मक ऊर्जा कमी होते.

घराच्या ईशान्य दिशेला पाण्याचा कलश ठेवावा. त्यामुळे घरामध्ये सुखसमृद्धी येते.

बेडरूमच्या बाहेरील भिंतींवर चिरा पडू देऊ नयेत यामुळे घरामधील अडचणी वाढू शकतात.

घरातील समोरच्या भागात, बालकनीमध्ये काटेरी किंवा टोकदार पानाचे रोप लावू नये. हे रोप नकारात्मक ऊर्जा प्रदान करते.

घरामध्ये तुटलेल्या मूर्तीचे विसर्जन करावे, विसर्जनाच्या आगोदर विधिवत पूजा करून वाहत्या पाण्यामध्ये विसर्जन करावे.

वास्तुनुसार प्रवेशद्वार सदैव घराच्या आत उघडणारे हवे मुख्यद्वार दोन भागांमध्ये विभागणारे नसावे.

आपल्या आवडीची सुगंधित फुले नेहमी आपल्या बेडरूममध्ये वायव्येला ठेवावीत.

मेडिकल शॉप हे दक्षिणमुखी असू नये.

औषध - गोळ्या नेहमी ईशान्य दिशेला ठेवाव्यात.

औषध घेताना तोंड उत्तर अथवा पुर्व दिशेला करायला पाहिजे.

घरामध्ये पाणी पिताना आपले तोंड उत्तर अथवा पूर्व दिशेला करावे.

घरामध्ये जेवताना आपले तोंड उत्तर अथवा पूर्व दिशेला करावे.

देव - देवतांच्या मूर्ती शोकेसमध्ये ठेवू नयेत.

घराचे प्रवेशद्वार नेहमी आकर्षक ठेवा. दारामध्ये नेहमी प्रकाश राहील याची काळजी घ्या यामुळे घरामध्ये सकारात्मक ऊर्जा प्रवाहित राहते.

घरामध्ये जास्त दिवस तुटलेल्या वस्तू, कचरा साठवून ठेवू नयेत त्यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

घरामध्ये तुटलेली फ्रेम, आरसे असतील तर ते घरामधून काढून टाकावेत यामुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

नवीन फर्निचर करताना फर्निचरला काळा, मरून, रेड, डार्क ब्लु हे रंग वापरू नयेत.

घरामध्ये नवीन फर्निचर करताना बेडसमोर कपाटांचे, फर्निचरचे टोकेरी कॉर्नर येऊ देऊ नये.

घरामध्ये नवीन फर्निचर करताना कपाट, तिजोरी उत्तरेला अथवा पूर्वेला तोंड करून ठेवावी.

लहान मुलांनी अभ्यासातील प्रगतीसाठी गणपती अथर्वशीर्ष वाचावे.

सर्व ग्रहदोष निवारणासाठी आणि उत्तम सुरक्षा कवच मिळविण्यासाठी आपण हनुमान चालिसा वाचणे आवश्यक आहे.

घरामध्ये सुख-समृद्धी, लक्ष्मी स्थिर राहण्यासाठी घरातील स्त्रियांनी लक्ष्मी उपासना,

वैभव लक्ष्मी व्रत नक्की करावे.

वैवाहिक जीवनात सुख-शांती राहण्यासाठी दोन जोडलेल्य बेड वर नवरा-बायकोनी झोपू नये.

घरामध्ये गंजलेले, तुटलेले दरवाजे नसावेत त्यामुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होऊन त्याचा घरावर वाईट परिणाम होतो.

घरामध्ये पाण्याचा सप्लाय उत्तर-पूर्व दिशेकडून करावा.

घरामध्ये एखादी इलेक्ट्रॉनिक वस्तू खराब किंवा तुटलेली असेल तर अशी वस्तू घरामधून काढून टाकावी त्यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

घरातील पंखे, कूलर यांचा आवाज येत असेल तर दुरुस्त करून घ्यावेत यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

घरामध्ये झाडू उभा किंवा पाय लागेल असा ठेवू नये.

देवघरामध्ये खिडकी व दरवाजे उत्तर-पूर्व दिशेमध्ये असाव्यात.

वास्तुमध्ये सुख, शांती, समृद्धी कायम टिकून रहावी यासाठी दरवर्षी पूजा-पाठ, वास्तुशांत, होमहवन यासारखे धार्मिक विधी नेहमी करणे गरजेचे आहे.

नवीन घर विकत घेतल्यानंतर फक्त गृहप्रवेश न करता विधिवत योग्य शुभ-मुहुर्ताला वास्तुशांत करून राहायला जावे म्हणजे वास्तू लवकरात लवकर लाभते.

ग्रहबल वाढविण्यासाठी योग्य वास्तू तज्ञाकडून आपल्या घराची व्हिजिट करून घेणे आणि योग्य ज्योतिषाकडून पत्रिका दाखवुन ग्रहदोष निवारण करून घेणे.

यशस्वी जीवनासाठी आध्यात्मिक जीवनशैली, सद्‌वर्तन, नम्रपणा, दानशूरता, संयमी वृत्ती या पाच गोष्टींचा भरपुर उपयोग होतो.

मुख्य दरवाजाच्या पाठीमागे कपड्यांचे रॅक किंवा किल्ल्यांचे रॅक लावून ठेवू नये.

घराच्या मुख्य दरवाजासमोर घरातील कोणत्याही व्यक्तीचा किंवा फॅमिलीचा ग्रुप फोटो लाव नये.

घरातील फॅमिली फोटो हा दक्षिण किंवा पश्चिम भिंतींवर लावावा म्हणजेच दक्षिण भिंतीवर उत्तरेला तोंड करून आणि पश्चिम भिंतींवर पूर्वेला तोंड करून लावावा.

घरातील कुटुंबांच्या सुख-समृद्धी साठी फॅमिलीचा एकत्रित फोटो दक्षिण, पश्चिम भिंतींवर लावावा.

घरामध्ये सुख-समृद्धी साठी घरातील खोल्यांना वेगवेगळा रंग देवु नये.

बेडच्या समोर आरसा किंवा प्रतिबिंब पडेल अशी कोणतीही वस्तू ठेवू नये.

बेडरूममध्ये वाहता धबधबा किंवा पाण्याचे चित्र लावू नये.

घरात हॉल अथवा बेडरूममध्ये कोठेही बुडत्या जहाजाचे, हेलकावे खाणाऱ्या बोटीचे चित्र लावू नये.

घरात हॉल अथवा बेडरूममध्ये आदिवासी रडक्या, अश्रू वाहणाऱ्या, नैराश्य दाखवणाऱ्या अशा कोणत्याही स्त्री-पुरुषांची चित्र लावू नयेत.

कोणत्याही बेडरूममध्ये बेडच्या वरती लटकते

झुंबर किंवा लॅम्प येऊ देवू नये.

घरात बेडरूम मध्ये दक्षिण भिंतीला आरसा येऊ देवु नये.

मास्टर बेडरूममध्ये एकट्या स्त्री, दु:खी, रडलेल्या स्त्रीचे चित्र लावू नये हसती-खेळती चित्रे लावावीत.

घरामध्ये डार्क पिवळा रंग देऊ नये, हा रंग पोटाचे आजार वाढविणारा असतो.

घरामध्ये भिंतीला लालभडक रंग देऊ नये यामुळे घरात चिड-चिड, वादविवाद, भांडणे आणि उष्णतेसंबंधी विकार होऊ शकतात.

घरामध्ये डार्क गुलाबी, बेबी पिंक असे कलर देऊ नये यामुळे ढेकुण, कृमी-किटक, जाळ्या-जळमटे, कोळ्याची घरटी असे लागतात.

घरात सिलिंगला फक्त व्हाईट कलर द्यावा, कोणतेही डार्क रंग देवू नये त्यामुळे आकाशतत्त्व बिघडते.

घराच्या नॉर्थ आणि ईस्ट भिंतींना डार्क रंग किंवा अवजड फर्निचर ठेवू नये.

सेफ्टी डोअर किंवा मुख्य महाद्वार यांना काळा, लाल किंवा मरून कलर देवू नये. आयव्हरी किंवा चॉकलेटी कलर द्यावा.

नॉर्थ-ईस्ट या भिंतीवरती अवजड पेंटिंग, झुंबर, फोटो, कपाटे किंवा धान्याच्या कोठ्या ठेवू नयेत.

मन:शांती आणि घरातील प्रगतीसाठी प्रत्येक रूमची ईशान्य दिशा मोकळी ठेवावी.

घरामध्ये इस्त्री, शिवणकाम, भाजी कापणे, मुलांचा अभ्यास घेणे किंवा कॉम्प्युटरवर काम करणे ही शुभ कामे पूर्व दिशेला तोंड करून करावीत.

घरातून व्यवसाय करीत असाल तर उत्तरेला तोंड करून टेबल अथवा कॉम्प्युटर ठेवावा.

रिसेलचे घर घेतल्यानंतर देखील आपल्याला घरामध्ये वास्तुशांत करणे गरजेचे आहे.

घराच्या उत्तर, ईशान्य, वायव्य दिशेला शेगडी, ओव्हन अशी अग्नी तत्त्वाची कोणतीही गोष्ट येऊ देवु नये यामुळे धन हानी, आर्थिक हानी होते.

घोड्याची नाल घराच्या मुख्य दरवाजावर उलटी टांगावी ,पायात किंवा उंबऱ्यावर लावु नये.

देवघरामध्ये लाल किंवा कोणत्याही रंगाचा बल्ब लावु नये यामुळे देवतत्वाचे तेज आपल्याला मिळत नाही.

कोणताही व्यवहार करताना बिझनेस अथवा शिक्षण असो काळ्या रंगाचे पेन वापरू नये.

भाग्योदयासाठी व्हाईट बिग डाइलचे घड्याळ हातामध्ये वापरावे.

घरामध्ये नकारात्मक बोलणे, शिव्या-शाप देणे हे टाळावे. कारण आपल्या घरातील वास्तुपुरुष हा सदैव तथास्तु म्हणत असतो. वाईट बोलाल तेही तथास्तु होईल आणि चांगले बोलाल तेही तथास्तु होईल.

कंपनीमध्ये असलेली स्टेशनरी, व्हिजिटिंग कार्ड, लेटर हेड किंवा कंपनीच्या नावे असलेला बोर्ड हे काळ्या रंगाचे असू नयेत, ग्रीन किंवा ब्लू रंगाचे असावेत.

ऑफिसमधील वर्किंग टेबल, कॉम्प्युटर टेबल, मशिनरी टेबल हे आयताकृती, चौकोनी असावेत गोलाकार नसावेत.

ऑफिसमध्ये टी - कॉफी मशीन किंवा पॅन्ट्री हे ऑफिसच्या आग्नेय दिशेमध्ये ठेवावे.

ऑफिसची, कारखान्याची किंवा व्यवसायाची जागा नवीन विकत घेतली अथवा नवीन वास्तू बांधली तरीही वास्तुशांत करणे गरजेचे आहे.

ऑफिसमधले टेबल खुर्ची, फर्निचर काळ्या किंवा लाल रंगाचे असू नयेत.

ऑफिसमधले टेबलखुर्ची, फर्निचर, कपाटे ब्लु, स्काय ब्लू, ग्रे, ग्रीन, पिस्ता, ब्राऊन रंगाचे असावेत.

ऑफिसच्या मेन एन्टरन्सपासुन सहा फुटाच्या अंतरावरती सोफा, टेबल, खुर्ची असा कोणताही अडथळा येऊ देऊ नये.

नवीन घर विकत घेताना, बुकिंग करताना, गृह प्रवेश करताना पंचांगानुसार शुभ वेळ, शुभ दिवस, योग्य तिथीवार पाहुन घ्यावा.

नवीन घर विकत घेताना साउथ-वेस्ट एन्ट्री असणारे घर विकत घेऊ नये यामुळे धनहानी होते.

नवीन घर विकत घेताना आग्नेय दिशेचा एन्टरन्स असणारे घर विकत घेऊ नये, त्यामुळे आरोग्य हानी, धन हानी, चिड - चिड अशा गोष्टी घरामध्ये होतात.

दक्षिणेचा एन्टरन्स असणारे घर विकत घेऊ नये त्यामुळे पैसे टिकत नाहीत, फायनानशियल प्रोब्लेम येतात, कोर्ट कचेऱ्या पाठीमागे लागतात.

घराच्या दक्षिण-पश्चिमेला खड्डा किंवा उतार असू नये किंवा करू नये यामुळे वास्तूमध्ये सर्व प्रकारचे दोष येण्यास सुरुवात होते.

घराच्या उत्तर दिशेला जड कपाटे, धान्याची पोती भरपूर वजन असणारे सामान किंवा जडत्व व अग्नित्त्वा संबधित कोणत्याही गोष्टी ठेवू नयेत.

घराच्या मुख्य दरवाजा समोर देवघर ठेवु नये त्यामुळे देवाचे पावित्र्य भंग होते आणि पुजा केल्याची फल प्राप्ती मिळत नाही.

घराच्या मुख्य दरवाजासमोर किचन किंवा डायनिंग टेबल येऊ देवू नये.

घराच्या मुख्य दरवाजाच्या आत किंवा बाहेर खांब, भिंत, उंच झाड, तुळशी वृंदावन अशा कोणत्याही गोष्टी ठेवु नयेत.

घरामध्ये भितींवर असलेल्या घड्याळ्याचे टोल किंवा काटे बंद पडू देवू नये नेहमी अखंड चालू ठेवावे.

हातात घातलेल्या घड्याळाची डायल काळी किंवा लाल रंगाची नसावी.

भाग्यवृद्धीसाठी घराच्या उत्तर किंवा पूर्व दिशेच्या भिंतीवरती म्युझिकल टोल देणारे घड्याळ लावावे.

घरामध्ये बंद पडलेले एखादे घड्याळसुद्धा आपली प्रगती थांबविते म्हणून घरामध्ये एक छोटेसे सुद्धा बंद घड्याळ ठेवू नये.

घराच्या किचन ओटयाच्या खाली साफ-सफाई ठेवावी. अडगळ भंगार ठेवू नये त्यामुळे घरातील स्त्रीची चिड-चिड वाढते आणि मानसिकता बिघडते.

घराच्या किचन ओट्याच्या खाली, सिंकखाली खडे मिठाचा बाऊल ठेवावा.

स्वयंपाकघरात शेगडी उत्तर भिंतीला लागुन ठेवू

नये.

स्वयंपाकघर शक्यतो आग्नेय किंवा वायव्येला उत्तराभिमुख ठेवावे.

दक्षिण दिशेला तोंड करून स्वयंपाक करू नये स्वयंपाक करताना तोंड उत्तर किंवा पूर्व दिशेला करावे.

स्वयंपाक घरात फ्रिजवरती बांबू ट्री ठेवावा म्हणजे किचनमधील नकारात्मक ऊर्जा कमी होण्यास मदत होते.

किचनमध्ये लाल, मरून असे कोणतेही डार्क रंग वापरू नयेत, हिरवा, पिस्ता असे रंग वापरावेत.

किचनमध्ये गॅसच्या समोर बाथरूम किंवा देवघर येऊ देवू नये.

किचनमध्ये भिंतीना ऑफ व्हाईट, आयव्हरी, पिस्ता कलर द्यावा.

किचनमध्ये उतरते फॉल सिलिंग करू नये.

किचनवरती किंवा खाली ओल, लिकेज असू नये आणि किचनमध्ये गळके नळ नसावेत.

किचन ओट्याला काळा कडप्पा वापरू नये. ग्रीन ग्रॅनाईट वापरावे.

किचनमध्ये स्वयंपाक करताना आल्हाददायक वातावरण असावे. आनंदी, उत्साही वातावरण असेल अशी किचनची रचना असावी.

किचनमध्ये किचन ओट्यावरती कोणत्याही देवाचे फोटो अथवा तसबिरी मुर्त्या लावु नयेत.

किचन ओट्यावरती गॅस आणि पाण्याचे सिंक जवळ येऊ देऊ नये आणि गॅसशेजारी पाण्याचे हंडे ठेवू नयेत.

घराच्या मुख्य दरवाजासमोर अंगणात किंवा आजूबाजूला खड्डे पडलेले असू नयेत हे दुर्भाग्याचे लक्षण आहे.

किचन ओट्याच्या पाठीमागे आरसा किंवा काचेचे कपाट असू नये.

किचन ओटा, किचन ओट्यावरची टाईल्स, जमिनीवरील फरशी खडे मिठाच्या पाण्याने स्वच्छ करावी त्यामुळे नकारात्मक ऊर्जा नाहीशी होते.

वास्तु शांत झाल्यानंतर किचनमध्ये घराच्या आग्नेय दिशेला जमिनीमध्ये वास्तुपुरुषाची स्थापना करावी.

किचन मध्ये ट्रॉलीचा रंग लाल, मरून, काळा, डार्क चॉकलेटी असू नये आणि कपाटे, क्रॉकरी यांचेही रंग डार्क नसावेत.

किचनमध्ये डायनिंग टेबल पूर्व-पश्चिम असे ठेवावा. दक्षिण दिशेला जास्त खुर्च्या येऊ देवू नये.

किचन मध्ये पाण्याचे सिंक उत्तर - पूर्व दिशेमध्ये असावे.

किचन मध्ये किचन ओट्यावरती खिडकी किंवा फॅन असणे गरजेचे आहे त्यामुळे प्रदूषण होत नाही.

हॉलमध्ये टि.व्ही. हा उत्तर किंवा पूर्व भिंतीवर लावावा. त्यामुळे बसणाऱ्याचे तोंड उत्तर-पूर्व या शुभ दिशांना होते.

हॉलमध्ये घरमालकाच्या उंचीपेक्षा जास्त फर्निचर, पुतळे, फोटो फ्रेम, शोभेची झाडे किंवा कपाटे ठेवू नयेत.

हॉलचा रंग लाल, काळा, मरुन, गुलाबी असा असू नये, हॉलमध्ये रंगसंगती हलक्या रंगाची असावी.

डार्क रंग कोठेही देऊ नयेत.

हॉल मध्ये काळा, लाल, मरून रंगाचा सोफा, खुर्ची, टेबल ठेवु नयेत.

हॉल च्या भिंतींवर ढाली, तलवारी, बंदुका यांची प्रतीके किंवा फोटोसुद्धा लावू नयेत.

हॉलमध्ये हातात भाला घेतलेले पुतळे, उधळलेला घोडा, सिंह किंवा वाघाची चित्रे ठेवू नयेत.

घराच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील हॉलमध्ये भरपूर प्रकाश देणारे दिवे लावावेत, हॉलमध्ये अंधार करून ठेवू नये.

घराच्या व हॉलच्या उत्तर, पूर्व, ईशान्य या शुभ दिशांमध्ये कोठेही चप्पल, बूट अशा कोणत्याही नकारात्मक गोष्टी ठेवू नयेत.

हॉलमध्ये बांबू - ट्री ठेवल्याने तेथील नकारात्मक उर्जा कमी होते.

आपल्या घराचा मुख्य दरवाजा नेहमी खुला ठेवला पाहिजे. तसेच दरवाज्यासमोर किंवा त्याच्या आसपास पाना-फुलांच्या वेली लावू नयेत. ते लावल्याने घराचे मुख्यद्वार झाकले जाते. त्यामुळे सकारात्मक ऊर्जा घरात येत नाही.

मुख्य दरवाजावरती घोड्याची वापरलेली नाल लावावी आणि ती लावताना त्याची दोन टोके जमिनीकडे होतील अशी लावावी.

ज्या दिशेने शुद्ध वायूचा प्रवेश घरात होतो त्या दिशेत एक्झॉस्ट फॅन लावून घेतला पाहिजे.

वास्तूनुसार प्रवेशद्वार सदैव आत उघडणारा हवे. मुख्यद्वार जर दोन पल्ल्याचा असेल तर हे फारच उत्तम. प्रवेश द्वारापुढे पायरी, खांब नको.

हॉलमधील फार्निचर सोफा, खुर्ची, टेबल, टीपॉय रंग उडालेले, तुटलेले अथवा जीर्ण अवस्थेतील नसावे त्यामुळे घरातील शुभ ऊर्जा नाहीशी होते.

लक्ष्मीचा किंवा कोणत्याही देवीचा फोटो मुख्य दरवाजाकडे तोंड करून लावू नये.

सुख-समृद्धीसाठी व्हाईट क्रिस्टल झुंबर टांगावे. झुंबर अतिशय मोठे असू नये. हॉलला साजेसे योग्य प्रमाणात असावे.

घराच्या उत्तर दिशेला व्हाईट, ऑफ व्हाईट असे हलके रंग द्यावेत त्यामुळे घरामध्ये आर्थिक स्थैर्यता आणि लक्ष्मी आगमन सोपे होते.

शुक्रवारी घरामध्ये श्रीयंत्राची स्थापना करावी यामुळे सुख-समृद्धी व धनस्थैर्यता वाढते व कर्जा पासुन मुक्ती होण्यास मदत होते.

शनिवारी शुभ-लाभ होण्यासाठी निळ्या रंगाचे वस्त्र धारण करावे आणि ओम शनैश्वराय नमः हा जप १०८ वेळा करावा.

कोणत्याही शुभ कामासाठी काळ्या रंगाचा वापर करू नये उदाहरणार्थ पेन, पर्स, बॅग, बुट, चप्पल, कपडे.

घराच्या उंबऱ्यावर कोणतेही स्टिकर लावु नये त्यापेक्षा रांगोळीने किंवा हळदी-कुंकवाने स्वस्तिक, लक्ष्मीची पदचिन्हे काढावीत.

घराच्या मुख्य दरवाजावरती लाल रंगाचा दिवा लावू नये.

मुख्य दरवाजाच्या बाहेर पायपुसणे हिरव्या किंवा निळ्या रंगाचे असावे.

शू रॅक मुख्य दरवाजाला आडवे येईल असे ठेवु नये.

नवीन घर विकत घेताना किंवा बांधताना उत्तर

आणि पूर्व दिशेला भरपूर खिडक्या असणे खूप महत्त्वाचे आहे त्यामुळे कायमस्वरूपी घरामध्ये सुख-समृद्धी राहते.

घरामध्ये धनवृद्धीसाठी घराच्या उत्तरेला किंवा ईशान्येला फिश पॉट किंवा तांब्याच्या भांड्यामध्ये पाणी भरून ठेवावे.

फिश पॉट घराच्या आग्नेय दक्षिण, नैऋत्य किंवा पश्चिम दिशेमध्ये ठेवु नये.

घराच्या सुखसमृद्धी आणि आरोग्यदायी जीवनासाठी फिश पॉट हा लहान आकाराचा ठेवावा खूप मोठा किंवा भव्य उंचीचा ठेवू नये.

घराच्या सुख-समृद्धी साठी फिश पॉट मध्ये आठ सोनेरी फिश आणि एक काळी फिश ठेवावी.

फिश पॉट हा भिंतीमध्ये कप्पा करून किंवा खोचून ठेवू नये जमिनीला समांतर असा ठेवावा.

घराच्या सुख-समृद्धी साठी आणि फायनानशियल पोझिशन स्ट्राँग होण्यासाठी वॉटर फॉल घराच्या उत्तर आणि ईशान्य दिशेमध्ये लावावा.

घराच्या उत्तर व ईशान्य दिशेमध्ये फुलांच्या कुंड्या, रोपटी किंवा कोणतेही आर्टिफ़िशियल झाड लावु नये.

घराच्या ब्रम्हस्थळामध्ये म्हणजेच घराच्या सेन्टर मध्ये भरपूर मोकळी जागा ठेवावी. फ्रिज, कपाटे, किचन, टॉयलेट, कॉलम, बिम हे येऊ देवू नये.

ब्रम्हस्थळामध्ये ( घराचा सेन्टर ) असणाऱ्या कोणत्याही वास्तुदोषामुळे घरामध्ये आजारपण, नैराश्य, वाईट विचार, अपयश या गोष्टी वाढीस लागतात त्यामुळे ब्रम्हस्थळामध्ये कोणताही वास्तुदोष येऊ देवू नये.

किचनमध्ये ब्रम्हस्थळ ( घराचा सेन्टर ) आल्यास त्यावरती फ्रिज, ओटा, डायनिंग टेबल, देवघर येऊ देऊ नये त्यामुळे घरात शुभ ऊर्जा प्रवाहित होण्यास अडथळा निर्माण होतो.

बंगला, इंडस्ट्री, दुकान, मेडिकल, हॉस्पिटल किंवा कमर्शिअल कॉम्प्लेक्स बांधताना प्लॉटचे, वास्तुचे ब्रम्हस्थळ नेहमी मोकळे सोडावे.

घर बांधताना प्लॉटच्या मध्यभागी म्हणजेच ब्रम्हस्थळामध्ये विहीर, खड्डा, बोअरिंग, पाण्याची टाकी येऊ देऊ नये.

नवीन घर विकत घेताना घराचा (सेंटर पॉइंट) ब्रम्हस्थळ हे घराच्या बाहेर जात असेल किंवा टॉयलेटमध्ये येत असेल तर ते घर विकत घेऊ नये.

जवळजवळचे दोन फ्लॅट एकत्र जोडून एक मोठा फ्लॅट तयार करण्यासाठी वास्तुतज्ञाच्या सल्ल्याने फ्लॅटचे एकत्रीकरण करावे त्यामुळे ब्रम्हस्थळाचा दोष निर्माण होऊ शकतो.

शेतीच्या ब्रम्हस्थळात विहीर, खड्डा, शेततळे असल्यास मालकाला नुकसान संभवते.

घराच्या छपराचा उतार उत्तर किंवा पूर्वेला असावा. दक्षिण-पश्चिमेला उतार असल्यास हानिकारक असते.

घराच्या उत्तर, पूर्व दिशेमध्ये असलेले टेरेस शुभ असते, दक्षिण किंवा पश्चिमेला असलेले टेरेस हानिकारक असते.

टेरेसवर सोलर पॅनल घराच्या आग्नेय किंवा दक्षिण दिशेला लावावे. ईशान्य-उत्तरेमध्ये सोलर पॅनल लावू नये.

घरामध्ये जिना हा गोलाकार नसावा आयताकृती, चौकोनी आकाराचा आणि पायरी चढताना उजवीकडे वळणारा असावा.

वास्तुशास्त्रानुसार घर असणे किंवा करून घेणे म्हणजेच आपल्या कुटुंबीयांना भक्कम सुरक्षा कवच प्रदान करण्यासारखे आहे त्यामुळे योग्य वास्तु तज्ञाकडून व्हिझिट करून घेणे महत्वाचे आहे.

कोणतेही शुभ काम करताना काळ्या रंगाचा वापर कमी करावा. उदाहरणार्थ - कपडे, बॅग, पेन, चप्पल.

घरामध्ये तुटलेली फरशी, तुटलेले फर्निचर अशा वस्तु घरामध्ये असतील तर त्यामध्ये त्वरित बदल करून घ्यावा. त्यामुळे घरामध्ये नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

बेडरूममध्ये बेड हा शक्यतो लाकडी सागवानी असावा. लोखंडी असेल तर त्याला लाकडी अथवा रबरी गट्टु बसवून घ्यावेत त्यामुळे हेल्थ प्रॉब्लेम कमी होतात.

बेडच्या खाली नऊ मोर पिसे ठेवावीत. त्यामुळे शांत झोप लागते आणि आजूबाजूच्या वातावरणातील वाईट प्रभाव कमी होऊन आरोग्य सुधारते.

मास्टर बेडरूमच्या गादीखाली बँकांचे पासबुक, कोर्टाच्या नोटिसा, फाईल आणि कोणतेही नकारात्मक कागदपत्रे ठेवू नयेत.

भोजन करताना घराच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला तोंड करून भोजन करावे. दक्षिण किंवा पश्चिमेला तोंड करू नये.

डायनिंग टेबल किचनच्या उत्तर किंवा पूर्व दिशेमध्ये असावे. पश्चिम किंवा दक्षिण दिशेमध्ये डायनिंग टेबल ठेवू नये.

नवीन घर किंवा कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधताना घराच्या दक्षिण व पश्चिमेला मोकळी जागा सोडून बांधकाम करू नये. उत्तर-पुर्व या शुभ दिशांना मोकळी जागा सोडुन बांधकाम करावे.

वास्तु मध्ये पूजा, होम-हवन, सत्यनारायण करताना आपले तोंड उत्तर-पूर्व या शुभ दिशांना करावे त्यामुळे चांगली फलप्राप्ती मिळते.

घराच्या आग्नेय दिशेला कोठेही पाण्याचे पिंप, हांडे अशा कोणत्याही गोष्टी ठेवु नयेत.

आग्नेय दिशेमध्ये वॉटर स्टोरेज, अंडर ग्राउंड पाण्याची टाकी, बोअरिंग, विहिर येऊ देवु नये.

घरामध्ये उत्तम सुख समृद्धी, लक्ष्मी आगमन आणि आर्थिक भरभराट होण्यासाठी मुख्य दरवाजा समोर दोन हत्ती ठेवावेत.

घरामध्ये सुखसमृद्धी साठी घराच्या ईशान्य किंवा उत्तर दिशेला कासव ठेवावे.

देवघरामध्ये उदबत्ती, निरंजन, कापूर आग्नेय दिशेमध्ये लावावा.

दुकान, फॅक्टरी, कार्यालय आदी ठिकाणी वर्षातून एकदा तरी पूजा अवश्य करावी.

स्वतःच्या मालकीचे कोणतेही वाहन (कार, ट्रक, टु-व्हीलर) मोठ्या प्रवासावरून आल्यावर गाडीच्या चाकांवरती गोमूत्र शिंपडावे आणि महिन्यातून एकदा खडे मिठाच्या पाण्याने गाडी स्वच्छ करावी.

नवीन घर बांधताना टेरेसवर पाण्याची टाकी घराच्या नैऋत्य दिशेला उंचावर ठेवावी. आग्नेय -

ईशान्येला ठेवू नये.

टॉयलेटची टाकी ईशान्य, मध्य - पुर्व, आग्नेय, ब्रह्मस्थळ आणि नैऋत्य दिशेमध्ये येऊ देवु नये.

घराच्या टेरेसवर तुटलेल्या कुंड्या, जुने फ़र्निचर, बंद पडलेल्या सायकली अशा कोणत्याही नकारात्मक गोष्टी ठेवू नयेत.

घराच्या आसपास बाभळीचे किंवा कोणतेही काटेरी वृक्ष नसावा.

घराच्या आजूबाजूला चिक येणारे किंवा ज्या झाडाला दूध येते असे कोणताही झाड लावू नये.

कोणत्याही काटेरी वृक्षाची सावली घरावर पडू देऊ नये.

नवीन घर विकत घेताना शक्यतो रोडजवळचे म्हणजेच रहदारीचे, हायवे, भरपुर ट्रॅफिक असणारे रस्ते, मोठे रेल्वे स्टेशन यांच्या जवळचे घर विकत घेणे टाळावे. त्यामुळे गोंगाट निर्माण होऊन मन:शांती बिघडते.

धन स्थैर्यतेसाठी घरामध्ये होमहवन, सत्यनारायण पूजा, उदक पूजा, दान-धर्म, जप अशा गोष्टी नेहमी करत राहाव्यात.

कंपनी, फार्म हाउस, शेतीसाठी जमिनी विकत घेताना उत्तर किंवा पूर्व दिशेला डोंगर किंवा उंच टेकडी असेल तर अशी जमीन विकत घेवू नये, डोंगर दक्षिण पश्चिमेला असेल तर ती जमीन शुभ असते.

आर्थिक प्रगती चांगली होण्यासाठी घराच्या उत्तर दिशेला रेड, मरून असे कोणतेही डार्क रंग देऊ नयेत. व्हाईट, ऑफ व्हाईट, क्रीम असे रंग द्यावेत.

उत्तरेला जड कपाट, शोकेस, बेड, किचन अशा गोष्टी आल्यास आर्थिक प्रगती होत नाही त्यासाठी उत्तर दिशा हलकी, मोकळी आणि कोणतेही वजन नसणारी असावी.

ईशान्य दिशेमध्ये बाथरूम किंवा स्टोरेजची खोली नसावी त्यामुळे आरोग्यहानी, धनहानी आणि सर्व प्रकारे नुकसान होते.

ईशान्येच्या दोषनिवारणासाठी सुंदर आकर्षक कारंजे ठेवावे किंवा पांढऱ्या संगमरवरी बाऊल मध्ये पाणी भरून ठेवावे. यामुळे ईशान्य दिशेमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

मुख्य दरवाजाच्या डाव्या किंवा उजव्या बाजुला बांबू - ट्री किंवा तुळस कुंडीमध्ये लावल्याने घरामध्ये सुख-समृद्धी व फायनान्शियल प्रगती होते.

ऑफिस किंवा दुकानामध्ये कायमस्वरूपी म्युझिक सिस्टीम बसवून घ्यावे आणि रोज कामाच्या वेळे मध्ये एफ.एम. चालु असावे. यामुळे ऑफिसमधील कर्मचारी वर्गाला काम करण्यास उत्साह येतो व कामावरती लक्ष केंद्रित होते आणि त्यामुळे कंपनीची भरभराट होते.

स्वयंपाक करताना किचनमध्ये म्युझिक सिस्टीम, एफ.एम सतत चालू ठेवावे यामुळे स्वयंपाक करताना चैतन्यदायी वातावरण निर्माण होऊन आपले अन्न पौष्टिक व सात्त्विक होते त्यामुळे आरोग्य उत्तम राहते.

सकाळच्या वेळेमध्ये गायत्री मंत्र, श्रीसुक्त, पुरुष सुक्त, आरत्या यांची सी.डी. घरामध्ये लावल्याने सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

घराची रचना करताना घरात आलेल्या व्यक्तीला देवघर, किचन, बेडरूम, तिजोरी न दिसेल अशा पद्धतीने घराची रचना करावी.

प्लॉटच्या उत्तर किंवा पूर्व दिशेला डोंगर, इमारत किंवा कोणतेही उंच बांधकाम असेल तर असा प्लॉट विकत घेवू नये.

घराचे मुख्य सेफ्टी डोअर लाकडाचे असावे असा वास्तुनियम असला तरी आपण घराला लोखंडी सेफ्टी डोअरच बसवावे, त्यामुळे परक्या व्यक्तीने दरवाजा उघडला तरी आवाज होऊन आपल्याला कळू शकते.

देवघरामध्ये दोन शिवलिंग, दोन शंख किंवा एकाच देवांच्या दोन मूर्त्या ठेवून त्यांचे पूजन करू नये.

कुलदैवतांचे किंवा गुरूंचे नामस्मरण, जप किंवा पठण नित्यनियमाने १०८ वेळा केल्यास कार्यसिद्धी होते आणि आत्मबल, आत्मसामर्थ्य वाढते.

घराच्या, ऑफिसच्या मुख्य दरवाजासमोर लिफ्ट, उतरता जिना किंवा डक्ट येत असेल तर असे घर किंवा ऑफिस विकत घेणे टाळणे यामुळे शुभ ऊर्जेची हानी होते.

सर्व कामांना सिद्धीस जाण्यासाठी, इच्छापुर्ती होण्यासाठी आणि कोणत्याही संकटातुन मुक्ती होण्यासाठी गणपती अथर्वशीर्ष वाचावे आणि उपासना, नामस्मरण करावे.

घरामध्ये रोज देवाची पूजा, श्लोक पठण, दिवा-उदबत्ती, निरंजन, धुप-दीप लावणे अशा आध्यात्मिक गोष्टींचा नित्यनियमाने वापर केल्यामुळे घराला चांगले सुरक्षा कवच मिळते आणि आघातांची तीव्रता कमी होते.

घराच्या पश्चिम दिशेला टेरेस, खड्डा, खूप मोठा उतार किंवा खोल दरी असेल तर कलह, व्याधी, त्रास, मनस्ताप किंवा दीर्घ आजारपण येऊ शकते त्यामुळे पश्चिमेला कोणताही खड्डा ठेवू नये.

जमिनीमध्ये पाण्याची टाकी पुर्व, आग्नेय, दक्षिण, नैऋत्य आणि पश्चिम या दिशामध्ये येऊ देऊ नये.

## चारोळ्या

पंचमहाभूते नियतीचे वरदान
प्राणिमात्रांनो नका करू अवमान
मानवांनो नियमांचे सृष्टी अल्लंघन करु नका
पर्यावरणाच्या ऱ्हासाचा ओढवू नका धोका!

जगण्याला आवश्यक हवा अन् पाणी
पाण्याचा अपव्यय करु नका कोणी
थेंबे थेंबे तळे साचे, म्हण नाही खोटी
योग्यवेळी दुरुस्त करा गळकी टाकी अन् तोटी।

**- सुधा नांदेडकर**

# घराची शोभा वाढविणारे फर्निचरही ठेवा नीटनेटके

- राजेश पाटील

घरसजावटीमध्ये फर्निचर, पुस्तकांची ठिकाणे आणि घरांचे पडदे याला खूप महत्त्व असते. हे नीटनेटके ठेवले तर घराचे वातावरणच बदलून जाते. घर एकदम सुंदर आणि नीटनेटके वाटून घराला चांगला लूक येतो. त्यासाठी खालील काही गोष्टींचे पालन केल्यास सुंदर घर ही कल्पना सत्यात उतरते.



खोलीतील टीव्ही व म्युझिकसाठीचे कपाट व इतरही बोजड करू नये. कमी उंचीचं व कमी खोली असणाऱ्या फर्निचरमुळे आहे ती जागा मोठी वाटते. टीव्हीसाठी ट्रॉली ठेवली तरीही हरकत नाही. कारण युनिट केलं की ते टीव्हीसाठी उगाचच मोठं करावं लागतं. सोफासेट अथवा दिवाण हे रात्री पलंग म्हणून उपयोगात आणता येतील, असेच करावेत. त्यांची उंची कमी ठेवावी व त्यावरील कापडाचं डिझाईन प्लेन रंगाचं असावं. त्याचप्रमाणे सोफा अमेरिकन पध्दतीचे न घेता लाकडाच्या हातांचे लहान व खाली जमिनीला न टेकणारे घ्यावेत म्हणजे खालून फरशी स्वच्छ ठेवता येते.

शोभेच्या वस्तू व कुटुंबीयांचे कलागुण ज्यातून दिसून येतात, अशा वस्तू या खोलीत जरूर ठेवाव्यात, पण सर्व वस्तू एकाच वेळी दाखवण्याचा हट्ट नसावा. आपल्याचसाठी एखाद्या दिवाणाच्या खालच्या ट्रॉलीमध्ये या वस्तूंसाठी संग्रह करून ठेवावा. वस्तू आलटून-पालटून लावण्यामुळे घराच्या सजावटीत कायम नावीन्य राहावे. स्वतंत्र ग्रंथघर असलं तरी काही निवडक पुस्तकं दिवाणखान्यात जरुर मांडावीत.

पडद्यांची निवड करताना फार डिझाईन्सचं कापड न घेता प्लेन, आवडत्या रंगांचं कापड घ्यावं. सध्या कॉटनचे तयार पडदे बाजारात आकर्षक रंगात मिळतात व ते स्वस्तही असतात आणि सुंदर दिसतात. खोलीतील खिडक्यांची ही उंची कमी-अधिक असली तरी सर्व पडदे जमिनीपर्यंत जाणारे पूर्ण उंचीचेच घ्यावेत, म्हणजे खिडक्यांमधील उंचीतील फरक झाकला जातो व खोलीही उंच वाटते. आजकाल पडद्यांऐवजी रोलर ब्लाईंड, वेनेशियन ब्लाईंड असे अनेक प्रकार मिळतात जे खिडकीच्या फ्रेमच्या आत बसतात. दिवाण किंवा सोफ्याच्या मागे लागून खिडकी येत असेल तर यांचा चांगला उपयोग होतो.

# शेजाऱ्यांशी मैत्रीचे संबंध

**- विद्या राणे सराफ**

काही जणांना छोटी छोटी कारणे काढून शेजाऱ्यांशी भांडायला आवडते किंवा शेजाऱ्यांच्या घरात भांडणे होत असतील, कोणाचं कोणाशी पटत नसेल तर त्याची चर्चा संपूर्ण शेजाऱ्यांच्या घरात केली जाते. ही अत्यंत वाईट गोष्ट असून उलट आपण चांगल्या भावनेने शेजाऱ्यांना मदत केली पाहिजे, तर उद्या तुमच्यावर अशी काही पाळी आली तर तेही तुम्हांला मदत करतील. ज्यांना उत्तम शेजारी लाभतो त्यांना नातेवाईकांची गरज भासत नाही. प्रत्येक चांगल्यावाईट प्रसंगात सर्वप्रथम शेजारीच धावून येतो. आपण एखाद्या संकटात सापडलात तर सर्वात आधी शेजारीच आपल्या पाठीशी उभे राहतात. आपले शेजारी जर वेळी-अवेळी आपल्या मदतीला धावून येत असतील, तर त्यांची मदत अशीच मिळत राहावी म्हणून आपल्याला त्यांच्याशी मधुर संबंध ठेवायला हवेत. आपण आपल्या शेजाऱ्यांशी कसे संबंध ठेवता हे सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते. तसेच काही इतर विघ्नसंतोषी माणसे येऊन आपले संबंध बिघडवत असतात. अशा माणसांपासून सावध राहिले पाहिजे. तसेच कोण आपले हितचिंतक आहे व कोण नाही हेही पाहायला हवे.

खलनायिका शेजारीण - आपल्या शेजारणीच्या आपल्याबद्दल काय भावना आहेत त्या जाणून घेणे गरजेचे आहे, तेव्हाच आपण तिच्यावर विश्वास ठेवू शकाल. काही शेजारणींना भांडणे लावून द्यायची सवय असते. त्यांच्यापासून नेहमी सावध राहावे. भांडणे लावण्यासाठी त्या दोन कुटुंबांमध्ये पुरेपूर मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अशा शेजारणींना घरी येऊ नका, असे सांगता येत नाही. पण यांच्याबद्दल दक्षता जरूर बाळगता येते. त्यांच्याशी बोलताना जर त्या एखादी गोष्ट सांगत असतील तर त्या गोष्टीला प्रतिक्रिया देऊ नये. नेहमी सकारात्मक व तटस्थ राहावे. शेजारीण कोणाबद्दल वाईट सांगत असेल तर तिच्या बोलण्याला प्रतिसाद देऊ नये.

सुखदुःखात साथ द्या – संधी मिळेल, तेव्हा शेजाऱ्यांवर नेहमी प्रेम करा. त्यांच्या घरातील एखाद्या आनंदाच्या प्रसंगी आनंद व्यक्त करा व दुःखाच्या क्षणी दुःख व्यक्त करा. दुःखाच्या क्षणी सांत्वन व सहानुभूती जरूर व्यक्त करा.

शेजाऱ्यांच्या जीवनात ढवळाढवळ नको – शेजाऱ्यांच्या खाजगी जीवनात विनाकारण डोकावू नये. तसेच कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. त्यामुळे आपल्याबरोबरच्या संबंधांत कटुता निर्माण होईल. प्रत्येक कुटुंबाची जीवनशैली, राहणीमान, धर्म, परंपरा वेगळी असते. त्यावर उगाच टीका करू नये. आपल्या हस्तक्षेपामुळे त्या कुटुंबात कलह, वाद, भांडणे होऊ शकतात. त्यापेक्षा ज्यांच्याशी आपले स्वभाव व विचार पटतात, जुळतात त्यांच्याशी संबंध जोडावेत.

अशा प्रकारे शेजाऱ्यांशी मैत्रीचे संबंध ठेवा, म्हणजे तुम्हांला तुमच्या अडचणीत त्यांची मदत होईल.

# डास

हल्ली ! मच्छराचे गाणे गुणगुणणे झाले कमी
गुपचूप करुन वार, करू घात,
ही झाली नसेल ना त्यांची प्रवृत्ती.
पूर्वी ...
कानामध्ये गुणगुणल्यावर हातवारे करुन,
मारण्याची मिळत असे संधी.
पूर्वी ...
दक्षिण मुंबईत खासकरून
डासांचा नसे प्रादुर्भाव
आता...
तिथे की केले लक्ष्य
उंच टॉवर बांधण्यात येणाऱ्या खदानी
साचणारे पाणी, डासांची होणारी पैदास,
अस्वच्छता हेच कारण,
डेंग्यू, मलेरिया पावसातच होणारे हे आजार.
आता...
इतर ही मासांत दिसू लागले.
डेंग्यूचा डास
फारच खतरनाक!!!
सापडत नाही त्यावर इलाज,
डॉक्टरही हैराण!
डेंग्यूच्या आजाराने सर्वच बेजार
डासांसमोर सर्वच समान,
उच्चनिचतेचा त्यांना नसते भान
पूर्वी ...



डासांची मजल पहिल्या दुसऱ्या मजल्यापुरतीच
असे
चौथ्या मजल्यावर किंचित दिसे.
आता...
उंच भरारी घेण्याची ताकद त्यांची ही वाढली
पंचविसाव्या मजल्यावर
देखील त्यांचे अस्तित्व दिसू लागले.
कारण अस्वच्छता!
राखा स्वच्छता, पळवा डासांना..!

**- विनोद बांदोडकर**



# ।। मन शांत असतांना।।



मन शांत होते
तेव्हा
हृदयातील हुंकार
ऐकू येतो।।
धीर गंभीर वृक्ष छायेत
कृष्ण ध्वनी ऐकू येतो.
वृक्षवेलींचे प्रतिबिंब
पाण्यात पाहण्यात दंग होतो।।
पहुडल्या पायांना
पाण्यातील माशांचा
मृदु स्पर्श जाणवत असतो.
मन शांत चित्त तरीही विचार दीन।।
मन शांत असते
तेव्हा,
निसर्गातील स्पंदनांशी
एकरूप होतो
तरल मनावरचा ताण
विरळ होतो.
मन शांत असते
तेव्हा
श्वासही गंध पसरवितो
वृक्षांची मुळे ध्यानमग्न,
पाने चंचल वाऱ्याशी झुंजताना
धोका असतो तुटण्याचा।।



**- विनोद अच्युत बांदोडकर**

# सोसायटीची बिल्डिंग

मी बिल्डिंग आहे मोठी मस्त मस्त
माझा कलरही आहे मस्त मस्त
माझा पाया आहे जबरदस्त-दस्त
मी बिल्डिंग आहे मोठी मस्त मस्त.

माझे फ्लॅटस्ही आहेत स्वस्त स्वस्त
साऱ्या सुविधा आहेत मस्त मस्त
सारे सदस्य आहेत चुस्त चुस्त
मी बिल्डिंग आहे मोठी बेस्ट-बेस्ट.

साऱ्यांना ठाऊक आहे एक गोष्ट-गोष्ट
नाही गेले पैसे कुणाचे बेस्ट-बेस्ट
मी बिल्डिंग आहे मोठी बेस्ट-बेस्ट
सारे घेती सुट्टीमध्ये रेस्ट-रेस्ट.

कामगारांनी पुढे करता हस्त-हस्त
मिळते, दिवाळीला त्यांना पोस्त-पोस्त
सारे मेंबर्स आहेत दोस्त-दोस्त
मी बिल्डिंग आहे मोठी मस्त मस्त.

**- सुरेश देहेकर**



# सोनेरी खिडक्यांचे घर



अंगणामध्ये मी सहजची जाता
समोर पाहिले तर
दूरवरी मज दिसले एक
सोनेरी खिडक्यांचे घर ।।१।।

माझे घर ते साधे वाटे
त्या घरास पाहिल्यावर
पाहता क्षणी ते मनात भरले
जणू राजमहाल सुंदर ।।२।।

एकवार ते पाहून यावे
जवळ जाऊनी तर
मनामध्ये भरलेले माझ्या
सोनेरी खिडक्यांचे घर ।।३।।

एकदा अचानक गेले मी
ते पाहण्या एका सखीबरोबर
परी मला न दिसले
तेथे माझ्या स्वप्नातील ते घर ।।४।।

तेथे होती धूळ जळमटे
वाळलेली पाने ती वाटेवर
हिरमुसली मी झाले ते घर
सत्यात पाहिल्यावर ।।५।।

इतक्यात जाहली सांज
सोनेरी पश्चिम क्षितिजावर
दूरवरी मज दिसले पुन्हा
सोनेरी खिडक्यांचे घर ।।६।।

दाखविले मी मैत्रिणीस ते
हरखून गेले पाहूनी पुन्हा ते घर
पण मैत्रीण मज ती म्हणते
नीट पहा ते तुझेच आहे घर ।।७।।

**- विनिता वासुदेव आगाशे**



# बाळाची निद्रा




चिंव चिंव करू नकोस चिमणे, बाळ माझे झोपले
काय हवे तुज सांग मला ग, देईन मी सगळे.

कपाट सारे उघडून ठेवले, समोर ओटयावरी
मेवा समजून लुटून न्यावे, डाळ दाणे पोटभरी.

घरटी बांध तू माळ्यावरती, काडी गवत आणूनी
कचरा म्हणून काढणार नाही, ही घे माझी वाणी.

नाचून बागडून खेळ येथे, निर्भय आनंदाने
परि शांत न बसलीस तूं तर, जागेल बाळ तान्हे.

चिव चिव करणे गीत आह कां ? अंगाई तुमची
गाऊनी आपल्या पिल्लाकरिता रमवी मने त्यांची.

असे असेल तर चालू ठेव तू चिव चिव ते गाणे
शहाणा माझा बाळ तो, ठावे त्याला सोसणे.

**डॉ. भगवान नागपूरकर**


# पर्यावरण सांभाळ

नकोस तोडू वृक्षवल्लरी
पक्ष्यांनी कोठे जावे ?
नकोस फोडू पर्वत, डोंगर
पशूंनी कुठे राहावे ?
ह्या सर्वांचे एकच जग हे
कां उद्ध्वस्त करावे ?
जगण्याचा अधिकार तयांना
जसे वाटते तुला जगावे
वृक्षवल्लरी पर्वत-डोंगर
वसुंधरेची लेणी सुंदर
नको करू संहार तयांचा
हाच खरा आधार जिवांचा.

**- इन्दुमती ठक्कर**



# पडदा



नाटकाचा शेवटचा पडदा कधी पडेल माहीत नसते
म्हणूनच नाटकात रंगून जायला होते
समरस होता येते.
संशयकल्लोळ मनापमान रुसवेफुगवे ताणतणाव
हेवेदावे नातीगोती प्रेमद्वेष सखेसोबती
सगळच कसे खर खर वाटते
खरतर सगळेच मायाजाल असते
पडदा पडताना हे थोडेफार उमगते
क्षणभंगुर जीवन उमगते निमिषात
पण मोह तयाचा जागा होई क्षणात
जन्मदिवसाची जयंती क्षणात होते
पण वाढदिवसाच्या दिवशी हे कुठे आठवते!

**- रश्मी लुकतुके**

# हेही तू जाणून घे

तुझा सहवास,
सहवास नव्हे, माझा श्वास!
तिची आठवण,
आठवण नव्हे, माझा उच्छवास!
नितांत गरज, जगण्यासाठी,
श्वच्छसोच्छवासाची !!
तरीही,
एकच सांगणं तुला,
की,
श्वास हा नेहमीच ग्राह्य,
अन् उच्छवास,
उच्छ्वास हा नेहमीच त्याज्य,
जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत!
हेही तू जाणून घे !!
घेशील ना लाडके !

**- सुरेश पंडित**



# एक घरटे रिकामे

पूर्वी आम्ही सुट्टीच्या दिवसांमध्ये रानांत गुरे चरायला घेऊन जायचो. तेव्हा जंगलातून भटकताना झाडांवर पक्ष्यायांची वेगवेगळी घरटी पाहायला मिळायची. ती घरटी जवळून पाहताना एक विलक्षण गंमत वाटायची. ही इवलीशी पाखर एवढी सुबक आणि नक्षीदार घरटी कशी काय बनवत असतील आणि ती सुध्दा फक्त काट्याकुट्यांपासून या गोष्टीच खरेच नवल वाटायच. यापैकी बरीचशी घरटी रिकामी पाहायला मिळायची. काहींमध्ये झाडांची पानेही पडलेली असायची. असे म्हणतात की जेव्हा पक्षी आपले घरटे सोडून दुसरीकडे निघून जातो, तेव्हा तो आपल्या घरट्यात झाडाचे एक पान तोडून टाकतो. आपले घरटे कधी रिकामे राहू नये हीच बहुतेक त्यामागची भावना असावी. पण अशी कितीतरी घरटी रानात फांद्यांवर, झुडुपात आढळायची. काही वादळवारे झेलीत आपले अस्तित्व टिकवून असायची, तर काही उन्मळून गळून पडलेली असायची. त्यांच्याकडे बघितल्यावर मन गलबलून जायचं आणि माझ्या कवि मनाला विचारावसं वाटायचं,


एक घरटे रिकामे
वाट पाहते कुणाची
का अजुनी ओढत्याला
दुरावल्या पाखरांची.
ठाऊक नाही त्याला
येणारं कुणीच नाही
वाटेकडे तरीही
नजर फिरे पापण्यांची.
एक घरटे रिकामे
वाट पाहते कुणाची
सळसळली पाने जरी
तरी वळून पाही.
पुन्हा स्वतःस बिलगून
एकटेच राही
टपटपले जरी थेंब
पानांमधून पावसाचे.
तरी त्यास वाटे
ती चाहूल पावलांची
एक घरटे रिकामे
वाट पाहते कुणाची.
मग दिसली दुरून त्याला
एक ओळख परतताना
त्यात शोधीत होते
ओळखीच्या पाखरांना.
नजरेत जणू येता
झाली गुडूप कोठे
ते आपुल्याच जागी
भवताली दाटी सावल्यांची
एक घरटे रिकामे
वाट पाहते कुणाची!

**- वैभव वासुदेव जाधव**

# पाककृती

- माया नेटकरी

## कारल्याची भरुन भाजी



**साहित्य :** छोटी कोवळी कारली पाव किलो, तीळकूट चार चमचे, खोब्रयाची पूड चार चमचे, लाल तिखट दोन चमचे, धने-जीऱ्याची पूड दोन चमचे, खसखस भाजून दोन चमचे, दोन छोटे कांदे चिरून तेलावर परतून, कच्चा मसाला दोन चमचे (एक चमचा धने, तीन-चार लवंगा, एक तुकडा जायपत्री, तीन वेलदोडे, अर्धा चमचा जिरं मिक्सरवर बारीक करून घेऊन ती पूड), चिंच-गुळाचा कोळ अर्धी वाटी

**कृती :**

१) आदल्या रात्री किंवा करण्याच्या दोन दिवस आधी कारली सोलून त्याचे बरोबर दोन भाग करावेत . दोन्ही टोकाकडील भाग काढून टाकावेत .

२) आतल्या बिया काढून टाकाव्यात . नंतर कारल्यांना मीठ व हळद लावून काही वेळ तसंच ठेवावं .

३) साधारण दोन तासांनी कारली व्यवस्थित पिळून घ्यावीत . ज्यांना त्याचा कडवटपणा आवडत असेल त्यांनी कमी पिळावीत .

४) पिळलेली कारली पसरून घेऊन त्याच्या खोलगट भागात तीळकूट , खोब्रयाची पूड , खसखशीची पूड , धने-जिरे पूड , कच्चा मसाला , कांदा परतलेला व कोथिंबीर यांचं मिश्रण त्यात भरावं .

५) चवीपुरतं मीठ व हळदही घालावी . मोठया पसरट भांड्यात तेलाची फोडणी करून त्यात कारली घालावीत .

६) मंद आचेवर भाजी शिजू द्यावी व शिजतानाच त्यात चिंचगुळाचा कोळ घालावा .

७) कारल्याचे जर दोन भाग करायचे नसतील तर कारल्याच्या पाठीवर एक छेद देऊन आतल्या बिया काढून टाकून साधारणपणे कारली पिळून घ्यावी .


८) कारल्याम्ध्ये वरील मसाला भरून मसाला बाहेर येऊ नये यासाठी कारलं द्वोयानं बांधून ठेवावं . रश्श्यासाठी कढईत फोडणी करून त्यात तीन-चार वाट्या पाणी घालावं .

९) पाणी उकळत असतानाच त्यात तिखट , मीठ , कोथिंबीर , चिंच-गुळाचा कोळ घालावा .

१०)रश्श्याला दाटपणा येण्यासाठी थोडंसं म्हणजे दोन छोटे चमचे डाळीचं पीठ व तीळकूट त्यात घालावं .

११)रश्श्यात बांधलेली कारली मऊ होईपर्यंत शिजू द्यावी . सगळी कारली शिजल्यावर त्यावर बांधलेला दोरा कापून टाकावा .

## हिरव्या टमाट्याची चटणी



**साहित्य :** हिरवे टमाटे पाव किलो, डाळव दोन टेबल स्पून, तीळ दोन टेबल स्पून, जिरे एक टेबल स्पून, हिरव्या मिस्पून, मीठ, गूळ, कोथिंबीर, कढीपत्ता चवीप्रमाणे, फोडणीच साहित्य

**कृती:**

टमाटे धुवून फोडी करुन घ्या. एका कढईत जिरे,तीळ व डाळवं भाजून काढून घ्या. त्याच कढीत अर्धा चमचा तेल घालून फोडी, हिरव्या मिरच्या टाका. झाकण ठेवून फोडी मऊ होईपर्यंत शिजवून घ्या त्यात चिरून कोथिंबीर घाला. मिश्रण गार होऊ द्या. सगळे जिन्नस एकत्र करुन चटणी वाटा. वरुन खमंग हिंगाची फोडणी घाला.

---

## ग्रीन राईस/ फ्राईड जीरा राईस



**साहित्य :** बासमती अख्खा सव्वा कप कप, जीरे पाव कप, पालक २ कप, हिरव्या मिरच्या आवडीनुसार पातळ चिरून, हिरवी ढब्बु मिरची, कांद्याची पात (असेल तर) पातळ लांबडा कांदा चिरुन, हिरवे फ्रोझन वाटाणे, तमाल पत्र ४/५, मिरे अख्खे ८/१० दाणे, दालचिनी २/३ तुकडे, लवंगा २/३ ऑप्शनल, वेलची २/३ ऑप्शनल, तेल/तुप

**कृती:**

तांदुळ धुवुन निथळत ठेवून त्याचा अगदी कोरडा,फडफडीत भात करून घ्यावा. हा भात म्हणजे जीरा राईसच पुढच व्हर्जन आहे. त्यानुसार भात करून घ्यावा.
तेल साधारण २/३ पळी आणि दोन चमचे तुप मिक्स करून गरम करावे. त्यात सर्व अक्खे मसाले घालून शेवटी जीरे टाकावेत.
सर्व भाज्या परतून घ्याव्यात. भाज्या फ्राईड राईस सारख्या कच्च्याच ठेवायच्या.
भाज्या परतल्या कि भात मिक्स करून चविनुसार मीठ घालावे. एक वाफ आणुन वरून एक दोन चमचे तुप सोडावे.
भात तयार आहे.
प्रमाण तुमच्या चवीनुसार कमी जास्त करू शकता.